भाजपा
महाराष्ट्र


राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती

२०१४-२०२६






परम श्रध्येय
पंडित दीनदयाळ उपाध्याय



परम श्रध्येय
डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी



परम श्रध्येय भारतरत्न
अटल बिहारी वाजपेयी

भाजपा

प्रकाशक : भाजपा महाराष्ट्र



* मनोगत *

सेवा, सुशासन आणि राष्ट्रकल्याणाची तपपूर्ती

१२ वर्षांचा दृढ विश्वास आणि विकासाचा प्रवास

जय श्रीराम !

आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाचा आणि ऐतिहासिक आहे. भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला एक तप पूर्ण होत आहे. या १२ वर्षांच्या प्रवासाकडे पाहताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते.. हा केवळ सत्तेचा प्रवास नाही, तर सेवा, समर्पण, त्याग आणि राष्ट्रनिर्मितीचे अखंड अग्निहोत्र आहे.

पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांच्या दूरदर्शी आणि निर्णायक नेतृत्वामुळे भारताने गेल्या दशकात जगाच्या नकाशावर एक नवे स्थान निर्माण केले आहे. देशाला स्थिर, पारदर्शक आणि जनतेशी जोडलेले नेतृत्व मिळाल्यामुळे प्रत्येक क्षेत्रात अभूतपूर्व परिवर्तन घडून आले आहे हे निश्चित.

गरीब कल्याण : विकासाचा केंद्रबिंदू

गेल्या १२ वर्षांच्या प्रवासात केंद्र सरकारने सर्वात जास्त भर दिला तो समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्यावर. परम श्रद्धेय पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची "अंत्योदय" ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केंद्र सरकारच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

परम श्रद्धेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि परम श्रद्धेय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी या महान नेत्यांच्या विचारांचा आणि त्यागाचा वारसा आजच्या प्रवासामागे ठामपणे उभा आहे. डॉ. मुखर्जी यांनी राष्ट्रहितासाठी केलेला संघर्ष आणि एकात्म भारताची मांडणी ही आजही आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. अटलजींच्या सर्वसमावेशक, संवेदनशील आणि दूरदर्शी नेतृत्वाने देशाला स्थैर्य आणि विकासाची नवी दिशा दिली. त्यांच्या आदर्शांवर चालतच आज भारतीय जनता पक्ष देशसेवेचा हा प्रवास अधिक सक्षमपणे पुढे नेत आहे हे मी ठामपणे सांगतो.

प्रधानमंत्री जनधन योजनेमुळे कोट्यवधी लोकांना बँकिंग व्यवस्थेत आणण्यात आले. उज्ज्वला योजनेमुळे माता भगिनींच्या जीवनात सन्मान आणि आरोग्याची नवी पहाट आली. तर आयुष्मान भारत योजनेमुळे देशभरातील कोट्यवधी गरीब कुटुंबांना आरोग्याचा मोठा आधार मिळाला आहे. या केवळ कागदी योजना नाहीत, तर सामान्य माणसाच्या आयुष्यात झालेल्या सकारात्मक बदलांची कौतुकास्पद साक्ष आहेत.

आत्मनिर्भर भारत आणि आर्थिक प्रगती :

आज आपला देश "आत्मनिर्भर भारत" या ध्येयाने एका जिद्दीने पुढे जात आहे. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देत, उद्योग क्षेत्राला बळकटी देत देश आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होत आहे. त्यातूनच मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे युवकांना संधीचे नवे दालन खुले झाले आहे. भारत आज जगातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे, आणि यामध्ये निश्चितपणे युवा शक्तीचा मोठा वाटा आहे. याबरोबरच डिजिटल व्यवहारांमध्ये झालेली क्रांती, (युपीआय) सारख्या प्रणालीमुळे भारत जगाला मार्गदर्शन करणारा प्रमुख देश बनला आहे. म्हणूनच गेल्या १२ वर्षांत भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात वाढली असून आज जग भारताकडे एक विश्वासार्ह सक्षम भागीदार म्हणून बघत आहे.

G20 सारख्या महत्त्वाच्या मंचांवर भारताने नेतृत्व केले. कोविड सारख्या जागतिक संकटांच्या काळातही भारताने "वसुधैव कुटुंबकम्" या तत्त्वावर भर देत मानवतेला मदतीचा हात दिला.

महाराष्ट्रासाठी विकासाची नवी दिशा :

महाराष्ट्र हा देशाच्या विकासाचा कणा आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे याचा मला अभिमान वाटतो. केंद्र सरकारच्या सहाय्याने माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाखाली महाराष्ट्रात, महामार्ग, रेल्वे, मेट्रो प्रकल्प, बंदरे, औद्योगिक कॉरिडॉर यासारख्या सर्वच प्रकल्पांमुळे राज्याच्या प्रगतीला नवी गती मिळाली आहे. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक यांसारख्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे झालीच आहेत, तर राज्यातील इतर शहरे आणि प्रामुख्याने ग्रामीण भागातही केंद्र सरकारच्या माध्यमातून विकासाची कामे प्रगतीपथावर आहेत. कृषी क्षेत्रातही शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी विविध योजना राबवण्यात आल्या आहेत, ज्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली आहे.

सुशासन आणि पारदर्शकता :

या १२ वर्षांत सरकारने सुशासनावर विशेष भर दिला. भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन देण्याचा प्रयत्न केला.

सरकारी योजना थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पोहोचवण्याची प्रणाली (डीबीटी) लागू केल्यामुळे दलालांचा हस्तक्षेप कमी झाला, पारदर्शकता आली आणि जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला. युवा, महिला आणि समाजातील सर्व घटकांचे सबलीकरणावर भर दिला गेला.

देशातील युवकांना संधी देण्यासाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता यावर भर देण्यात आला. महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबवून त्यांना आत्मनिर्भर बनवण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेला. आज भारतातील महिला प्रत्येक क्षेत्रात आपले नेतृत्व सिद्ध करत आहेत, हे याच धोरणांचे यश आहे.

भविष्याचा संकल्प :

खरंतर माननीय मोदीजींनी मागील १२ वर्षांत भारतात घडवलेलं स्थित्यंतर एका पुस्तकात सामावणे अशक्य आहे, या एक तपाचे संचित सोबत घेऊनच 'विकसित भारत २०४७' हे स्वप्न साकार करण्यासाठी आणि प्रत्येक भारतीयाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी आपण सर्वजण पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली अधिक जोमाने काम करण्याची प्रतिज्ञा करूया.

या १२ वर्षांच्या प्रवासात महाराष्ट्रातील जनतेने दिलेल्या प्रेम, विश्वास आणि पाठिंब्याबद्दल मी प्रदेशाध्यक्ष या नात्याने सदैव ऋणी आहे. या आपुलकीतूनच आपण एक सक्षम, समृद्ध आणि विकसित भारत घडवू शकतो ही मला खात्री आहे.

जय हिंद! जय महाराष्ट्र!

स्थळ : मुंबई
दि. : २५ मे २०२६

रविंद्र चव्हाण
प्रदेशाध्यक्ष
भारतीय जनता पार्टी
महाराष्ट्र



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

शुभेच्छा!

आपले लाडके पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांच्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीला २६ मे २०२६ रोजी १२ वर्ष पूर्ण होत आहेत. त्याचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशाने 'राष्ट्रनिर्माणाची तप:पूर्ती' हा विशेष अंक प्रकाशित करण्याचे ठरविले हे ऐकून अतिशय आनंद झाला.

खरे तर मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी या १२ वर्षांत जी कामे केली, ती कोणत्याही एका पुस्तकात मांडणे निव्वळ अशक्य आहे. २०१४ पूर्वीचा भारत आणि २०२६ मधील भारत यातील स्थित्यंतर हे शब्दांत मांडण्याच्या पलिकडचे आहे. अयोध्येतील राममंदिराचे निर्माण, काश्मीरमधून कलम ३७० रद्द करणे, तीन तलाक रद्द करणे, भारताला ११ व्या क्रमांकावरुन चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था करणे असे कितीतरी स्वप्न पूर्ण झाली आहेत. या सर्व विकासकामांचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न अतिशय स्तुत्य आहे. जगातील सर्वांत मोठी आयुष्मान भारत योजना, ८० कोटी नागरिकांसाठी गरिब कल्याणाचा विशाल कार्यक्रम, २५ कोटी नागरिकांना दारिद्र्यरेषेतून बाहेर काढणे, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री आवास योजना असे अनेक कार्यक्रम निश्चितच सर्वसामान्यांना सुखावणारे आहेत. आज जगात आर्थिक अनिश्चितता असताना मोदीजींनी देशाला एक सक्षम नेतृत्त्व प्रदान केले आणि वैश्विक नेतृत्त्व म्हणून ते पुढे आले.

एक परिपूर्ण भारत आणि तितकाच दमदार महाराष्ट्र त्यांच्या नेतृत्त्वात घडला. महाराष्ट्रातील प्रत्येक विकास कामांना त्यांनी व्यक्तिश: लक्ष घालून मदत केली. त्यांच्या या सर्व कामांचा समग्र मागोवा या अंकातून घेतला जाईल, अशी मला आशा आहे. या विशेषांकाला माझ्या खूप खूप शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in



अनुक्रमणिका

- एक भारत अखंड भारत — 12
- भारत अंत्योदय – वंचितांचा उदय — 30
- सुरक्षित भारत, संरक्षित भारत — 42
- पारदर्शक भारत - भ्रष्टाचार मुक्त प्रशासनाचा नवा अध्याय — 50
- उद्योग भारत - जागतिक निर्मितीचे केंद्र — 62
- युवाकेंद्रित भारत - नव्या भारताचे ऊर्जास्रोत — 74
- मोदी सरकार 4 महाराष्ट्र — 92
- विज्ञान भारत - तांत्रिक क्रांतीचा नवा अध्याय — 96
- नारीशक्ती - मातृप्रधान भारत — 110
- समृद्ध भारत - स्वच्छ आणि स्वस्थ भारत — 122
- सनातन भारत — 134
- अभिनव भारत - कागदमुक्त आणि तंत्रज्ञानयुक्त प्रशासन — 150
- परिपूर्ण भारत - २०४७ — 174

शपथ राष्ट्रनिर्माणाची: २०१४ भारताच्या स्थित्यंतराची चाहूल

भारतीयत्व, जनकल्याण आणि पारदर्शकता या त्रिसूत्रीचा उदय

२६ मे २०१४ रोजी भारताच्या राजकीय इतिहासात एका नवीन पर्वाची नांदी ठरणार होती. राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात जेव्हा नरेंद्र मोदींनी भारताचे १४ वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली, तेव्हा तो केवळ एका व्यक्तीचा किंवा पक्षाचा शपथविधी नव्हता; तर तो सव्वाशे कोटी भारतीयांच्या सामूहिक आकांक्षांचा हुंकार होता. दशकांपासून प्रलंबित असलेल्या स्वप्नांना आता गती मिळणार होती. या शपथेच्या मागे अनेक वर्षांचे कठोर तप, संघटन कौशल्य आणि 'राष्ट्र प्रथम' ही परम श्रध्येय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची विचारधारा होती. मोदीजींच्या या प्रवासाचा प्रारंभ त्यांच्या बालपणातील संघर्षात आणि त्यांना मिळालेल्या संस्कारांत आहे. मुख्यमंत्री म्हणून काम करताना त्यांनी पारदर्शक आणि गतिमान प्रशासनाचे जे 'मॉडेल' वापरले होते त्याचा अनुभव आता संपूर्ण देशाच्या कायापालटासाठी वापरण्याची वेळ आली होती. हा शपथविधी म्हणजे केवळ सत्ता बदल नव्हता, तर प्रस्थापितांच्या 'फाईल संस्कृती' कडून सामान्यांच्या 'लाईफ संस्कृती' कडे होणारे देशाचे स्थित्यंतर होते. लाल किल्ल्यावरून होणाऱ्या सामान्य घोषणांच्या जागी आता जमिनीवर उतरणाऱ्या 'अंमलबजावणीच्या' युगाची ही सुरुवात होती.

या नव्या पर्वाचा पाया 'भा-ज-पा' या तीन आद्याक्षर या संकल्पनेवर आधारलेला आहे.





भाजपा

भारतीयत्व :
हे केवळ नागरिकत्व नसून एक सांस्कृतिक ओळख आहे. मोदीजींनी सत्तेवर येताच भारताच्या प्राचीन वारशाचा अभिमान जागृत केला. 'विकासही आणि वारसाही' या मंत्रातून त्यांनी भारताला आपल्या मुळांशी जोडले. योग असो वा आयुर्वेद, भारतीय संस्कृतीला त्यांनी जागतिक व्यासपीठावर नेऊन ठेवले.

जनकल्याण :
अंत्योदयाचा विचार हाच शासनाचा केंद्रबिंदू बनला. 'सबका साथ, सबका विकास' या न्यायाने समाजाच्या शेवटच्या रांगेतील व्यक्तीला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न सुरू झाले. जनकल्याण म्हणजे केवळ सवलती देणे नव्हे, तर नागरिकांना सक्षम करणे, हा बदल या काळात दिसला.

पारदर्शकता :
"ना खाऊंगा, ना खाने दूंगा" हा केवळ मंत्र नव्हता, तर तो प्रशासनातील शुद्धीकरणाचा पाया होता. २०१४ पूर्वीचा भारत हा धोरणात्मक अपंगत्व आणि भ्रष्टाचाराच्या गर्तेत अडकलेला होता. मोदींनी तंत्रज्ञानाचा वापर करून दलालांची साखळी तोडून सरकारचा प्रत्येक रुपया थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची पारदर्शक व्यवस्था निर्माण केली.

एक भारत अखंड भारत

वैविध्यपूर्ण देशात एकात्मतेचा नवा अध्याय

भारतासारख्या खंडप्राय देशात, जिथे पावलापावलांवर भाषा आणि संस्कृती बदलते, तिथे प्रशासकीय आणि धोरणात्मक एकवाक्यता आणणे हे सर्वात मोठे आव्हान होते. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके भारत विविध कायदे आणि क्लिष्ट प्रणालींमध्ये विभागलेला होता. मात्र, 'एक देश, एक धोरण' हे ध्येय समोर ठेवून देशाला एका सूत्रात बांधण्याचे ऐतिहासिक काम गेल्या १२ वर्षांच्या कार्यकाळात झाले आहे. 'एक भारत, अखंड भारत' या संकल्पनेचा मूळ विचार केवळ राजकीय सीमा सुरक्षित करणे इतकाच मर्यादित नसून, त्यामागे भारताचा भूगोल, सामाजिक क्षमता आणि धोरणात्मक सुसूत्रता या महत्त्वाच्या घटकांतून प्रत्येक नागरिकाला समान हक्क मिळावा हा व्यापक विचार आहे. हा विचार केवळ प्रशासकीय सुधारणांपुरता मर्यादित न राहता, तो आज देशाच्या कानाकोपऱ्यातील शेवटच्या माणसाच्या प्रगतीचा पाया बनला आहे.

या धोरणात्मक क्रांतीचा मुख्य उद्देश देशातील प्रत्येक घटकाला विकासाच्या राष्ट्रीय प्रवाहात समान संधी उपलब्ध करून देणे हा आहे. मग तो देशाचा कणा असलेला शेतकरी असो, आपल्या कर्तृत्वाने राष्ट्र घडवणारा कामगार असो, की उद्याच्या प्रगत भारताचे नेतृत्व करणारा विद्यार्थी असो; या सर्वांना आता प्रादेशिक किंवा भौगोलिक मर्यादांमध्ये अडकून राहण्याची गरज उरलेली नाही. संपूर्ण देश आता त्यांच्यासाठी संधींचे एक विशाल आणि एकसंध व्यासपीठ बनला आहे. भारताची भौगोलिक विविधता ही पूर्वी प्रशासकीय अडथळा वाटत असे, पण आज तीच विविधता या नव्या धोरणात्मक एकसंधतेमुळे राष्ट्राची शक्ती ठरत आहे. वैविध्यपूर्ण भारतात एकात्मतेचा हा नवा अध्याय खऱ्या अर्थाने एका बलशाली, न्याय्य आणि अखंड राष्ट्राची निर्मिती करत आहे, जिथे प्रत्येक नागरिकाचा अधिकार आणि सन्मान हा संपूर्ण देशात समान आहे.

भाजपा
महाराष्ट्र



३७० कलम

प्रारंभ दिनांक- ५ ऑगस्ट २०१९

५ ऑगस्ट २०१९ रोजी भारताने एक मोठे ऐतिहासिक पाऊल उचलले. जम्मू-काश्मीरला असलेला विशेष दर्जा, कलम ३७० आणि भेदभाव करणारे कलम ३५(अ) हटवून भारताने खऱ्या अर्थाने 'एक देश, एक विधान' हे ध्येय साध्य केले आहे. डॉक्टर श्यामप्रसाद मुखर्जी यांनी देशाच्या अखंडतेसाठी दिलेले सर्वोच्च बलिदान आणि त्यांनी दिलेल्या शब्दाची पूर्तता पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या खंबीर नेतृत्वामुळे या ऐतिहासिक निर्णयाद्वारे यशस्वीपणे पूर्णत्वास गेली आहे.

- **समान अधिकार :**
  काश्मीरमधील माता-भगिनींना आणि दलितांना जे अधिकार देशाच्या इतर भागात होते, ते या निर्णयामुळे काश्मीर मध्येही लागू झाले.
- **दहशतवादाचा बीमोड :**
  फुटीरतावादी शक्तींचे आर्थिक स्त्रोत तोडून तिथे शांतता प्रस्थापित करण्यात आली.
- **गुंतवणुकीचे नवे मार्ग :**
  राज्याबाहेरील व्यक्तींना तिथे जमीन खरेदी करण्याची आणि उद्योग उभारण्याची मुभा मिळाल्याने औद्योगिक गुंतवणुकीला गती मिळत आहे.
- **दहशतवादावर नियंत्रण :**
  सुरक्षा दलांच्या कारवायांमुळे स्थानिक दहशतवादाचे प्रमाण कमी झाले असून सीमेपलीकडून होणाऱ्या घुसखोरीवर कडक नजर ठेवली जातेय.
- **विकासाची नवी पहाट :**
  'इन्व्हेस्ट काश्मीर' सारख्या उपक्रमांतून तिथे उद्योग आणि शिक्षणाच्या संधी निर्माण झाल्या. परकीय गुंतवणूक येऊ लागली.
- **एकात्मता :**
  तिरंगा आता काश्मीरच्या प्रत्येक सरकारी इमारतीवर दिमाखाने फडकतो आहे, हे भारतीयत्वाचे प्रतीक बनले.
- **संविधानाची पूर्ण अंमलबजावणी :**
  कलम ३७० रद्द झाल्यामुळे भारताचे संपूर्ण संविधान आता तिथे १००% लागू झाले असून, सर्व केंद्रीय कायदे तिथल्या नागरिकांना मिळाले आहेत.
- **परम श्रद्धेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्वप्नाची पूर्तता :**
  पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी तिथे देशाचा तिरंगा आणि भारतीय संविधान अधिकृतपणे प्रस्थापित करून परम श्रद्धेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे दशकांचे स्वप्न पूर्ण केले आहे.



"जेव्हा आपण ३७० कलमाची भिंत पाडली, तेव्हा आपण 'एक देश, एक संविधान' हा मंत्र खऱ्या अर्थाने स्वीकारला. आज जम्मू-काश्मीरमध्ये लोकशाही आणि विकासाचे नवे पर्व सुरू झाले आहे."



जीएसटी

प्रारंभ दिनांक- १ जुलै २०१७

भारताच्या आर्थिक इतिहासात १ जुलै २०१७ हा दिवस खरोखर सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला आहे. संसदेच्या ऐतिहासिक सेंट्रल हॉलमधून 'एक देश, एक कर' ही क्रांतिकारी संकल्पना जाहीर करून, देशातील अत्यंत गुंतागुंतीची जुनी कर प्रणाली कायमची संपुष्टात आणली गेली. भारताने व्यापार आणि उद्योगांसाठी एक मोठी सामायिक बाजारपेठ निर्माण करून आर्थिक क्रांतीचे पाऊल उचलले, ज्यामुळे राज्यांच्या सीमा ओलांडून होणारा व्यापार अधिकच सुलभ झाला.

- **कर प्रणालीचे सुलभीकरण :**
  व्यापार उद्योगाच्या कटकटी दूर करण्यासाठी डझनभर गुंतागुंतीचे कर काढून एकच पारदर्शक व्यवस्था आणली.
- **पारदर्शकता आणि तंत्रज्ञान :**
  मानवी हस्तक्षेप कमी करण्यासाठी सर्व प्रक्रिया ऑनलाइन केल्या, ज्यामुळे लाचखोरीला आळा बसला.
- **लहान उद्योगांना बळ :**
  कंपोझिशन स्कीमच्या माध्यमातून लघु उद्योजकांना कर भरण्याची सोपी पद्धत उपलब्ध करून दिली.
- **आर्थिक शिस्त :**
  सरकारी महसुलात मोठी वाढ झाली, ज्यामुळे पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध झाला.





"जीएसटीची आठ वर्षे पूर्ण होणे हा भारताच्या आर्थिक वाटचालीतील मैलाचा दगड आहे. या सुधारणेने केवळ कररचना सोपी केली नाही, तर राज्यांना बरोबर घेऊन 'सहकारी संघराज्यवाद' खऱ्या अर्थाने मजबूत केला आहे."

युपीआय

प्रारंभ दिनांक- ११ एप्रिल २०१६

युपीआय म्हणजेच 'युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस' ही भारताने जागतिक अर्थव्यवस्थेला दिलेली एक अभूतपूर्व आणि क्रांतिकारी भेट आहे. एकेकाळी निव्वळ 'रोख' व्यवहारांवर चालणारा भारत आज जगातील तब्बल ४९% पेक्षा जास्त डिजिटल व्यवहार एकटा करतो, हा देशाच्या तांत्रिक क्षमतेचा जागतिक विक्रम आहे. २०१४ पूर्वी गरिबांना बँकिंग व्यवस्थेशी जोडणे अशक्य वाटत होते, पण युपीआयमुळे चहावाल्यापासून ते मोठ्या शोरूमपर्यंत प्रत्येकजण मुख्य आर्थिक प्रवाहात आला आहे. ही केवळ तंत्रज्ञानाची प्रगती नसून आर्थिक पारदर्शकतेचा विजय आहे ज्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसला.

- **खिशातील बँक :**
  मोबाईल हेच आता पाकीट आणि बँक बनले आहे, ज्यामुळे सामान्य माणसाचे जीवन सुसह्य झाले.
- **मध्यस्थांचा अंत :**
  डिजिटल व्यवहारामुळे लाचखोरी आणि भ्रष्टाचाराला आळा बसला, पैसा थेट व्यवहाराच्या जागी पोहोचू लागला.
- **जागतिक ओळख :**
  आज सिंगापूर, फ्रान्स, आणि युएई सारखे देश भारतीय युपीआय स्वीकारत आहेत, हे बदलत्या भारताच्या आर्थिक ताकदीचे प्रतीक आहे.
- **आर्थिक समावेशकता :**
  जनधन खात्यांशी जोडले गेल्यामुळे सरकारी अनुदानाचा पैसा (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर) कोणत्याही गळतीशिवाय थेट नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.



"आज जगातील ४० टक्क्यांहून अधिक डिजिटल व्यवहार एकट्या भारतात होतात. युपीआय हे केवळ तंत्रज्ञान नसून ते प्रत्येक भारतीयाने स्वीकारलेली एक डिजिटल संस्कृती आहे."



वन रँक वन पेन्शन

प्रारंभ दिनांक- ७ नोव्हेंबर २०१५

दशकांपासून प्रलंबित असलेला आपल्या वीर जवानांच्या न्याय्य हक्काचा प्रश्न मोदी सरकारने मार्गी लावला. 'राष्ट्र प्रथम' हे केवळ घोषवाक्य नसून ते प्रत्यक्ष कृतीत आणणारे पाऊल आहे. सैनिकांप्रती असलेले भारतीयत्व आणि कृतज्ञतेची भावना या निर्णयामागे आहे. २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर पहिल्या काही महिन्यातच मोदींनी आपले हे वचन पूर्ण केले. यामुळे निवृत्त जवानांच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळून त्यांचा सन्मान खऱ्या अर्थाने वाढला आहे.

- **समान पेन्शन, समान सन्मान :**
  एकाच पदावर काम करून निवृत्त झालेल्या सैनिकांना, त्यांच्या निवृत्तीच्या तारखेचा विचार न करता समान निवृत्तीवेतन देण्याचा ऐतिहासिक निर्णय.

- **आर्थिक सुरक्षा :**
  या निर्णयामुळे २५.१३ लाखांहून अधिक माजी सैनिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मोठा आर्थिक लाभ मिळाला.

- **जवानांचे मनोधैर्य :**
  सीमेवर लढणाऱ्या जवानाला आता आपल्या भविष्याची चिंता उरली नाही, हे 'बलशाली भारताचे' लक्षण आहे.

- **ऐतिहासिक थकबाकी :**
  केवळ चालू पेन्शनच नाही, तर ७ व्या वेतन आयोगासह सर्व थकबाकी सरकारने विनाविलंब जवानांच्या खात्यात जमा केली.





"ओआरओपी ही केवळ पेन्शनची रक्कम नाही, तर देशाचे रक्षण करणाऱ्या आपल्या वीर जवानांच्या शौर्याचा सन्मान आणि त्यांच्याप्रती असलेली कृतज्ञता आहे."

वसुधैव कुटुंबकम्

प्रारंभ दिनांक- २० जानेवारी २०२१

कोरोनाच्या जागतिक संकटात जेव्हा मोठे प्रगत देश स्वतःचा विचार करत होते, तेव्हा भारताने 'वसुधैव कुटुंबकम्' हा संस्कार जपला. 'व्हॅक्सिन मैत्री' मोहिमेद्वारे भारताने जगाला दाखवून दिले की भारत हा केवळ स्वतःचा विकास करणारा देश नाही, तर जगाचे कल्याण करणारा 'विश्वबंधू' आहे. हे भारतीयत्वाचे सर्वात मोठे वैश्विक उदाहरण आहे. स्वदेशी लसीच्या निर्मितीमुळे प्रत्येक भारतीयाला सुरक्षिततेचे कवच देऊन देशाने स्वतःचे सामर्थ्य सिद्ध केले.









- **आत्मनिर्भर भारताची १०० + देशांना मदत :**
  गरीब आणि विकसनशील देशांना भारताने कोट्यवधी लसींचे डोस विनामूल्य किंवा सवलतीच्या दरात पुरवले. दोन स्वदेशी लसी तयार करून जगाला आपली विज्ञानातील ताकद दाखवून दिली.

- **जागतिक नेतृत्वाची मोहोर :**
  जागतिक आरोग्य संघटनेने भारताच्या या कार्याचे कौतुक करून भारताला 'जगाची फार्मसी' म्हणून मान्यता दिली.

- **को-विन प्लॅटफॉर्म (Co-WIN) :**
  जगातील सर्वात मोठी लसीकरण मोहीम राबवण्यासाठी भारताने 'Co-WIN' हे प्रगत डिजिटल व्यासपीठ विकसित केले. २०० कोटी लसीकरणाचे उद्दिष्ट को-विनमुळे साध्य झाले.

- **आरोग्य सेतू ॲप :**
  कोरोनाच्या संकटात 'आरोग्य सेतू' हा ॲप एका हेल्थ शिल्ड सारखा उपयोगी ठरला. जगातील सर्वाधिक डाऊनलोड झालेले हे एक 'कॉन्टॅक्ट ट्रेसिंग' ॲप ठरले याने तंत्रज्ञानाच्या मदतीने लाखो लोकांचे प्राण वाचवले.

"संकटकाळी संपूर्ण जग जेव्हा लसीच्या शोधात होते, तेव्हा भारताने मानवतेच्या भावनेने 'विश्वबंधू' म्हणून जगाला मदतीचा हात दिला."



राष्ट्रीय शिक्षण धोरण

प्रारंभ दिनांक- २९ जुलै २०२०

३४ वर्षांनंतर देशाच्या शिक्षण पद्धतीत झालेला हा सर्वात मोठा बदल आहे. केवळ पदव्या देणारे शिक्षण न देता 'विद्यार्थी घडवणारे शिक्षण' देण्याचे स्वप्न या धोरणाने पाहिले आहे. पाश्चिमात्य शिक्षणाच्या मानसिकतेतून बाहेर पडून भारतीयत्व आणि कौशल्यावर आधारित नवी पिढी घडवण्याचा हा पाया आहे. हे नवीन शैक्षणिक धोरण केवळ कागदोपत्री बदल नसून, भविष्यातील आत्मनिर्भर भारताची भक्कम पायाभरणी करणारा एक क्रांतिकारी आणि दूरगामी विचार आहे.

- **५+३+३+४ आराखडा :**
  पाठांतरापेक्षा मुलांच्या आकलनशक्तीवर आणि मानसिक विकासावर भर देणारा नवा स्ट्रक्चर.
- **मातृभाषेतून शिक्षण :**
  भाषेमुळे शिक्षण घेण्यात अडचण येऊ नये म्हणून प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून देण्याची मुभा दिली, ज्यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला.
- **कौशल्य विकास (स्किल इंडिया) :**
  शाळेत असतानाच मुलांना व्यावसायिक शिक्षण दिले जाणार आहे, ज्यामुळे ते भविष्यात स्वावलंबी होतील.
- **संशोधनावर भर :**
  नॅशनल रिसर्च फाउंडेशनच्या माध्यमातून भारतात नवनवीन शोध लावणाऱ्या तरुणांना सरकार पाठबळ देणार आहे.





"नवीन शैक्षणिक धोरण हे आपल्या तरुणांना केवळ पदव्या मिळवण्यासाठी नाही, तर 'आत्मनिर्भर' बनवण्यासाठी आणि भारताला 'ज्ञान महासत्ता' करण्यासाठी तयार करत आहे."

एक देश एक रेशन कार्ड

प्रारंभ दिनांक- ९ ऑगस्ट २०१९

देशातील कोणताही नागरिक, तो कुठेही राहत असला तरी, अन्नापासून वंचित राहू नये हे जनकल्याणाचे मुख्य ध्येय आहे. स्थलांतरित मजूर आणि गरीबांसाठी ही योजना म्हणजे एक वरदान ठरली आहे. मोदी सरकारने तंत्रज्ञानाचा वापर करून रेशन व्यवस्थेतील भ्रष्टाचार मुळापासून संपवला आहे. या पारदर्शक प्रणालीमुळे हक्काचे धान्य थेट गरजूंपर्यंत पोहोचत असून, 'अंत्योदय' चा संकल्प सिद्धीस नेणारी ही व्यवस्था खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे प्रतीक ठरली आहे.

- **पोर्टेबिलिटी सुविधा :**
  आता कोणत्याही राज्याचा रेशन कार्ड धारक देशातील कोणत्याही रेशन दुकानातून आपले धान्य घेऊ शकतो.
- **पारदर्शक वितरण :**
  रेशन दुकानांमध्ये पॉस मशीन आणि बायोमेट्रिक ओळख अनिवार्य केल्यामुळे बोगस कार्ड्स आणि धान्य चोरी बंद झाली.
- **मोफत धान्य (प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना) :**
  कोरोना काळापासून गेली ६ वर्षे ८० कोटी पेक्षा अधिक जनतेला मोफत धान्य देऊन सरकारने कुपोषण आणि उपासमारीविरुद्ध मोठे युद्ध पुकारले आहे.
- **अंत्योदयाची पूर्तता :**
  गरीब कुटुंबांना अन्न सुरक्षा देऊन त्यांच्या आयुष्यातील मूलभूत चिंता सरकारने दूर केली आहे.





"आता रेशन कार्डचा लाभ घेण्याकरिता भौगोलिक सीमांचे बंधन राहिलेले नाही. स्थलांतरित मजुरांना त्यांच्या हक्काचा घास देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात मिळणे सुनिश्चित झाले आहे."

एक राष्ट्र - एक ई-चलान

प्रारंभ दिनांक- ६ मार्च २०२३

डिजिटल इंडिया' मोहिमेअंतर्गत 'एक राष्ट्र - एक ई-चलान' द्वारे संपूर्ण देशातील वाहतूक यंत्रणा एकाच व्यासपीठावर आणली आहे. पारदर्शकता आणि भ्रष्टाचार मुक्तीसाठी रस्ते वाहतूक क्षेत्रात झालेली ही मोठी डिजिटल क्रांती आहे. यामुळे दंडाची प्रक्रिया सुटसुटीत झाली असून, मानवी हस्तक्षेप कमी झाल्याने नियम मोडणाऱ्यांवर जरब बसली आहे. परिणामी, वाहतूक नियमांचे शिस्तबद्ध पालन होऊन रस्ते सुरक्षा अधिक बळकट होण्यास मोठी मदत होत आहे.

- **एकात्मिक डिजिटल क्रांती :**
  'वाहन' आणि 'सारथी' पोर्टलच्या एकत्रीकरणामुळे संपूर्ण देशातील वाहतूक पोलीस आणि (आरटीओ) एकाच केंद्रीय डेटाबेसशी जोडले गेले आहेत.

- **पारदर्शकता आणि भ्रष्टाचार मुक्ती :**
  एआय कॅमेऱ्यांद्वारे स्वयंचलित चलान आणि ऑनलाईन दंड वसुलीमुळे मानवी हस्तक्षेप संपून भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा बसला आहे.

- **स्मार्ट रस्ते सुरक्षा :**
  परवाना आणि विम्याची रिअल-टाइम पडताळणी तसेच 'डिजी लॉकर' मुळे प्रत्यक्ष कागदपत्रे बाळगण्याची गरज उरली नाही, ज्यामुळे प्रवास सुटसुटीत आणि सुरक्षित झाला आहे.

- **व्हर्च्युअल कोर्ट :**
  वेळेत दंड न भरल्यास प्रकरण आपोआप डिजिटल न्यायालयाकडे वर्ग होऊन कायदेशीर शिस्त निर्माण झाली आहे.





"मानवी हस्तक्षेप आणि तंत्रज्ञान यांचा मेळ घालून आपण समाजातील महत्त्वाचे प्रश्न सोडवू शकतो आणि नागरिकांचे जीवन सुलभ करू शकतो."

गुन्हेगार व गुन्हेगारीचा केंद्रीय डेटाबेस

प्रारंभ दिनांक- २१ ऑगस्ट २०१७

गुन्हेगारी रोखण्यासाठी राज्यांच्या सीमा आता अडथळा ठरू नयेत, यासाठी राष्ट्रीय स्तरावर सर्व पोलीस ठाण्यांची माहिती एकत्र करण्यात आली आहे. यामुळे एका राज्यातील गुन्हेगार दुसऱ्या राज्यात जाऊन लपला तरी त्याचा छडा लावणे आता अत्यंत सोपे झाले आहे. तंत्रज्ञानाच्या या एकत्रित जाळ्यामुळे तपासाला वेग आला असून, गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत, परिणामी देशाची अंतर्गत सुरक्षा आणि कायदा सुव्यवस्था अधिक सक्षम व प्रभावी बनली आहे.



- **माहितीचे एकत्रीकरण :**
  देशातील सर्व १७,००० हून अधिक पोलीस ठाणी आता डिजिटल डेटाबेसने जोडली गेली आहेत, ज्यामुळे कोणत्याही राज्यातील गुन्हेगाराची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते.

- **तपास गती :**
  आंतरराज्य गुन्हेगारी टोळ्यांचा छडा लावणे आता अधिक सोपे झाले असून, गुन्हेगारांना तंत्रज्ञानाच्या मदतीने वेगाने पकडणे शक्य झाले आहे.

- **सुरक्षित भारत :**
  हा डेटाबेस राष्ट्रीय सुरक्षेसाठी एक मजबूत भिंत म्हणून काम करत असून गुन्ह्यांचा तपास करण्यात पारदर्शकता आली आहे.

- **तपास आणि पुरावे सक्षमीकरण :**
  या डेटाबेसमुळे गुन्हेगारांचे ठसे आणि फॉरेन्सिक माहिती राष्ट्रीय स्तरावर उपलब्ध झाली आहे. 'नाफिस' सारख्या आधुनिक प्रणालीमुळे पुराव्यांची अचूक तपासणी होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढले आहे.



"येत्या १० वर्षांत, भारताची फौजदारी न्याय व्यवस्था ही जगातील सर्वात आधुनिक, वैज्ञानिक आणि वेगवान असेल."

वन नेशन वन फर्टिलायझर

प्रारंभ दिनांक- १७ ऑक्टोबर २०२२

शेतकऱ्यांचा गोंधळ दूर करण्यासाठी आणि खतांच्या किमतीत समानता आणण्यासाठी सरकारने 'वन नेशन वन फर्टिलायझर' हे धोरण आणले आहे. यामुळे संपूर्ण देशात खतांची गुणवत्ता आणि ब्रँडिंग एकसारखे झाले असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यामुळे आता विविध ब्रँड्सच्या भूलथापांना चाप बसून 'भारत' ब्रँडखाली उच्च दर्जाचे खत उपलब्ध होत आहे, ज्यामुळे शेतीचा खर्च कमी होऊन उत्पादकता वाढण्यास आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारण्यास मोठी मदत होईल.

- **ब्रँड समानता :**
  'प्रधानमंत्री भारतीय जन उर्वरक परियोजना' अंतर्गत आता संपूर्ण देशात सर्व खते 'भारत' या एकाच ब्रँड नावाखाली उपलब्ध आहेत.
- **किंमत नियंत्रण :**
  खतांच्या किमतीत देशभर समानता आली असून, खतांचा काळाबाजार थांबवण्यासाठी या धोरणाने मोठी मदत केली आहे.
- **गुणवत्तेची हमी :**
  खतांच्या गुणवत्तेबाबत शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण झाला असून, वेगवेगळ्या. कंपन्यांच्या नावामुळे होणारा संभ्रम आता कायमचा दूर झाला आहे.
- **वेळेवर पुरवठा :**
  खतांची वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ झाल्यामुळे, ऐन हंगामात शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर खतांचा पुरवठा वेळेवर होण्यास मदत झाली आहे.





"आता खतांच्या ज्या काही वेगवेगळ्या ब्रँड्स होत्या, त्या संपून आता देशभरात एकाच नावाने, एकाच ब्रँडने आणि एकाच गुणवत्तेचे खत विकले जाईल. आणि हा ब्रँड आहे – 'भारत'."

वन नेशन वन सबस्क्रिप्शन

प्रारंभ दिनांक- ९ जानेवारी २०२५

देशातील संशोधक आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे ज्ञान सहज उपलब्ध व्हावे, यासाठी सरकारने 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' ही योजना सुरू केली आहे. यामुळे महागडी वैज्ञानिक नियतकालिके आता सर्वांना मोफत किंवा सवलतीत उपलब्ध आहेत. यामुळे ग्रामीण भागातील गुणवत्तावान तरुणांनाही संशोधनाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली असून, ज्ञानाधिष्ठित समाज घडवण्याच्या दिशेने आणि 'विकसित भारत' साकारण्यासाठी उचललेले हे एक अत्यंत क्रांतिकारी पाऊल ठरले आहे.



- **संशोधन क्रांती :**
  देशातील सर्व सरकारी आणि शैक्षणिक संस्थांना जागतिक दर्जाचे 'जर्नल्स' एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून दिले जात आहेत.
- **ज्ञानाचे लोकशाहीकरण :**
  ग्रामीण भागातील विद्यार्थ्यालाही आता तेच जागतिक ज्ञान उपलब्ध आहे जे मोठ्या शहरांतील उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांना मिळते.
- **खर्चात बचत :**
  प्रत्येक संस्थेला वेगवेगळे सबस्क्रिप्शन घेण्याची गरज उरली नसल्यामुळे सरकारी तिजोरीतील कोट्यवधी रुपयांची बचत होत आहे.
- **संशोधन गुणवत्तेत वाढ :**
  जागतिक स्तरावरील अद्ययावत माहिती एकाच ठिकाणी मिळाल्यामुळे भारतीय संशोधकांच्या कामाचा दर्जा सुधारण्यास आणि जागतिक स्पर्धेत टिकण्यास मदत होत आहे.



"ही 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' योजना भारताला संशोधन, शिक्षण आणि ज्ञानाचे जागतिक केंद्र बनवण्याच्या आमच्या प्रयत्नांना बळकट करेल. यामुळे आंतरशाखीय अभ्यासाला देखील प्रोत्साहन मिळेल."

एक राष्ट्र, एक वाहन नोंदणी (BH सिरीज)

प्रारंभ दिनांक- २६ ऑगस्ट २०२१

'एक राष्ट्र, एक वाहन नोंदणी' उपक्रमांतर्गत केंद्र सरकारने 'भारत (BH) सिरीज' सुरू केली आहे. २५ ऑक्टोबर २०२१ रोजी महाराष्ट्र राज्यात याची अंमलबजावणी सुरू झाली. या सुविधेमुळे कोणत्याही राज्यात स्थलांतर करताना वाहनाची पुन्हा नोंदणी करण्याची गरज पडत नाही. हा नियम संपूर्ण देशात लागू असून, यामुळे वाहनधारकांचा वेळ आणि मानसिक त्रास वाचतो, तसेच आंतरराज्य प्रवास अत्यंत सुलभ आणि सुकर झाला आहे.

- **सुलभ स्थलांतर :**
  BH सिरीज असलेल्या वाहनांना नवीन राज्यात गेल्यावर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत नाहीत, ज्यामुळे कर्मचाऱ्यांची आंतरराज्य बदली सुलभ होते.

- **लालफितीमधून मुक्ती :**
  जुन्या नियमांनुसार दुसऱ्या राज्यात गेल्यावर वाहनाचे एनओसी काढणे, कर परतावा मागणे आणि नवीन कर भरणे या क्लिष्ट प्रक्रियेतून पूर्णपणे सुटका झाली आहे.

- **कर भरण्याची लवचिकता :**
  या प्रणालीअंतर्गत वाहन खरेदी करतानाच संपूर्ण १५ वर्षांचा कर एकदम भरण्याऐवजी, दर दोन वर्षांनी (किंवा ४, ६, ८ वर्षे) टप्प्याटप्प्याने कर भरण्याची आधुनिक आणि सुलभ सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

- **गतिशीलतेला पोषक :**
  संरक्षण क्षेत्रातील कर्मचारी, केंद्र/राज्य सरकारी कर्मचारी आणि ज्या खाजगी कंपन्यांची कार्यालये ४ किंवा अधिक राज्यांमध्ये आहेत अशा कर्मचाऱ्यांसाठी ही योजना लागू केल्यामुळे देशांतर्गत मनुष्यबळाची गतिशीलता वाढली आहे.





आपल्या नोकरीच्या किंवा बदलीच्या ठिकाणी जाताना त्यांना त्यांच्या वाहनांच्या नोंदणीसाठी आरटीओ कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत. तंत्रज्ञानाचा वापर करून संपूर्ण देशासाठी एकच प्रणाली असणे, हे आधुनिक भारताचे लक्षण आहे."

एक जिल्हा एक उत्पादन

प्रारंभ दिनांक- २४ जानेवारी २०१८

भारतातील प्रत्येक जिल्ह्याची एक वेगळी ओळख आहे. ही ओळख जागतिक बाजारपेठेपर्यंत पोहोचवण्यासाठी 'एक जिल्हा एक उत्पादन' (ODOP) ही मोहीम राबवली जात आहे. यामुळे स्थानिक उद्योगांना आणि जिल्ह्याच्या उत्पादनांना मोठी चालना मिळत आहे. तसेच जीआय टॅगमुळे उत्पादनांचे स्वामित्व हक्क अबाधित राहत आहेत. यामुळे स्थानिक कारागिरांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होत आहे आणि भारतीय कलावैभवाचा डंका जगभरात वाजत आहे.



- **स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी :**
  जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनाला (उदा. कोल्हापुरी चप्पल, नागपुरी संत्री) ब्रँडिंग करून जागतिक स्तरावर ओळख मिळवून दिली जात आहे.

- **कारागिरांना आधार :**
  स्थानिक कारागिरांना आधुनिक यंत्रसामग्री आणि आर्थिक मदत देऊन त्यांचे उत्पादन निर्यातक्षम बनवले जात आहे.

- **आत्मनिर्भर जिल्हा :**
  या धोरणामुळे ग्रामीण स्तरावर रोजगार निर्मिती होत असून, प्रत्येक जिल्हा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

- **निर्यात संधी :**
  स्थानिक उत्पादने आता थेट जागतिक बाजारपेठेशी जोडली गेल्यामुळे जिल्ह्या-जिल्ह्यातून होणाऱ्या निर्यातीत मोठी वाढ झाली आहे.

"आपल्या प्रत्येक जिल्ह्याची एक वेगळी ओळख आहे. ओडीओपी च्या माध्यमातून आपण स्थानिक कौशल्याला जागतिक ओळख मिळवून देत आहोत, जो आत्मनिर्भर भारताचा कणा आहे."



विकासाचे प्रगतीपुस्तक

एकात्म भारताची तपपूर्ती

कलम ३७० व ३५(अ)

एनडीए सरकारचे विकासपर्व

कलम ३७० रद्द केल्यामुळे २०२४ मध्ये पर्यटकांची संख्या विक्रमी २.३६ कोटींवर पोहोचली असून दगडफेकीच्या घटना आता 'शून्य' झाल्या आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

स्वतंत्र राज्यघटनेमुळे फुटीरतावाद वाढला होता, परिणामी २०१८ मध्ये १,३२८ दगडफेकीच्या घटनांची नोंद झाली होती.

जीएसटी

एनडीए सरकारचे विकासपर्व

'एक देश, एक कर' मुळे एप्रिल २०२६ मध्ये ₹२.४२ लाख कोटींचे विक्रमी मासिक संकलन झाले असून ९.४६ कोटी नोंदणीकृत युजर्स आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

१७ पेक्षा जास्त गुंतागुंतीच्या करप्रणालीमुळे करचोरीचे प्रमाण अधिक होते आणि अर्थव्यवस्था विस्कळीत होती.

युपीआय

एनडीए सरकारचे विकासपर्व

मार्च २०२६ मध्ये २,२६४ कोटी व्यवहारांचा जागतिक विक्रम. एकूण रिअल-टाइम डिजिटल पेमेंट्सपैकी ४९% व्यवहार एकट्या भारतात होतात.

यूपीए सरकारची दुरावस्था

अर्थव्यवस्था पूर्णपणे रोख व्यवहारांवर अवलंबून होती, ज्यामुळे डिजिटल व्यवहारांचे प्रमाण नगण्य होते.

वन रँक वन पेन्शन

एनडीए सरकारचे विकासपर्व

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून ₹१,२०,००० कोटींहून अधिक निधी थेट २५.१३ लाख पेक्षा अधिक माजी सैनिकांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

सैनिकांची ही मागणी ४० वर्षांपासून प्रलंबित होती आणि त्यासाठी केवळ ₹५०० कोटींची तोकडी तरतूद करण्यात आली होती.

लस मैत्री

एनडीए सरकारचे विकासपर्व

भारताने Covaxin, ZyCoV-D, iNCOVACC आणि GEM-COVAC-19 या ४ स्वदेशी लसी तयार केल्या आणि ३० कोटींहून अधिक डोस जगातील १०० देशांना निर्यात करून 'विश्वबंधू' म्हणून ख्याती मिळवली.

यूपीए सरकारची दुरावस्था

कोणत्याही नवीन लसीच्या संशोधनासाठी किंवा उपलब्धतेसाठी भारताला जगावर किमान १५ ते २० वर्षे अवलंबून राहावे लागत असे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण

एनडीए सरकारचे विकासपर्व

NEP 2020 मुळे ५+३+३+४ हा नवा आराखडा लागू झाला असून, १ कोटीहून अधिक शिक्षकांना प्रशिक्षित केले गेले आहे व कौशल्य आधारित शिक्षणावर भर दिला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

१९८६ च्या जुन्या शैक्षणिक आराखड्यामुळे केवळ घोकंपट्टीवर भर होता आणि व्यावसायिक कौशल्यांचा पूर्णपणे अभाव होता.

एक देश एक रेशन कार्ड

एनडीए सरकारचे विकासपर्व

८० कोटी+ जनतेला मोफत धान्य मिळत असून १००% बायोमेट्रिक पोर्टेबिलिटीमुळे देशात कुठेही रेशन मिळणे सुलभ झाले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

रेशन कार्ड केवळ एका राज्यापुरते मर्यादित असल्याने देशातील स्थलांतरित मजुरांना हक्काच्या अन्नापासून वंचित राहावे लागत असे.

एक राष्ट्र - एक ई-चलान

एनडीए सरकारचे विकासपर्व

३०+ राज्यांत डिजिटल प्रणाली लागू झाली असून ३८ कोटींहून अधिक ई-चलान पारदर्शकपणे जारी करण्यात आले आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

कागदी चलन पद्धतीमुळे ट्रॅकिंग यंत्रणा नव्हती आणि मानवी हस्तक्षेपामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण मोठे होते.

नॅशनल क्राईम डेटाबेस

एनडीए सरकारचे विकासपर्व

देशातील ९७% पेक्षा जास्त (१७,०००+) पोलीस ठाणी ऑनलाइन जोडली गेली असून गुन्हेगारांचा डेटाबेस आता एका क्लिकवर उपलब्ध आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

केंद्रीय माहिती प्रणालीचा अभाव असल्यामुळे गुन्हेगारांचा देशव्यापी मागोवा घेणे तपास यंत्रणांना कठीण जात असे.

वन नेशन वन फर्टिलायझर

एनडीए सरकारचे विकासपर्व

आता देशभरात खते केवळ 'भारत' या एकाच ब्रँडखाली उपलब्ध असून शेतकऱ्यांना स्वस्त आणि दर्जेदार खतांची खात्री मिळाली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

विविध कंपन्यांच्या ब्रँड्समुळे शेतकऱ्यांची फसवणूक होत असे आणि खतांचा काळाबाजार मोठ्या प्रमाणावर होत असे.

वन नेशन वन सबस्क्रिप्शन

एनडीए सरकारचे विकासपर्व

₹६,००० कोटींच्या तरतुदीसह वन नेशन वन सबस्क्रिप्शन हे धोरण लागू केले गेले असून, आता देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला जागतिक स्तरावरील संशोधन साहित्य मोफत आणि सहज उपलब्ध झाले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

महागड्या वैज्ञानिक नियतकालिकांचे सबस्क्रिप्शन केवळ मोठ्या आणि श्रीमंत शिक्षण संस्थांपुरते मर्यादित होते, ज्यामुळे ग्रामीण भागातील संशोधक आणि विद्यार्थी जागतिक ज्ञानापासून वंचित राहत होते. .

एक जिल्हा एक उत्पादन

एनडीए सरकारचे विकासपर्व

७७५ जिल्ह्यांतील १,२४३ हून अधिक उत्पादने जागतिक बाजारपेठेशी जोडली गेल्याने स्थानिक निर्यात ₹८८,९६७ कोटींवरून ₹१.७१ लाख कोटींवर पोहोचली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

स्थानिक कारागिरांच्या उत्पादनांना स्वतंत्र ओळख नव्हती, त्यामुळे त्यांची विक्री केवळ स्थानिक बाजारपुरती मर्यादित होती.



भारत अंत्योदय

संकल्प अंत्योदयाचा : पंडित दीनदयाळजींचा विचार आणि मोदीजींचे कार्य
समाजाच्या शेवटच्या रांगेतील व्यक्तीचा 'सन्मान' हाच खरा 'विकास'

पहिल्या प्रकरणातील **'भा-ज-पा'** त्रिसूत्रीमधील **'ज - जनकल्याण'** या सूत्राचा खरा अर्थ 'भारत अंत्योदय' या प्रवासात दडलेला आहे. २०१४ मध्ये जेव्हा मोदीजींनी सत्ता हाती घेतली, तेव्हा त्यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे, विकास केवळ शहरांपुरता किंवा ठराविक वर्गापुरता मर्यादित न ठेवता तो झोपडीतील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवणे. हा विचार नवीन नव्हता; हा विचार होता जनसंघाचे प्रणेते परम श्रद्धेय पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा. दीनदयाळजींनी **'अंत्योदय'** संकल्पना मांडताना सांगितले होते की, "जोपर्यंत समाजाच्या शेवटच्या रांगेतील शेवटच्या माणसाचा उत्कर्ष होत नाही, तोपर्यंत राष्ट्र खऱ्या अर्थाने प्रगत होऊ शकत नाही."

नरेंद्र मोदींनी हाच वैचारिक वारसा केवळ भाषणांपुरता मर्यादित न ठेवता त्याला सरकारी धोरणांचे स्वरूप दिले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून जवळपास एक दशक अखंड भारत भ्रमण केलेल्या मोदीजींना गरिबांच्या वेदनांची आणि गरजांची नेमकी जाण होती. त्यांनी सत्तेवर आल्यावर स्पष्ट केले की, "माझे सरकार गरिबांना समर्पित आहे." २०१४ पूर्वी गरिबांसाठी बँकेत खाते उघडणे ही एक अत्यंत क्लिष्ट आणि कठीण प्रक्रिया होती; कागदपत्रांच्या तांत्रिक अडचणींमुळे सामान्य माणूस बँकिंग व्यवस्थेपासून दूर होता. , त्यांच्या घराची स्वप्ने कागदावरच राहत होती आणि रेशनमधील अन्नाचा मोठा भाग भ्रष्टाचारामुळे गायब होत होता.

तपपूर्ती'च्या या १२ वर्षांत (२०१४-२०२६) मोदीजींनी अंत्योदयाच्या या विचाराला तंत्रज्ञानाची आणि 'पारदर्शकतेची' जोड दिली. त्यांनी दीनदयाळजींच्या 'एकात्म मानवतावादाला' आधुनिक भारताच्या संदर्भात 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या रूपात मांडले. शेतकऱ्याच्या खात्यात थेट पैसे पोहोचवणे असो वा बेघरांना पक्के घर देणे, या प्रत्येक कृतीमागे 'अंत्योदय' हाच आत्मा होता. जेव्हा देशातील कोट्यवधी महिलांना धुरापासून मुक्ती मिळाली आणि करोडो घरांना नळाचे पाणी मिळाले, तेव्हा खऱ्या अर्थाने दीनदयाळजींच्या विचारांचा सन्मान झाला. हा प्रवास म्हणजे केवळ आकडेवारी नाही, तर एका महान विचाराची झालेली यशस्वी अंमलबजावणी आहे.

भाजपा
महाराष्ट्र



प्रधानमंत्री किसान सन्मान निधी

प्रारंभ दिनांक- २४ फेब्रुवारी २०१९

शेतकरी हा भारताचा कणा आहे, पण तोच वर्षानुवर्षे कर्जबाजारी राहिला. मोदीजींनी 'अन्नदात्याचा' सन्मान करण्यासाठी ही जगातील सर्वात मोठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना सुरू केली, ज्यामुळे शेतकऱ्याला सावकाराकडे हात पसरण्याची वेळ येऊ नये. या मदतीमुळे बळीराजाला पेरणीसाठी आवश्यक भांडवल वेळेवर मिळत असून, दलालमुक्त व्यवस्थेद्वारे सन्मानाचे आयुष्य जगण्यासाठी आणि शेतीला नवी उभारी देण्यासाठी हे पाऊल अत्यंत मोलाचे आणि आधारवड ठरले आहे.

- **थेट आर्थिक मदत :**
  दरवर्षी ₹६,००० थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून त्यांना बियाणे आणि खतांसाठी आधार दिला.
- **विक्रमी लाभार्थी :**
  आतापर्यंत ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात ₹३ लाख कोटींपेक्षा जास्त रक्कम जमा करण्यात आली आहे.
- **आत्मसन्मान :**
  शेतकऱ्याला 'मदत' म्हणून नव्हे, तर 'सन्मान निधी' म्हणून हा पैसा दिला जात आहे, ज्यामुळे त्यांचे मनोधैर्य वाढले.
- **पारदर्शक वितरण :**
  दलालांची साखळी तोडल्यामुळे पूर्ण रक्कम थेट शेतकऱ्याला मिळत आहे.





"पीएम किसान सन्मान निधी'च्या माध्यमातून आम्ही ही दलालांची आणि मध्यस्थांची साखळी कायमची मोडीत काढली आहे. आता एका क्लिकवर, हजारो कोटी रुपये थेट माझ्या शेतकरी बांधवांच्या बँक खात्यात जमा होत आहेत, ज्यामुळे त्यांना त्यांच्या कष्टाचा हक्क पूर्ण सन्मानाने आणि वेळेत मिळत आहे."

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना

प्रारंभ दिनांक- २६ मार्च २०२०

पंडित दीनदयाळजी म्हणायचे, "कोणीही उपाशी झोपू नये." कोरोनाच्या महासंकटात जेव्हा संपूर्ण जग ठप्प झाले होते, तेव्हा मोदीजींनी ८० कोटी पेक्षा अधिक भारतीयांना मोफत अन्नधान्य देण्याची घोषणा केली. हा जगातील सर्वात मोठा मानवतावादी कार्यक्रम आहे. या संकटकाळात सरकारने दिलेला हा आधार लाखो कुटुंबांसाठी जीवनदान ठरला असून, गरिबांच्या चुली पेटत्या ठेवून 'अंत्योदय' चा विचार प्रत्यक्ष कृतीत आणणारी ही सेवा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक आणि वंदनीय आहे.



- **मोफत रेशन :**
  पाच किलो धान्य प्रति महिना देऊन गरिबांना उपासमारीच्या भीतीतून मुक्त केले.
- **कुपोषण निर्मूलन :**
  केवळ धान्यच नाही, तर पौष्टिक कडधान्ये आणि फोर्टिफाईड तांदूळ देऊन अन्नाचा दर्जा सुधारला.
- **पारदर्शकता :**
  'वन नेशन वन रेशन कार्ड' मुळे स्थलांतरित मजुरांनाही या योजनेचा लाभ देशात कुठेही मिळत आहे.
- **सातत्य :**
  ही योजना २०२८ पर्यंत वाढवून सरकारने गरिबांना कायमस्वरूपी 'अन्न सुरक्षा' कवच दिले आहे.

"देशातील कोणताही गरीब उपाशी झोपू नये, हाच आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. या योजनेद्वारे कोट्यवधी गरिबांना मोफत रेशन देऊन संकटकाळात त्यांना अन्नसुरक्षा आणि सन्मानाचा मोठा आधार दिला आहे."



प्रधानमंत्री जन धन योजना

प्रारंभ दिनांक - २८ ऑगस्ट २०१४

पारदर्शकतेच्या पायाभरणीसाठी 'जन धन' हे सर्वात मोठे साधन ठरले. २०१४ पूर्वी देशातील निम्मी जनता बँकिंग व्यवस्थेच्या बाहेर होती. मोदीजींनी गरिबांचे खाते उघडून त्यांना देशाच्या अर्थव्यवस्थेशी सन्मानाने जोडले. या आर्थिक क्रांतीमुळे सरकारी योजनांचा पैसा थेट लोकांच्या खात्यात जमा होऊ लागल्याने भ्रष्टाचाराला कायमचा लगाम बसला असून, गरीब कुटुंबांच्या सामाजिक सुरक्षेसोबतच देशाच्या सर्वांगीण विकासाला आणि डिजिटल व्यवहारांना यामुळे अभूतपूर्व गती प्राप्त झाली आहे.

- **शून्य शिलकी खाते :**
  कोणत्याही शुल्काशिवाय ५५.४८ कोटींपेक्षा जास्त गरिबांची खाती उघडली गेली.
- **बचतीची सवय :**
  या खात्यांमध्ये आज ₹२.३७ लाख कोटींपेक्षा जास्त रक्कम जमा आहे, जी गरिबांच्या बचतीची ताकद दर्शवते.
- **विमा संरक्षण :**
  या खात्यासोबत अपघाती विमा आणि पेन्शन योजनांची जोड देऊन गरिबांना सामाजिक सुरक्षा दिली.
- **बँकिंग सेवांचा विस्तार :**
  या योजनेमुळे 'बँक मित्र' आणि डिजिटल पेमेंटला चालना मिळाली, ज्यामुळे गावागावांत बँकिंग सेवा पोहोचून ग्रामीण अर्थव्यवस्था मुख्य प्रवाहात आली.







"जेव्हा शेवटचा माणूस आर्थिकदृष्ट्या जोडला जातो, तेव्हा पूर्ण देश एकत्र पुढे जातो. प्रधानमंत्री जन-धन योजनेने हेच साध्य केले आहे..."

प्रधानमंत्री आवास योजना

प्रारंभ दिनांक - २५ जून २०१५

स्वतःचे पक्के घर असणे हे सन्मानाने जगण्याचे पहिले पाऊल आहे. "सर्वांसाठी घर" या संकल्पातून मोदीजींनी गरिबांच्या डोळ्यांतील स्वप्नांना आकार दिला. हे घर केवळ विटा-मातीचे नाही, तर ते 'जनकल्याणाचे' जिवंत उदाहरण आहे. आज या घरांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होत असून, सुरक्षित छताखाली वाढणाऱ्या नव्या पिढीच्या आयुष्यात स्थिरतेचा प्रकाश पडला आहे, ज्यामुळे भविष्यातील सशक्त आणि आत्मनिर्भर भारताचा आत्मविश्वास अधिक वृद्धिंगत होत आहे.

- **पक्की घरे :**
  गेल्या १२ वर्षात ग्रामीण आणि शहरी भागात मिळून ४ कोटींहून अधिक घरे बांधून पूर्ण झाली आहेत.
- **मूलभूत सुविधा :**
  घरासोबत शौचालय, वीज, नळाचे पाणी आणि गॅस कनेक्शन (उज्ज्वला) देऊन पूर्णत्वाचा अनुभव दिला.
- **महिलांचे सक्षमीकरण :**
  बहुतांश घरे महिलांच्या नावे करून त्यांना मालमत्तेचे अधिकार दिले.
- **वेगवान अंमलबजावणी :**
  पूर्वी एका घराला पूर्ण होण्यासाठी कित्येक वर्षे लागायची, आता प्रगत तंत्रज्ञानामुळे काही महिन्यांत घर उभे राहत आहे.



"घर केवळ चार भिंतींचे नसून, ते गरिबांच्या सन्मानाचे आणि स्वप्नांचे जिवंत उदाहरण आहे. 'पंतप्रधान आवास योजने'ने ४ कोटींहून अधिक पक्की घरे देऊन महिलांना मालमत्तेचा अधिकार आणि सक्षमीकरणाचा मोठा आधार दिला आहे."

स्टँड अप इंडिया

प्रारंभ दिनांक - ५ एप्रिल २०१६

अंत्योदय म्हणजे केवळ मदत नाही, तर हाताला काम आणि सन्मानाची संधी आहे. दलित, आदिवासी आणि महिलांना उद्योजक बनवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. या उपक्रमामुळे वंचित घटकांना आता आर्थिक स्वावलंबी होण्याचे बळ मिळत असून, स्वतःचा व्यवसाय उभा करून ते इतरांनाही रोजगार देऊ लागले आहेत, परिणामी समाजात सामाजिक समता आणि आर्थिक समृद्धीचे एक नवीन पर्व सुरू झाले आहे.

- **उद्योजकता प्रोत्साहन :**
  प्रत्येक बँकेच्या शाखेला किमान एका दलित/आदिवासी आणि एका महिला उद्योजकाला कर्ज देणे अनिवार्य केले.
- **तारणमुक्त कर्ज :**
  भांडवलाच्या अभावामुळे ज्यांच्या कल्पना प्रत्यक्षात येत नव्हत्या त्यांना हक्काचे कर्ज मिळाले.
- **स्वावलंबन :**
  या योजनेतून २.१४ लाखांहून अधिक नवे उद्योजक तयार झाले असून त्यांनी लाखो लोकांना रोजगार दिला आहे.
- **सामाजिक बदल :**
  नोकरी मागणाऱ्या हातांना 'नोकरी देणारे हात' बनवून समाजात मोठे परिवर्तन घडवले.





"तुम्ही कल्पना करू शकता की, आज जो नोकरी शोधणारा आहे, तो नोकरी देणारा बनेल. जो आज नोकरी शोधतो आहे, तो उद्या नोकरी देणारा बनेल. ही जी 'स्टँड अप' योजना आहे, ती आपल्या देशातील तरुणांसाठी रोजगाराची नवीन संधी आहे."

प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

प्रारंभ दिनांक- ९ मे २०१५

सामान्य माणसाला अपघाती मृत्यू किंवा अपंगत्वासारख्या संकटात वाऱ्यावर सोडू नये, यासाठी मोदीजींनी अत्यंत अल्प दरात ही सुरक्षा कवच देणारी योजना सुरू केली. केवळ काही रुपयांच्या प्रीमियममध्ये मिळणारे हे विमा संरक्षण गरिबांसाठी दुखाच्या काळात मोठा आधार ठरले असून, कुटुंबातील कमावती व्यक्ती गेल्यास कोसळणाऱ्या आर्थिक संकटापासून सर्वसामान्यांना वाचवून त्यांना एक भक्कम सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा आणि सन्मानाने जगण्याचे बळ दिले आहे.



- **उद्दिष्ट :**
  गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना परवडणाऱ्या दरात अपघाती विमा संरक्षण देणे.
- **वैशिष्ट्य :**
  केवळ वार्षिक २० रुपयांत (दिवसाला ७ पैशांहून कमी) २ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळते.
- **व्याप्ती :**
  आज कोट्यवधी भारतीयांनी या सुरक्षा कवचाचा लाभ घेतला असून, संकट काळात अनेक कुटुंबांना यामुळे मोठा आधार मिळाला आहे.
- **सुलभ नोंदणी प्रक्रिया :**
  ही योजना थेट बँक खात्याशी जोडली असल्यामुळे 'ऑटो-डेबिट' सुविधेद्वारे विमा हप्ता भरणे आणि क्लेम मिळवणे अत्यंत सोपे व पारदर्शक झाले आहे.

"गरिबांना संकटाच्या काळात कोणापुढेही हात पसरावे लागू नयेत, म्हणूनच अत्यंत कमी खर्चात हे सुरक्षा कवच दिले जात आहे."



प्रधानमंत्री मुद्रा योजना

प्रारंभ दिनांक- ८ एप्रिल २०१५

बँकेचे उंबरठे झिजवूनही कर्ज न मिळणाऱ्या 'नॉन-कॉर्पोरेट' आणि लहान व्यवसाय करणाऱ्यांना विना-तारण कर्ज देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी ही योजना आणली गेली. या सुलभ कर्जपुरवठ्यामुळे टपरीधारक, छोटे दुकानदार आणि कारागिरांच्या कौशल्याला मोठे प्रोत्साहन मिळाले असून, भांडवलाच्या अभावामुळे रखडलेली त्यांची प्रगती आता वेगाने होत आहे, परिणामी स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होऊन सामान्य माणसाच्या स्वप्नांना खऱ्या अर्थाने भरारी घेण्याचे बळ मिळाले आहे.

- **कर्ज श्रेणी :**
  शिशु, किशोर आणि तरुण अशा तीन श्रेणींमध्ये ५० हजारांपासून १० लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध आहे.
- **नवे उद्योजक :**
  मुद्रा योजनेमुळे देशात रोजगाराची नवीन संस्कृती निर्माण झाली असून, महिला आणि अनुसूचित जाती-जमातींमधील उद्योजकांना यात सर्वाधिक लाभ मिळाला आहे.
- **आत्मनिर्भरता :**
  आतापर्यंत ५० कोटींहून अधिक मुद्रा कर्ज मंजूर करण्यात आली असून, यातील मोठा हिस्सा हा नवीन उद्योजकांचा आहे.
- **विना-तारण सुविधा :**
  या योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कर्ज घेण्यासाठी कोणत्याही मालमत्तेचे तारण ठेवण्याची गरज नाही, ज्यामुळे गरिबांना सुलभ कर्ज मिळणे सोपे झाले आहे.





"तरुणांना नोकरी शोधणारे बनवण्याऐवजी नोकरी देणारे बनवणे, हेच आमचे ध्येय आहे."

विकसित भारत - जी राम - जी मिशन

प्रारंभ दिनांक- १ जुलै २०२६

ग्रामीण भागातील मजुरांना हक्काचा रोजगार मिळवून देण्यासाठी आणि गावे स्वयंपूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने 'मनरेगा' मध्ये सुधारणा करून हा नवीन कायदा लागू केला आहे. यामुळे कामाच्या ठिकाणी पारदर्शकता वाढली असून मजुरी थेट बँक खात्यात जमा होत आहे, परिणामी ग्रामीण पायाभूत सुविधांचे जाळे अधिक मजबूत होऊन मजुरांचे स्थलांतर थांबले आहे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी शाश्वत दिशा प्राप्त होऊन गावे विकासाच्या मुख्य प्रवाहात आली आहेत.



- **१२५ दिवसांचा रोजगार :**
  ग्रामीण भागातील प्रत्येक पात्र कुटुंबाला आता वर्षाकाठी १०० ऐवजी १२५ दिवस मजुरीच्या कामाची कायदेशीर हमी दिली जाते, ज्यामुळे ग्रामीण उत्पन्नात वाढ झाली आहे.
- **शाश्वत विकास आणि पायाभूत सुविधा :**
  केवळ तात्पुरती कामे न करता गावात पक्के रस्ते, सिंचन आणि जलसंधारणासारखी कायमस्वरूपी कामे करून गावाचा विकास करण्यावर या अभियानाचा मुख्य भर आहे.
- **पारदर्शक डिजिटल कारभार :**
  मजुरांची उपस्थिती बायोमेट्रिक पद्धतीने नोंदवून त्यांची मजुरी थेट बँक खात्यात जमा केली जाते, तसेच प्रत्येक कामाचे नियोजन 'विकसित ग्राम पंचायत आराखडा'द्वारे अत्यंत पारदर्शकपणे केले जाते.
- **कौशल्य विकासावर भर :**
  या मिशन अंतर्गत मजुरांना विविध तांत्रिक कौशल्य प्रशिक्षण दिले जात आहे, ज्यामुळे त्यांना गावातच सन्मानाने अधिक चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

"हा नवीन विकसित भारत - जी राम - जी कायदा ग्रामीण भागातील उत्पन्न वाढवणे, मालमत्तांची निर्मिती, शेतीची स्थिरता आणि दीर्घकालीन ग्रामीण उत्पादकता यांना वेगळे न ठेवता एकाच साखळीत जोडण्याचे काम करतो."



विकासाचे प्रगतीपुस्तक

लोककल्याणकारी भारताची तपपूर्ती

पीएम किसान सन्मान निधी

एनडीए सरकारचे विकासपर्व

११.८ कोटी+ लाभार्थी शेतकरी; ₹४.२७ लाख कोटींहून अधिक रक्कम थेट खात्यात जमा.

यूपीए सरकारची दुरावस्था

शेतकऱ्यांसाठी कोणतीही थेट रोख मदत योजना नव्हती. दलाल आणि मध्यस्थांचा सुळसुळाट होता.

गरीब कल्याण अन्न योजना

एनडीए सरकारचे विकासपर्व

८१.३५ कोटी नागरिकांना मोफत धान्य; १००% डिजिटल आणि पारदर्शक वितरण व्यवस्था.

यूपीए सरकारची दुरावस्था

रेशन वितरण भ्रष्ट होते; गरिबांच्या धान्याची मोठी चोरी होत असे.

जन धन बँक खाते

एनडीए सरकारचे विकासपर्व

५७.८ कोटी+ नवीन बँक खाती; ₹२९४ लाख कोटींहून अधिक गरिबांची एकूण बचत.

यूपीए सरकारची दुरावस्था

देशातील ५०% पेक्षा जास्त जनता बँकिंग व्यवस्थेच्या पूर्णपणे बाहेर होती.

पीएम आवास योजना

एनडीए सरकारचे विकासपर्व

ग्रामीण आणि शहरी भागात मिळून ४.२१ कोटी पेक्षा अधिक पक्की घरे पूर्ण; यातील ७४% घरे महिलांच्या नावे आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

गरिबांना पक्की घरे मिळणे कठीण होते.

स्टँड अप इंडिया

एनडीए सरकारचे विकासपर्व

५ एप्रिल २०१६ रोजी 'स्टँड अप इंडिया' सुरू झाली. अधिकृत माहितीनुसार, १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ₹६२,८०७ कोटींहून अधिक रक्कम २.७५ लाखांहून अधिक लाभार्थींना मंजूर करण्यात आली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

अनुसूचित जाती, जमाती आणि महिलांसाठी ₹१० लाखांच्या वरील मोठ्या व्यवसायांसाठी कोणतीही स्वतंत्र कर्ज हमी योजना नव्हती.

मुद्रा योजना (व्यापार)

एनडीए सरकारचे विकासपर्व

५० कोटी+ कर्ज मंजूर; ₹२७ लाख कोटींहून अधिक भांडवल उपलब्ध. ७०% लाभार्थी महिला.

यूपीए सरकारची दुरावस्था

छोटे उद्योग सुरू करण्यासाठी बँकांकडून विना-तारण कर्ज मिळणे अशक्य होते.

पीएम सुरक्षा विमा

एनडीए सरकारचे विकासपर्व

५७.११ कोटी नागरिक नोंदणीकृत; अवघ्या ₹२० मध्ये ₹२ लाखांचे अपघाती विमा कवच.

यूपीए सरकारची दुरावस्था

अपघात झाल्यास गरीब कुटुंबाला आर्थिक आधार देणारी कोणतीही व्यवस्था नव्हती.

विकसित भारत - जी राम - जी मिशन

एनडीए सरकारचे विकासपर्व

एनडीए सरकारने विविध मिशन आणि योजनांद्वारे गेल्या १२ वर्षांत १७.१९ कोटी नवीन रोजगार आणि आजीविकेच्या संधी निर्माण केल्या आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

यूपीए काळात १० वर्षांत देशात रोजगाराच्या संधी मर्यादित राहिल्या.

धरतीआबा जनजातीय अभियान

एनडीए सरकारचे विकासपर्व

६३,८४३ गावांच्या विकासासाठी ₹७९,१५६ कोटींचे 'धरती आबा अभियान' आणले, एकलव्य शाळांची संख्या ७२८ झाली २३ लाखांहून अधिक कुटुंबांना जमिनीचे मालकी हक्क दिले.

यूपीए सरकारची दुरावस्था

UPA धोरणात्मक उदासीनतेमुळे दुर्गम भागात काहीही ठोस काम होत नव्हते. १० वर्षांत योजनांचा वेग अत्यंत संथ होता.



सुरक्षित भारत, संरक्षित भारत

वज्रनिर्धार: नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील बलशाली भारताचा उदय
'राष्ट्र प्रथम' संस्कारातून आकाराला आलेली सामर्थ्यशाली सुरक्षा नीती

'भारत अंत्योदय' च्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकाला समृद्धी मिळवून देत असतानाच, त्या समृद्धीचे रक्षण करणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वोच्च ध्येय होते. मोदीजींचा असा ठाम विश्वास होता की, "जेव्हा देश सुरक्षित असतो, तेव्हाच जनकल्याणाचा पाया भक्कम होतो." हीच दृष्टी समोर ठेवून त्यांनी संरक्षण क्षेत्राला नवे चैतन्य आणि आधुनिकतेची दिशा देण्याचे ठरवले. या मोहिमेत मोदीजींनी संरक्षण मंत्रालयाची धुरा गोव्याचे सुपुत्र स्व. मनोहर पर्रीकर यांच्याकडे सोपवली. पर्रीकर यांचे तांत्रिक कौशल्य आणि मोदीजींचा राजकीय दृढनिश्चय या जोडगोळीने भारताच्या सुरक्षा धोरणात एक मोठे परिवर्तन घडवून आणले.

नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात भारताच्या संरक्षण धोरणाने 'मृदू' कडून 'कठोर धोरणाकडे पावले टाकली . २०१४ पूर्वीचा भारत हा सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादाला केवळ निषेध पत्रांनी उत्तर देणारा देश म्हणून ओळखला जायचा . मात्र, मोदीजींनी पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेताच भारतीय सैन्याला संदेश दिला की, "आता गोळीला गोळीनेच उत्तर दिले जाईल आणि तेही शत्रूच्या घरात शिरून." २०१६ चा सर्जिकल स्ट्राईक असो वा २०१९ चा बालाकोट एअरस्ट्राईक, या ऐतिहासिक निर्णयांच्या केंद्रस्थानी मोदीजींची कणखर इच्छाशक्ती होती.

'भा-ज-पा' त्रिसूत्रीमधील 'भारतीयत्व' आणि 'पारदर्शकता' या सुरक्षा धोरणाचा कणा बनली. मोदीजींनी केवळ शस्त्रे खरेदी करण्यावर भर न देता, 'मेक इन इंडिया' च्या माध्यमातून भारताला संरक्षण उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्याचे स्वप्न पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संरक्षण खरेदीतील मध्यस्थांची साखळी तोडून भ्रष्टाचाराला पूर्णविराम मिळाला आणि पारदर्शकता आली. आज भारत केवळ शस्त्रास्त्र आयात करणारा देश उरला नसून, तो जगाला शस्त्रास्त्रे निर्यात करणारा देश बनला आहे. नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी मोदीजींनी आखलेली 'समाधान' रणनीती असो किंवा सीमांवरील जवानांना दिलेली अत्याधुनिक साधने, या प्रत्येक पाऊलाने भारताला अंतर्गत आणि बाह्य अशा दोन्ही आघाड्यांवर अभेद्य बनवले आहे.

भाजपा
महाराष्ट्र



झिरो टॉलरन्स

प्रारंभ दिनांक- २६ मे २०१४

उरीमधील भ्याड हल्ल्यानंतर भारताने पहिल्यांदा संयमाचा बांध तोडून शत्रूच्या घरात घुसून प्रहार केला. हे धाडस मनोहर पर्रीकरांच्या अचूक नियोजनाचे आणि मोदीजींच्या कणखर नेतृत्वाचे फलित होते. या नव्या धोरणामुळे देशाच्या सीमा सुरक्षा रणनीतीत ऐतिहासिक बदल झाला असून, भारताच्या अखंडतेशी खेळणाऱ्या कोणत्याही कुरापतीला जागच्या जागी चिरडणारा एक प्रबळ आणि सडेतोड भारत आज जगासमोर उभा आहे.

- **सर्जिकल स्ट्राईक - उरी (२८-२९ सप्टेंबर २०१६) :**
  उरी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर; भारतीय लष्कराच्या विशेष पथकाने नियंत्रण रेषेपलीकडे जाऊन दहशतवादी लाँच पॅड्सचा यशस्वी नायनाट केला.

- **बालाकोट एअर स्ट्राईक (२६ फेब्रुवारी २०१९) :**
  पुलवामा हल्ल्यानंतर हवाई दलाची धाडसी मोहीम; पाकिस्तानच्या हद्दीत घुसून बालाकोटमधील 'जैश-ए-मोहम्मद'चे मुख्य दहशतवादी तळ जमीनदोस्त केले.

- **ऑपरेशन सिंदूर (७ मे २०२५) :**
  पहलगाम येथील पर्यटक हल्ल्यानंतर लष्कर, हवाई दल आणि नौदलाची संयुक्त कारवाई; सीमेपलीकडील ९ प्रमुख दहशतवादी तळांवर अचूक क्षेपणास्त्र व हवाई हल्ले.

- **सुरक्षेचा नवा मापदंड आणि जरब :**
  सीमेपलीकडील कोणत्याही कुरापतीला आणि दहशतवादाला भारत आता त्याच्याच भाषेत सडेतोड आणि कठोर लष्करी उत्तर देईल, हा कडक संदेश.






"हे कोणाचेही अणुधमक्यांना घाबरणारे सरकार नाही. हा नवा भारत आहे, हा शत्रूच्या घरात घुसून मारतो."

नक्षलवाद आणि समाधान धोरण

प्रारंभ दिनांक- ८ मे २०१७

अंतर्गत सुरक्षेसाठी सर्वात मोठा धोका असलेल्या नक्षलवादाला संपवण्यासाठी सरकारने 'समाधान' ही व्यापक रणनीती आखली. यामुळे आज नक्षलवादाचा प्रभाव केवळ काही जिल्ह्यांपुरता मर्यादित राहिला आहे. या आक्रमक मोहिमेमुळे नक्षलवाद्यांच्या अर्थपुरवठ्यावर घाला घातला गेला असून, दुर्गम भागात रस्ते, शिक्षण आणि आरोग्य सुविधांचे जाळे विणल्यामुळे तेथील तरुणाई आता शस्त्रांऐवजी विकासाची कास धरत आहे, ज्यामुळे देश हिंसेकडून शाश्वत शांततेच्या आणि प्रगतीच्या मार्गावर वेगाने मार्गक्रमण करत आहे.



- **रेड कॉरीडॉर नष्ट :**
  २०१४ मध्ये १२६ जिल्हे नक्षलग्रस्त होते, ती संख्या २०२६ पर्यंत १०-१५ च्या खाली आली आहे.

- **अत्याधुनिक साधने :**
  नक्षली भागांत लढण्यासाठी कोब्रा बटालियनला अधिक सक्षम करून त्यांना आधुनिक शस्त्रे आणि तंत्रज्ञान दिले.

- **विकास आणि सुरक्षा :**
  केवळ बंदूक नाही, तर नक्षलग्रस्त भागात रस्ते, शाळा आणि मोबाईल टॉवर्स पोहोचवून तिथल्या जनतेचा मुख्य प्रवाहावर विश्वास वाढवला, त्यांना या प्रवाहात सामील करून घेतले.

- **शरणगती आणि पुनर्वसन :**
  हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात येणाऱ्या तरुणांसाठी सरकारने प्रभावी पुनर्वसन धोरण राबवले आहे, ज्यामुळे नक्षलवाद्यांचे संख्याबळ वेगाने घटत आहे.




"आम्ही माओवादी हिंसाचार संपवण्यासाठी २०१५ मध्ये 'राष्ट्रीय कृती आराखडा' तयार केला. हिंसेविरुद्ध 'झिरो टॉलरन्स' ठेवण्यासोबतच, गरिबांचे जीवन बदलण्यासाठी पायाभूत सुविधा आणि सामाजिक सक्षमीकरणावर आमचा मुख्य भर आहे .

युएपीए कायदा

प्रारंभ दिनांक- १४ ऑगस्ट २०१९

दहशतवादाविरुद्ध 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवण्यासाठी सरकारने युएपीए कायद्यात कठोर बदल केले. यामुळे दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांना चाप बसला. या सुधारित कायद्यामुळे आता दहशतवादी संघटनांसोबतच हिंसक कारवायांमध्ये सामील असणाऱ्या व्यक्तींनाही वैयक्तिकरित्या दहशतवादी घोषित करण्याचे अधिकार तपास यंत्रणांना मिळाले आहेत, ज्यामुळे देशाच्या एकात्मतेशी खेळणाऱ्या देशद्रोही शक्तींचे कंबरडे मोडले असून भारताची सुरक्षा व्यवस्था पूर्वीपेक्षा अधिक अभेद्य आणि सामर्थ्यशाली बनली आहे, हे निश्चित आहे .

- **दहशतवादी घोषित करणे :**
  केवळ संघटनाच नाही, तर व्यक्तीलाही दहशतवादी घोषित करण्याचा अधिकार मिळाल्याने कारवाईला गती आली.
- **आर्थिक नाकेबंदी :**
  दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा (Terror Funding) रोखण्यासाठी कडक पावले उचलली, ज्यामुळे देशांतर्गत होणाऱ्या बॉम्बस्फोटांच्या मालिका कायमच्या थांबल्या.
- **तपास यंत्रणांचे सक्षमीकरण :**
  दहशतवादी कृत्यांतून मिळवलेली मालमत्ता जप्त करण्यासाठी राज्य पोलिसांच्या परवानगीची अट काढून तपासाचे अधिकार आता इन्स्पेक्टर रँकपर्यंत देण्यात आले आहेत.
- **पुराव्यांचे बळकटीकरण :**
  तांत्रिक आणि सायबर पुरावे गोळा करण्याच्या अधिकारांमुळे दहशतवाद्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढले असून तपासात पारदर्शकता आली आहे.





"सुरक्षा दलांचे शौर्य आणि कडक कायद्यांच्या बळावर आपण देशातील जनतेला सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण देण्यात यशस्वी ठरलो आहोत."

सीमा सुरक्षा सक्षमीकरण अटल टनल

प्रारंभ दिनांक- ३ ऑक्टोबर २०२०

चीन आणि पाकिस्तान सीमेवर भारताची पकड मजबूत करण्यासाठी सीमावर्ती पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक करण्यात आली. इंडो तिबेटन बॉर्डर पोलीस जवानांना उंच डोंगराळ भागात राहण्यासाठी आधुनिक सोयीसुविधा दिल्या गेल्या. या धोरणात्मक बदलामुळे दुर्गम सीमाभागांत बाराही महिने कनेक्टिव्हिटी देणारे रस्ते आणि बोगद्यांचे जाळे निर्माण झाले असून, आव्हानात्मक हवामानातही आपल्या वीर जवानांचे मनोबल उंचावून देशाच्या सीमा आता अधिक सुरक्षित आणि अभेद्य बनल्या आहेत.



- **सीमा रस्ते :**
  दुर्गम भागात हजारो किलोमीटरचे रस्ते आणि अटल टनेलसारखे बोगदे बांधून सैन्याची हालचाल वेगवान केली.
- **आधुनिक शस्त्रास्त्रे :**
  राफेल विमाने, एस-४०० सिस्टीम आणि स्वदेशी 'तेजस' विमानांमुळे भारतीय वायू दलाची ताकद वाढली.
- **व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम :**
  सीमेवरील गावे ओस पडू नयेत म्हणून तिथे पायाभूत सुविधा देऊन 'प्रथम गाव' संकल्पना राबवली, ज्यामुळे सीमा सुरक्षा अधिक भक्कम झाली.
- **संरक्षण आत्मनिर्भरता :**
  शस्त्रे आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारत आता स्वावलंबी झाला असून, स्वदेशी बनावटीच्या 'ब्राह्मोस' आणि 'आकाश' क्षेपणास्त्रांमुळे जगाने भारताची दखल घेतली आहे.

"माझा देशाच्या सुरक्षा दलांवर आणि सीमेवर तैनात असलेल्या जवानांवर पूर्ण विश्वास आहे. आमचे धोरण स्पष्ट आहे - देशाच्या सीमा जेवढ्या पायाभूत सुविधांनी मजबूत आणि सुरक्षित असतील, तेवढाच देश अधिक सुरक्षित राहील."



विकासाचे प्रगतीपुस्तक

बलशाली भारताची तपपूर्ती

झिरो टॉलरन्स

एनडीए सरकारचे विकासपर्व

केंद्र सरकारने २०१६ मध्ये सर्जिकल स्ट्राईक आणि २०१९ मध्ये बालाकोट एअरस्ट्राईक करून दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिले, ज्यामुळे दहशतवादी हिंसाचारात ७०% घट झाली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

तत्कालीन केंद्र सरकारने सीमेपलीकडील दहशतवादावर कोणतीही मोठी लष्करी कारवाई केली नाही आणि त्यांच्या कार्यकाळात देशात ७,२१७ दहशतवादी घटनांची नोंद झाली.

नक्षलवाद निर्मूलन

एनडीए सरकारचे विकासपर्व

३१ मार्च २०२६ रोजी बहुतांशी भारत नक्षलवाद मुक्त. 'समाधान' धोरणामुळे नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या १५ पेक्षा कमी झाली आहे आणि सुरक्षा दलांच्या मृत्यूच्या प्रमाणात ७३% घट झाली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

त्या काळात देशातील एकूण १२६ जिल्हे नक्षलवादाने ग्रासलेले होते आणि दरवर्षी सरासरी ६०० हून अधिक हिंसक घटनांची नोंद होत असे.

युएपीए आणि अंतर्गत सुरक्षा

एनडीए सरकारचे विकासपर्व

(युएपीए) कायद्यात सुधारणा करून व्यक्तीला दहशतवादी घोषित करण्याचे अधिकार दिले गेले असून (एनआयए) ने ९५% गुन्हेगारांना दोषसिद्धी मिळवून देऊन अंतर्गत सुरक्षा मजबूत केली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे अत्यंत मर्यादित अधिकार होते आणि त्या काळात देशातील प्रमुख शहरांमध्ये वारंवार बॉम्बस्फोट होऊन नागरिक असुरक्षित होते.

सीमा सुरक्षा आणि बजेट

एनडीए सरकारचे विकासपर्व

२०२६ पर्यंत संरक्षण बजेट वाढवून ₹७.८५ लाख कोटी करण्यात आले असून सीमा रस्ते बांधणीच्या वेगात ३५०% वाढ झाली आहे व अटल टनेलसारखे प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

२०१४ मध्ये देशाचे संरक्षण बजेट ₹२.५३ लाख कोटी इतके मर्यादित होते आणि सीमावर्ती भागातील रस्ते बांधणीचे काम अत्यंत संथ गतीने सुरू होते.

संरक्षण उत्पादन

एनडीए सरकारचे विकासपर्व

शस्त्रे परदेशातून आयात; संरक्षण निर्यातीत देश मागे होता. देश शस्त्रास्त्रांमध्ये आत्मनिर्भर; ऐतिहासिक ₹२१,०८३ कोटींची रेकॉर्डब्रेक संरक्षण निर्यात पूर्ण.

यूपीए सरकारची दुरावस्था

लष्करी गरजांसाठी ७०% पेक्षा जास्त शस्त्रे परदेशातून आयात; संरक्षण निर्यातीत देश मागे होता.

ईशान्य भारत सुरक्षा

एनडीए सरकारचे विकासपर्व

शांतता करारांमुळे ११,००० पेक्षा जास्त बंडखोरांचे आत्मसमर्पण; अफस्पा कायदा ७५% भागातून हटवला.

यूपीए सरकारची दुरावस्था

बोडो आणि उल्फा यांसारख्या फुटीरतावादी बंडखोरांमुळे संपूर्ण ईशान्य भारत हिंसेने धुमसत होता.



पारदर्शक भारत - भ्रष्टाचारमुक्त प्रशासनपर्व


पारदर्शकतेचा महामंत्र: 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' ते डिजिटल क्रांतीपर्यंतचा प्रवास तंत्रज्ञान आणि नीतिमत्तेचा संगम: नव्या भारताची कार्यसंस्कृती

'बलशाली भारता'च्या निर्मितीसाठी सीमा सुरक्षित करणे जेवढे महत्त्वाचे होते, तेवढेच देशाच्या अंतर्गत व्यवस्थेला भ्रष्टाचाराच्या वाळवीपासून वाचवणे आवश्यक होते. 'राष्ट्र प्रथम' हे धोरण राबवताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समोर सर्वात मोठे आव्हान होते, ते म्हणजे सरकारी तिजोरीतून निघालेला पैसा मधल्या मध्यस्थांची साखळी तोडून थेट गरजूच्या हाती पोहोचवणे.काँग्रेसच्या काळात म्हटलं जायचं की, "दिल्लीतून १ रुपया निघतो, पण गरिबांपर्यंत फक्त १५ पैसे पोहोचतात." ही जुनी व्यवस्था मुळापासून उपटून काढण्यासाठी मोदीजींनी 'पारदर्शकतेचा' पाया रचला.

या १२ वर्षांच्या प्रवासात मोदीजींनी केवळ घोषणा केल्या नाहीत, तर 'डिजिटल इंडिया'च्या माध्यमातून प्रशासनाचे पूर्णपणे लोकशाहीकरण केले. जेव्हा तंत्रज्ञान आणि सामान्य माणूस यांची भेट होते, तेव्हा भ्रष्टाचाराला जागा उरत नाही, हे त्यांनी जगाला दाखवून दिले. सरकारी कार्यालयांच्या पायऱ्या झिजवणारा भारत आता मोबाईलच्या एका क्लिकवर सेवा मिळवणारा 'ई-गव्हर्नन्स' भारत झाला आहे. रिअल इस्टेटमध्ये सामान्य माणसाची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी आलेला 'रेरा' (RERA) असो किंवा डबघाईला आलेल्या कंपन्यांच्या वसुलीसाठी आलेला 'आयबीसी' (IBC), या प्रत्येक कायद्यामागे एकच उद्देश होता 'प्रामाणिक भारतीयाचा सन्मान आणि लुटारूंना चपराक'.

'भा-ज-पा' त्रिसूत्रीमधील **'पा - पारदर्शकता'** हा केवळ राजकीय शब्द राहिला नाही, तर ती एक कार्यसंस्कृती बनली. स्वदेशी तंत्रज्ञानाचा अभिमान बाळगत, 'जेम' (GeM) सारख्या पोर्टलद्वारे सरकारी खरेदी पारदर्शक केली गेली. यामुळे करदात्यांच्या पैशाची बचत झाली आणि उद्योजकांना समान संधी मिळाली. अंत्योदयाचा लाभ देताना झालेली ही 'पारदर्शक' क्रांती म्हणजे खऱ्या अर्थाने 'पारदर्शक भारत' निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले सर्वात मोठे पाऊल आहे.

भाजपा
महाराष्ट्र



थेट लाभ हस्तांतरण

प्रारंभ दिनांक - १५ नोव्हेंबर २०१४

सरकारी योजनांमधील अपव्यय थांबवण्यासाठी मोदीजींनी 'जन धन-आधार-मोबाईल' ही त्रिसूत्री वापरून क्रांती घडवली. या अभेद्य प्रणालीमुळे मध्यस्थांची साखळी मोडीत निघाली असून, शासनाकडून मिळणारी मदतीची रक्कम आता थेट लाभार्थ्यांच्या खात्यात सुरक्षितपणे जमा होत आहे. यामुळे गळती थांबून सरकारी तिजोरीतील कोट्यवधी रुपयांची बचत झाली आहे, तसेच शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकपणे सेवा पोहोचवल्यामुळे डिजिटल क्रांतीसोबतच सामाजिक न्यायाचे एक नवीन आणि यशस्वी पर्व देशात सुरू झाले.

- **थेट लाभ :**
  ५०० पेक्षा जास्त योजनांचे पैसे आता थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होतात.
- **बचत :**
  मध्यस्थांना हटवल्यामुळे सरकारी तिजोरीचे ₹३.४८ लाख कोटींपेक्षा जास्त रुपये वाचले आहेत.
- **पारदर्शकता :**
  लाचखोर संस्कृतीचा अंत झाला असून पूर्ण रक्कम लाभार्थ्याला मिळत आहे.
- **बोगस लाभार्थ्यांना चाप :**
  डिजिटल पडताळणीमुळे व्यवस्थेतील बोगस नावे कायमची हटवण्यात आली असून, खऱ्या लाभार्थ्यांना विनाविलंब हक्काचा पैसा मिळत आहे.





"पूर्वी वरून पाठवलेल्या एका रुपयातील फक्त १५ पैसे गरिबांपर्यंत पोहोचायचे. पण आम्ही 'जॅम ट्रिनिटी' त्रिसूत्रीच्या साहाय्याने ती लूट थांबवली असून, आता गरिबांचा पैसा थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होत आहे."

रेरा

प्रारंभ दिनांक- १ मे २०१७

घर खरेदी करणाऱ्या सामान्य माणसाला बिल्डरांच्या जाचातून मुक्त करण्यासाठी आणि रिअल इस्टेट क्षेत्रात विश्वासार्हता आणण्यासाठी हा कायदा मोदीजींनी आणला. यामुळे प्रकल्पांना विलंब लावणाऱ्या विकासकांना जरब बसली असून, ग्राहकांच्या कष्टाच्या पैशाला कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. पारदर्शकता वाढल्यामुळे घरांचे तावा मिळण्याचे प्रमाण वाढले असून, सर्वसामान्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न कोणत्याही फसवणुकीशिवाय पूर्ण होण्यासाठी या कायद्याने रिअल इस्टेट क्षेत्रात मोठी शिस्त आणि क्रांती आणली आहे.



- **ग्राहक संरक्षण :**
  वेळेवर घराचा ताबा न मिळाल्यास बिल्डरांना आता व्याजासह मोठा दंड आणि परतावा द्यावा लागतो.
- **नोंदणी :**
  प्रत्येक प्रकल्प 'रेरा' अंतर्गत नोंदणीकृत असणे अनिवार्य झाल्यामुळे अनधिकृत बांधकामे आणि ग्राहकांची फसवणूक थांबली आहे.
- **पारदर्शकता :**
  घराच्या किमती, कारपेट एरिया आणि सोयीसुविधांबाबत स्पष्टता आली असून ग्राहकांना बांधकामाची प्रगती ऑनलाईन पाहता येते.
- **फंडचा गैरवापर थांबला :**
  प्रकल्पासाठी जमा झालेल्या रकमेचा मोठा हिस्सा त्याच कामासाठी वापरणे बंधनकारक केल्यामुळे अपूर्ण प्रकल्पांची संख्या घटली आहे.

"घर खरेदी करणे हे मध्यमवर्गाचे स्वप्न असते. 'रेरा'कायद्यामुळे आम्ही विकासक आणि ग्राहकांमध्ये पारदर्शकता आणली असून, घर खरेदीदारांचा कष्टाचा पैसा वर्षानुवर्षे अडकून पडण्याच्या त्रासातून त्यांना मुक्त केले आहे."



दिवाळखोरी आणि नादारी संहिता

प्रारंभ दिनांक- २८ मे २०१६

मोठ्या उद्योजकांनी बँकांचे पैसे बुडवण्याची प्रथा मोदीजींनी या कायद्याद्वारे मोडीत काढली. या कडक कायदेशीर प्रक्रियेमुळे कर्ज थकवणाऱ्या बड्या धेंडांची मालमत्ता जप्त करून बँकांची थकीत रक्कम वसूल करणे आता शक्य झाले आहे. देशाच्या बँकिंग क्षेत्रात मोठी आर्थिक शिस्त आली असून, सर्वसामान्यांच्या कष्टाचा पैसा सुरक्षित झाला आहे. प्रामाणिक उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्माण होऊन भारताची अर्थव्यवस्था अधिक पारदर्शक, बळकट आणि जागतिक स्तरावर विश्वासार्ह बनली आहे .

- **बँकांचे पैसे परत :**
  बुडीत कर्जाच्या (NPA) वसुलीसाठी एक वेगवान यंत्रणा उभी राहिली असून बँकांची आर्थिक स्थिती सुधारली आहे.
- **वसुली :**
  आतापर्यंत ₹३ लाख कोटींहून अधिक रक्कम बँकांनी या कायद्याद्वारे वसूल केली असून मोठ्या थकबाकीदारांना चाप बसला आहे.
- **प्रामाणिक व्यापार :**
  उद्योग बंद करणे किंवा सुरू करणे यातील कायदेशीर गुंतागुंत कमी होऊन व्यावसायिक सुलभता वाढली आहे.
- **वेळेची बचत :**
  कर्ज वसुलीची प्रक्रिया ठराविक कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक केल्यामुळे बँकिंग व्यवस्थेतील पारदर्शकता आणि वेग वाढला आहे.





"आयबीसी कायद्याने भारतातील व्यावसायिक व्यवस्थेला एक नवीन शिस्त दिली आहे. हा कायदा कर्ज बुडवणाऱ्यांवर कारवाई करण्यासोबतच प्रामाणिक उद्योजकांना कायदेशीर संरक्षण देऊन वेळेत तोडगा काढण्याची संधी देतो."

डिजिटल इंडिया

प्रारंभ दिनांक- १ जुलै २०१५

सरकारी सेवा घराघरात पोहोचवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून मोदीजींनी भारताला जगातील डिजिटल महासत्ता बनवले. आज गावोगावी पोहोचलेल्या इंटरनेटमुळे दुर्गम भागातील नागरिकांनाही सरकारी योजनांचा लाभ एका क्लिकवर मिळणे शक्य झाले आहे. पारदर्शक कारभार आणि भ्रष्टाचाराला मिळालेली मूठमाती यामुळे सर्वसामान्यांचे जीवन सुसह्य झाले असून, भारताच्या या गतिमान डिजिटल क्रांतीने जागतिक स्तरावर विकासाचे एक नवीन आणि प्रेरणादायी मॉडेल निर्माण करून देशाला प्रगतीच्या सर्वोच्च शिखरावर नेले आहे.



- **ई-सेवा :**
  पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, रेशन कार्ड यांसारख्या अनेक सरकारी सेवा आता मोबाईलवर एका क्लिकवर उपलब्ध आहेत.
- **GeM पोर्टल :**
  सरकारी खरेदीसाठी 'गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस' तयार करून भ्रष्टाचाराला आळा घातला आणि पारदर्शकता आणली.
- **डिजिटल व्यवहार :**
  यूपीआय मुळे रोखीची गरज कमी झाली असून, चहाच्या टपरीपासून मोठ्या मॉलपर्यंत व्यवहार सुरक्षित आणि वेगवान झाले आहेत.
- **डिजिटल साक्षरता :**
  ग्रामीण भागातील नागरिकांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन त्यांना डिजिटल क्रांतीच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यात आले आहे.



"डिजिटल इंडिया हे सामान्य नागरिकाच्या सक्षमीकरणाचे माध्यम आहे. आज जगातील ४० टक्क्यांहून अधिक डिजिटल व्यवहार भारतात होत असून, या प्रणालीने शेवटच्या टोकापर्यंत सेवा पोहोचवणे सुलभ केले आहे."

स्वदेशी प्रणाली

प्रारंभ दिनांक- १२ मे २०२०

केवळ परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता स्वतःची डिजिटल इकोसिस्टम उभी करण्यावर मोदीजींनी भर दिला. आज युपीआय सारख्या स्वदेशी प्रणालीने जागतिक स्तरावर भारताचा दबदबा निर्माण केला असून, डेटा सुरक्षेसोबतच आत्मनिर्भरतेचे नवे दालन उघडले आहे. स्वदेशी ॲप्स आणि सॉफ्टवेअर निर्मितीला दिलेल्या प्रोत्साहनामुळे भारतीय तरुणांच्या बुद्धिमत्तेला जागतिक व्यासपीठ मिळाले असून, तंत्रज्ञान क्षेत्रात भारत आता केवळ वापरकर्ता न राहता जगाला दिशा देणारा निर्माता बनला आहे.

- **स्वदेशी ॲप्स आणि प्रणाली :**
  यूपीआय आणि रू-पे सारख्या स्वदेशी प्रणालींनी जगाचे लक्ष वेधले.
- **आर्थिक सार्वभौमत्व :**
  भारताचा पैसा भारतातच राहिला आणि जागतिक कंपन्यांच्या मक्तेदारीला आव्हान मिळाले.
- **आत्मनिर्भर उत्पादन (पीएलआय योजना) :**
  लेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर आणि औषध निर्मितीसारख्या १४ महत्त्वाच्या क्षेत्रांत 'पीएलआय' योजनेद्वारे उत्पादनाला प्रोत्साहन दिल्यामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन भारत निर्यातदार बनला.
- **डेटा सुरक्षा :**
  स्वदेशी तंत्रज्ञानाच्या वापरामुळे नागरिकांची वैयक्तिक माहिती आणि देशाचा डेटा सुरक्षित राहण्यास मदत झाली आहे.





"मी तरुणांना आवाहन करतो की त्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यांचे संकल्पात रूपांतर करावे. आत्मनिर्भरता हाच आपल्या देशासमोरील अनेक आव्हानांवर आणि समस्यांवर खऱ्या अर्थाने कायमस्वरूपी तोडगा आहे."

उद्यम नोंदणी

प्रारंभ दिनांक- ९ जुलै २०२०

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना अधिकृत ओळख मिळवून देण्यासाठी मोदीजींनी अत्यंत सोपी आणि 'पारदर्शक' अशी उद्यम नोंदणी प्रक्रिया सुरू केली. या डिजिटल प्रणालीमुळे कागदपत्रांचा अडथळा दूर होऊन उद्योजकांना सरकारी योजना, सुलभ कर्ज आणि सवलतींचा लाभ मिळणे सुकर झाले . यामुळे छोट्या उद्योगांना व्यायावसायिक प्रतिष्ठा प्राप्त झाली असून, स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी उभारी मिळाली आहे.



- **पेपरलेस प्रक्रिया :**
  नोंदणीसाठी कोणत्याही कागदपत्रांची गरज नसून, केवळ आधार क्रमांकाचा वापर करून विनामूल्य नोंदणी शक्य झाली आहे.
- **सक्षमीकरण :**
  आतापर्यंत ७ कोटींहून अधिक एमएसएमई या पोर्टलवर नोंदणीकृत झाल्या असून, त्यांना सरकारी योजनांचा लाभ थेट मिळत आहे.
- **पारदर्शकता :**
  नोंदणी होताच उद्योजकांना 'उद्यम प्रमाणपत्र' मिळते, ज्यामुळे त्यांना बँकांकडून कर्ज मिळणे आणि जागतिक बाजारपेठेत ओळख निर्माण करणे सोपे झाले आहे.
- **प्राधान्य आणि सवलती :**
  या नोंदणीमुळे उद्योजकांना सरकारी कंत्राटांमध्ये प्राधान्य, वीज बिलात सवलत आणि कर्जावरील व्याजात विशेष सवलती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



"आमचे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) हे भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहेत. 'उद्यम नोंदणी' सारख्या प्रक्रियेच्या सुलभीकरणामुळे उद्योजकांना व्यवसाय सुरू करणे आणि भांडवल मिळवणे अत्यंत सोपे झाले आहे. MSME क्षेत्राचे बळकटीकरण हेच आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट आहे."

नॅशनल सिंगल विंडो सिस्टम

प्रारंभ दिनांक- २२ सप्टेंबर २०२१

गुंतवणूकदारांना विविध परवानग्यांसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी मोदी सरकारने 'एक खिडकी' योजना सुरू केली. या डिजिटल व्यासपीठामुळे आता सर्व प्रकारच्या मंजुऱ्या एकाच ठिकाणी आणि वेळेत मिळत असून, लालफितीचा कारभार संपुष्टात आला आहे. यामुळे भारतात व्यापार करणे अधिक सुलभ झाले असून, परकीय गुंतवणुकीला मोठी चालना मिळाल्याने देशाच्या औद्योगिक विकासाला आणि 'मेक इन इंडिया' मोहिमेला गती प्राप्त झाली आहे.

- **सर्व परवानग्या एकाच ठिकाणी :**
  केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध विभागांच्या परवानग्या आता एकाच डिजिटल पोर्टलवर उपलब्ध आहेत.
- **लालफितीचा कारभार संपला :**
  फाईल्स अडकून पडण्याची पद्धत बंद झाली असून, प्रत्येक अर्जाच्या स्थितीचा मागोवा पारदर्शकपणे घेता येतो.
- **गुंतवणुकीला चालना :**
  यामुळे भारतात उद्योग सुरू करणे अधिक सुलभ झाले असून, जागतिक गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास वाढला आहे.
- **वेळेची मोठी बचत :**
  एकाच 'कॉमन रजिस्ट्रेशन फॉर्म'द्वारे विविध विभागांकडे अर्ज करण्याची सुविधा मिळाल्यामुळे उद्योजकांचा वेळ आणि श्रम वाचून प्रकल्प वेगाने सुरू होत आहेत.





"उद्योगांसाठी वेगवेगळ्या परवानग्या मिळवण्याची गुंतागुंत संपवून आम्ही 'नॅशनल सिंगल विंडो सिस्टीम' (NSWS) सुरू केली आहे. यामुळे गुंतवणूकदारांना एकाच ठिकाणी सर्व परवानग्या डिजिटल पद्धतीने मिळत आहेत, ज्यामुळे देशात 'इझ ऑफ डुइंग बिझनेस' खऱ्या अर्थाने वाढला आहे."

पारदर्शक आणि कागदविरहित प्रशासन

प्रारंभ दिनांक- ९ जुलै २०१५

सरकारी फाईल्समधील 'पारदर्शकता' वाढवण्यासाठी मोदीजींनी ई-ऑफिस आणि डिजिटल लॉकरच्या माध्यमातून प्रशासनाला पूर्णपणे 'कागदविरहित' करण्यावर भर दिला. यामुळे कामात कमालीची गतिमानता आली असून, फाईल्स प्रलंबित राहण्याचे प्रमाण घटल्याने भ्रष्टाचाराला कोणताही वाव उरलेला नाही. महत्त्वाच्या कागदपत्रांची सुरक्षा वाढल्यासोबतच सर्वसामान्यांची कामे आता वेळेत पूर्ण होत आहेत, परिणामी डिजिटल प्रशासनामुळे सरकारी यंत्रणेवर जनतेचा विश्वास अधिक दृढ होऊन जबाबदार आणि उत्तरदायी राज्यकारभाराचा पाया रचला गेला आहे.



- **डिजिटल ट्रॅकिंग :**
  कोणती फाईल कोणाकडे आहे आणि किती वेळ प्रलंबित आहे, याचे डिजिटल रेकॉर्ड उपलब्ध असल्यामुळे जबाबदारी निश्चित झाली आहे.
- **डिजी लॉकर :**
  सामान्य नागरिकांना आता भौतिक कागदपत्रे सोबत बाळगण्याची गरज नाही; सर्व प्रमाणपत्रे डिजिटल स्वरूपात सुरक्षित आणि पडताळणीयोग्य आहेत.
- **भ्रष्टाचारमुक्त व्यवहार :**
  सरकारी कंत्राटे आणि लिलाव (e-Auction) आता पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने ऑनलाईन होतात, ज्यामुळे मानवी हस्तक्षेप आणि भ्रष्टाचार कमी झाला आहे.
- **पर्यावरणपूरक कारभार :**
  'ई-ऑफिस' प्रणालीमुळे कागदाचा वापर कमी झाला असून, प्रशासकीय कामकाजात वेग, पारदर्शकता आणि पर्यावरणाचे रक्षण असे तिहेरी साध्य झाले आहे.



"पूर्वी ज्या प्रशासकीय प्रक्रियांसाठी मानवी हस्तक्षेप आणि वैयक्तिक मंजुरीवर विसंबून राहावे लागायचे, त्या आता तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अत्यंत वेगवान आणि पारदर्शक झाल्या आहेत. डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरने मध्यस्थांची साखळी तोडून भ्रष्टाचाराला आळा घातला असून कागदविरहित सुशासनाचा पाया रचला आहे."

विकासाचे प्रगतीपुस्तक

नीतिमान भारताची तपपूर्ती

डीबीटी

एनडीए सरकारचे विकासपर्व

₹३.७ लाख कोटी+ वाचले; सर्व योजनांचे पैसे थेट बँक खात्यात जमा.

यूपीए सरकारची दुरावस्था

मध्यस्थांमुळे योजनेच्या पैशात मोठी गळती आणि भ्रष्टाचार व्हायचा.

रेरा

एनडीए सरकारचे विकासपर्व

१.२२ लाख+ प्रकल्प नोंदणीकृत; घरखरेदीत आता १००% पारदर्शकता.

यूपीए सरकारची दुरावस्था

बांधकाम क्षेत्रात कोणताही नियामक नव्हता आणि ग्राहकांची फसवणूक व्हायची.

दिवाळखोरी आणि नादारी संहिता

एनडीए सरकारचे विकासपर्व

बँकांनी ₹३.३ लाख कोटी वसूल केले; वसुलीचा वेग ३ पटीने वाढला.

यूपीए सरकारची दुरावस्था

बँकांच्या थकबाकी वसुलीसाठी १५-२० वर्षे लागायची.

डिजिटल इंडिया

एनडीए सरकारचे विकासपर्व

मासिक १३ अब्ज + व्यवहार; जगातील ४६% डिजिटल पेमेंट्स भारतात.

यूपीए सरकारची दुरावस्था

अर्थव्यवस्था रोखीवर अवलंबून होती आणि व्यवहार असुरक्षित होते.

स्वदेशी

एनडीए सरकारचे विकासपर्व

एनडीए सरकारने महाराष्ट्राला ₹१०.५ लाख कोटींचा निधी देऊन राज्याला स्वदेशी निर्मिती आणि निर्यातीचे जागतिक केंद्र बनवले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

यूपीए काळात महाराष्ट्राला १० वर्षात केवळ ₹१.२३ लाख कोटी मिळाले आणि देश संरक्षणासारख्या क्षेत्रांत आयातीवर अवलंबून राहिला.

उद्यम

एनडीए सरकारचे विकासपर्व

५ कोटी+ नोंदणीकृत छोटे उद्योग; कर्ज मिळणे आणि सरकारी लाभ सुलभ.

यूपीए सरकारची दुरावस्था

फक्त १५-२० लाख (एमएसएमई) नोंदणीकृत होते.

सिंगल विंडो

एनडीए सरकारचे विकासपर्व

३२+ केंद्रीय विभाग एकाच पोर्टलवर; उद्योग मंजुरी प्रक्रिया वेगवान.

यूपीए सरकारची दुरावस्था

उद्योग सुरू करण्यासाठी ३०-४० वेगवेगळ्या खिडक्यांवर फेऱ्या माराव्या लागत.

डिजी लॉकर

एनडीए सरकारचे विकासपर्व

१८ कोटी+ लोक डिजी लॉकर वापरतात; सर्व कागदपत्रे आता डिजिटल.

यूपीए सरकारची दुरावस्था

कागदपत्रांच्या फाईल्स सांभाळणे आणि पडताळणी करणे कठीण होते.

ई-गव्हर्नन्स

एनडीए सरकारचे विकासपर्व

डिजिटल इंडिया व डिजी लॉकरमुळे ४,४००+ सेवा पूर्णपणे ऑनलाइन व पारदर्शक.

यूपीए सरकारची दुरावस्था

केवळ १०-१५% सरकारी सेवा मर्यादितपणे ऑनलाइन उपलब्ध.



उद्योग भारत - जागतिक निर्मितीचे केंद्र

उद्योजकतेचा नवा सूर्योदय: 'मेक इन इंडिया' ते 'ग्लोबल हब' पर्यंतची झेप आत्मनिर्भरतेच्या मंचावर भारतीय कौशल्याचा जागतिक गौरव

प्रशासनात पारदर्शकता आल्यामुळे आणि 'डिजिटल इंडिया'मुळे सामान्य माणसाचा व्यवस्थेवरील विश्वास वाढला. मात्र, केवळ व्यवस्था सुधारून चालणार नव्हते; तर त्या व्यवस्थेमध्ये तरुणांच्या हाताला काम आणि उद्योजकतेची संधी मिळणे आवश्यक होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे ओळखले होते की, भारत तेव्हाच 'महासत्ता' बनेल जेव्हा आपण केवळ वस्तूंचे ग्राहक न राहता जगाला वस्तू पुरवणारे 'उत्पादक' बनू. याच महान विचारातून 'मेक इन इंडिया' या मोहिमेचा जन्म झाला. 'पारदर्शक भारत' योजनेने भ्रष्टाचाराचे अडथळे दूर केले, तर 'उद्योग भारत' योजनेने भारतीय उद्योग क्षेत्राला नवी दिशा दिली.

गेल्या १२ वर्षांत भारताने आपल्या औद्योगिक धोरणात आमूलाग्र बदल केले आहेत. "कायद्यांचे जंगल" आणि "परवानग्यांचे चक्रव्यूह" मोडीत काढून मोदीजींनी 'व्यवसाय सुलभतेचा' मंत्र प्रत्यक्ष अंमलात आणला. आज भारतातील तरुण केवळ नोकरी मागणारे राहिले नसून, ते 'स्टार्टअप इंडिया'च्या माध्यमातून नोकरी देणारे बनले आहेत. गल्लीतील लहान व्यापाऱ्याला मोठ्या ई-कॉमर्स कंपन्यांच्या तोडीस तोड व्यासपीठ मिळवून देणारे '(ओएनडीसी)' असो किंवा सरकारी खरेदीत पारदर्शकता आणणारे '(जेम पोर्टल)', या प्रत्येक उपक्रमाने भारतीय उद्योगाचा कणा मजबूत केला आहे.

या औद्योगिक क्रांतीचा केंद्रबिंदू आपली 'नारीशक्ती' आणि 'युवाशक्ती' आहे. जेव्हा एखाद्या लहान जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु, मध्यम क्षेत्रातील (एमएसएई) उद्योजकाचे उत्पादन सातासमुद्रापार जाते, तेव्हा खऱ्या अर्थाने 'लोकल फॉर ग्लोबल'चा संकल्प सिद्ध होतो. 'नॅशनल लॉजिस्टिक्स पॉलिसी'च्या माध्यमातून वस्तूंच्या वाहतुकीचा खर्च कमी करून भारतीय वस्तूंना जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक बनवले गेले आहे. हा प्रवास आहे एका परावलंबी भारताकडून 'आत्मनिर्भर भारता'कडे जाण्याचा, जिथे 'मेड इन इंडिया' हा शब्द गुणवत्तेचा जागतिक ब्रँड बनला आहे.

भाजपा
महाराष्ट्र




मेक इन इंडिया

प्रारंभ दिनांक - २५ सप्टेंबर २०१४

भारताला केवळ वस्तूंचा ग्राहक न ठेवता जगाचा कारखाना बनवण्यासाठी आणि तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी मोदीजींनी २०१४ मध्ये या मोहिमेचा श्रीगणेशा केला. यामुळे आता देशातच मोठमोठे उद्योग उभे राहात असून परदेशी कंपन्या भारतात गुंतवणूक करत आहेत. उत्पादनात वाढ झाल्यामुळे नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत आणि भारतीय वस्तू जगभर पोहचू लागल्या आहेत, ज्यातून आपला देश खऱ्या अर्थाने स्वावलंबी आणि प्रगत झाला आहे.

- **उद्दिष्ट :**
  जागतिक उत्पादन केंद्र म्हणून भारताची ओळख निर्माण करणे.
- **यश :**
  आज भारत जगातील दुसरा सर्वात मोठा मोबाईल उत्पादक देश बनला आहे.
- **प्रगती :**
  संरक्षण, ऑटोमोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या कठीण क्षेत्रात भारताने स्वदेशी उत्पादनाचा विक्रम प्रस्थापित केला आहे.
- **परकीय गुंतवणूक :**
  गुंतवणुकीचे नियम सुलभ केल्यामुळे भारतात विक्रमी परकीय गुंतवणूक येत असून, त्यातून कोट्यवधी तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.





"आज 'मेक इन इंडिया' ही केवळ एक घोषणा राहिलेली नाही, तर तो आपल्या देशाचा संकल्प बनला आहे. भारत आता केवळ वस्तूंचा ग्राहक राहिला नसून, जागतिक पुरवठा साखळीत एक प्रमुख उत्पादक देश म्हणून उदयास येत आहे. आपली उत्पादने जागतिक दर्जाची असावीत, हाच आमचा ध्यास आहे."

उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना

प्रारंभ दिनांक - ९ ऑगस्ट २०२०

भारतात उत्पादन करणे फायदेशीर ठरावे आणि जागतिक कंपन्यांनी आपली युनिट्स भारतात आणावीत, यासाठी 'अधिक उत्पादन अधिक साहाय्य' या धोरणांतर्गत ही योजना राबवली गेली. यामुळे देशात मोठ्या कंपन्यांनी गुंतवणूक केली असून उत्पादनाला चांगली गती मिळाली आहे. यामुळे तरुणांच्या हाताला नवीन काम मिळाले असून भारत आता जगाचा कारखाना बनण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे आणि आपली अर्थव्यवस्था यामुळे अधिक मजबूत व आत्मनिर्भर बनत आहे



- **प्रोत्साहन :**
  १४ महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये उत्पादन वाढवणाऱ्या कंपन्यांना सरकारकडून थेट आर्थिक प्रोत्साहन भत्ता दिला जातो.
- **आर्थिक प्रभाव :**
  यामुळे भारतात मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक (एफडीआय) आली आणि औद्योगिक क्षेत्रात लाखो रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या.
- **जागतिक उत्पादन केंद्र :**
  मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात भारत आता जगाची गरज पूर्ण करणारा देश बनला असून, जागतिक पुरवठा साखळीत भारताचे स्थान मजबूत झाले आहे.
- **आयातीवर नियंत्रण :**
  औषध निर्मिती (APIs) आणि इलेक्ट्रॉनिक घटकांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करून 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेला बळ मिळाले आहे.

"उत्पादनावर आधारित प्रोत्साहन म्हणजेच 'पीएलआय' योजनेमुळे देशाच्या उत्पादन क्षेत्रात क्रांतिकारक बदल झाले आहेत. या योजनेने केवळ परदेशी गुंतवणूकच आकर्षित केली नाही, तर देशांतर्गत उद्योगांनाही जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवले आहे. यामुळे भारतात रोजगाराच्या लाखो नवीन संधी निर्माण होत आहेत."



स्टार्टअप इंडिया

प्रारंभ दिनांक - १६ जानेवारी २०१६

भारतातील तरुणांमध्ये असलेल्या कल्पकतेला व्यासपीठ देण्यासाठी आणि त्यांना 'नोकरी मागणारे' नव्हे तर 'नोकरी देणारे' बनवण्यासाठी ही स्टार्टअप क्रांती सुरू करण्यात आली. या योजनेमुळे साध्या कुटुंबातील तरुणांना स्वतःचे नवीन उद्योग सुरू करणे सोपे झाले असून त्यांना त्यासाठी लागणारी सर्व सरकारी मदत आणि मार्गदर्शन मिळत आहे. यामुळे देशभरात नवनवीन कल्पनांवर आधारित व्यवसाय उभे राहत असून लाखो लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

- **जागतिक स्थान :**
  भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम बनवण्यात यश मिळाले आहे.

- **व्याप्ती :**
  आज देशात २.२३ लाखांहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्टअप्स आहेत.

- **युनिकॉर्न्स :**
  १०० हून अधिक भारतीय स्टार्टअप्सनी 'युनिकॉर्न' (१ अब्ज डॉलरपेक्षा जास्त मूल्य) चा टप्पा पार केला आहे.

- **टॅक्स सवलत आणि सोपी प्रक्रिया :**
  नवीन उद्योजकांना सुरुवातीच्या काळात कर सवलती आणि पेटंट नोंदणीत सवलत देऊन व्यवसायातील अडथळे दूर केले आहेत.





"पूर्वी स्टार्टअप्सचा उल्लेख फक्त मोठ्या शहरांपुरता मर्यादित असायचा, पण आज भारताच्या कानाकोपऱ्यात, अगदी छोट्या शहरांमध्येही आपले तरुण नवनवीन स्टार्टअप्स सुरू करत आहेत. भारताची ही 'स्टार्टअप क्रांती' आपल्या तरुणांच्या अफाट प्रतिभेची आणि आत्मविश्वासाची साक्ष आहे."

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग सक्षमीकरण

प्रारंभ दिनांक - ९ जुलै २०२०

लघु उद्योजक हे भारतीय अर्थव्यवस्थेचा खरा आधारस्तंभ आहेत; त्यांना तांत्रिक आणि आर्थिक बळ देऊन जागतिक स्तरावर नेण्याचे काम मोदी सरकारने केले. यामुळे आता लहान कारखानदारांना कमी व्याजात कर्ज आणि हक्काचे मार्गदर्शन मिळत आहे. सरकारी मदतीमुळे त्यांच्या मालाची गुणवत्ता सुधारली असून, भारतीय उत्पादने आता परदेशातील बाजारपेठेतही नाव कमवत आहेत, ज्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराचा मोठा पाया रचला जाऊन सर्व सामान्य जनता प्रगत होत आहे.



- **उद्यम नोंदणी :**
  नोंदणी प्रक्रिया अत्यंत सोपी करून लघु उद्योगांना विना-तारण कर्ज आणि सरकारी सवलती मिळवणे सुलभ केले.

- **संरक्षण :**
  कोरोनासारख्या संकटाच्या काळात 'आपत्कालीन पतपुरवठा हमी' योजनेद्वारे खेळते भांडवल पुरवून कोट्यवधी लहान उद्योगांना डबघाईला येण्यापासून वाचवले.

- **बाजारपेठ आणि तंत्रज्ञान :**
  'गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस' मुळे छोट्या उद्योजकांना आपली उत्पादने थेट सरकारला विकण्याची मोठी संधी मिळाली. यामुळे पारदर्शक व्यवहार आणि वेळेवर पेमेंट मिळणे शक्य झाले.

- **कर्ज हमी :**
  विशेष क्रेडिट गॅरंटी योजनेमुळे बँकांकडून विना-तारण कर्ज मिळवणे सोपे झाले असून छोट्या उद्योजकांवरील व्याजाचं ओझं कमी झाले आहे.



"आमचे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहेत. या क्षेत्राला आर्थिक बळ देणे, तंत्रज्ञानाची जोड देणे आणि जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे ही आमच्या सरकारची प्राथमिकता आहे. जेव्हा आपला लघुउद्योजक मजबूत होईल, तेव्हाच देश आत्मनिर्भर होईल."

व्यवसाय सुलभता

प्रारंभ दिनांक - १ जुलै २०१४

उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या शेकडो कागदपत्रांचे आणि कायद्यांचे ओझे कमी करून उद्योजकांसाठी लाल गालिचा अंथरण्याचे काम 'सुशासनातून 'साध्य केले गेले. यामुळे आता नवीन व्यवसाय सुरू करणे खूप सोपे झाले असून जुने जाचक नियम सरकारने काढून टाकले आहेत. पारदर्शक पद्धतीमुळे उद्योजकांचा वेळ वाचत आहे आणि जास्तीत जास्त लोकांनी गुंतवणूक केल्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होऊन आपली अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे.

- **सुधारणा :**
  जुन्या आणि जाचक कायद्यांचे जाळे तोडून व्यवसाय सुरू करण्याची प्रक्रिया 'सिंगल विंडो' आणि वेगवान केली.

- **जागतिक विश्वास :**
  जागतिक बँकेच्या क्रमवारीत भारताने मोठी झेप घेतली असून, भारत आता गुंतवणुकीसाठी जगातील सर्वात सुरक्षित देश बनला आहे.

- **कायदेशीर सुलभीकरण :**
  व्यवसायातील किरकोळ तांत्रिक चुकांसाठी असणारे फौजदारी गुन्हे आणि कठोर शिक्षेच्या तरतुदी केंद्र सरकारने रद्द केल्या. यामुळे उद्योजकांमधील भीतीचे वातावरण संपून सन्मानाने व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य निर्माण झाले आहे.

- **कर रचनेत सवलत :**
  कॉर्पोरेट टॅक्समध्ये केलेल्या कपातीमुळे नवीन उद्योगांना आपली व्याप्ती वाढवणे आणि अधिक रोजगार निर्माण करणे शक्य झाले आहे.





"आम्ही प्रशासनातील हजारो जुने आणि कालबाह्य झालेले नियम रद्द करून व्यवसाय सुरू करण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी केली आहे. 'इझ ऑफ डुइंग बिझनेस' वाढवण्यासाठी सरकारी प्रक्रियांमधील मानवी हस्तक्षेप कमी करून पारदर्शकता आणली आहे, ज्यामुळे उद्योग विश्वाचा भारतावरील विश्वास अधिक वाढला आहे."

ओएनडीसी व जेम्स पोर्टल

प्रारंभ दिनांक - ९ ऑगस्ट २०१६

डिजिटल युगात लहान व्यापाऱ्यांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आणि सरकारी खरेदीतील भ्रष्टाचार संपवण्यासाठी तंत्रज्ञानाचा हा वापर करण्यात आला. या नवीन पोर्टलमुळे आता देशातील छोटा कारागीर किंवा दुकानदार थेट सरकारला आपला माल विकू शकतो. दलालांची गरज संपल्यामुळे व्यापाऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य भाव आणि पैसे वेळेत मिळत आहेत. यामुळे सर्व व्यवहार पारदर्शक झाले असून प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या सर्वसामान्यांना मोठी प्रगती करण्याची संधी मिळाली आहे.



- **सरकारी खरेदी पोर्टल (GeM) :**
  सरकारी खरेदीतील भ्रष्टाचार संपवण्यासाठी ९ ऑगस्ट २०१६ रोजी हे पोर्टल सुरू करण्यात आले. यामुळे खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आली असून ५०% पेक्षा जास्त ऑर्डर्स लघू आणि मध्यम उद्योजकांना मिळत आहेत.

- **ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स :**
  मोठ्या ई-कॉमर्स कंपन्यांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी २९ एप्रिल २०२२ रोजी या नेटवर्कचा पायलट प्रोजेक्ट सुरू झाला. यामुळे गल्लीतील लहान दुकानदारांनाही मोठे डिजिटल व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

- **समान संधी :**
  या प्रणालीमुळे दुर्गम भागातील छोटा व्यापारीही कोणत्याही अडथळ्याशिवाय थेट सरकारला किंवा देशभरातील ग्राहकांना आपला माल विकू शकतो, ज्यामुळे 'एक राष्ट्र, एक बाजारपेठ' ही संकल्पना प्रत्यक्षात आली.

- **पारदर्शक पेमेंट :**
  या प्रणालीने कमिशनखोरांची दुकानदारी बंद केली असून, व्यापाऱ्यांच्या मालाचा पूर्ण मोबदला कोणत्याही कपातीशिवाय थेट त्यांच्या खात्यात पोहोचत आहे.



"ONDC आणि GeM सारख्या डिजिटल उपक्रमांमुळे लहान व्यवसायिकांसाठी संधींची नवीन दारे उघडली आहेत. यामुळे मोठी डिजिटल मक्तेदारी संपून प्रत्येक लहान विक्रेता मध्यस्थांशिवाय थेट ग्राहकांशी जोडला गेला आहे."

नॅशनल लॉजिस्टिक्स पॉलिसी

प्रारंभ दिनांक - १७ सप्टेंबर २०२२

भारतीय वस्तू जागतिक बाजारपेठेत स्वस्त व्हाव्यात, यासाठी वाहतूक आणि वितरणाचा खर्च कमी करण्यासाठी हे महत्त्वाकांक्षी धोरण आखले गेले. यामुळे आता रस्ते, रेल्वे आणि बंदरे एकमेकांना जोडली गेल्यामुळे मालाची ने-आण करणे खूप सोपे आणि जलद झाले आहे. वेळेची आणि इंधनाची बचत झाल्यामुळे मालाचा खर्च कमी झाला असून, भारतीय उत्पादने परदेशात स्पर्धेत टिकू लागली आहेत, ज्यामुळे आपल्या व्यापाऱ्यांचा फायदा वाढून देशाच्या विकासाला मोठी गती मिळाली आहे.

- **एकात्मिक आराखडा :**
  रस्ते, रेल्वे, जलमार्ग आणि हवाई मार्गांची जोडणी करून वस्तूंची वाहतूक अधिक वेगवान केली.
- **सुधारणा :**
  या धोरणामुळे जागतिक 'मालवाहतूक कार्यक्षमता निर्देशांकात' भारताने मोठी झेप घेतली असून, जागतिक स्तरावर देशाची विश्वासार्हता वाढली आहे.
- **डिजिटल सक्षमीकरण :**
  'युनिफाईड लॉजिस्टिक इंटरफेस प्लॅटफॉर्म' मुळे मालवाहतुकीची सर्व माहिती एकाच जागी उपलब्ध झाली. यामुळे कागदी कामाचा त्रास कमी होऊन वेळेची आणि इंधनाची मोठी बचत होत आहे.
- **खर्च कपात :**
  लॉजिस्टिक खर्च जीडीपीच्या १०% खाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवल्यामुळे भारतीय उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वस्त दरात उपलब्ध होत आहेत.





"लॉजिस्टिक्सचा खर्च कमी करण्यासाठी आम्ही 'नॅशनल लॉजिस्टिक्स पॉलिसी' सुरू केली आहे. जेव्हा मालाची वाहतूक जलद आणि स्वस्त होईल, तेव्हा आपली उत्पादने जागतिक बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक ठरून निर्यातीला गती मिळेल."

ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स

संशोधन आणि नवीन विचारांना सरकारकडून मिळणाऱ्या पाठबळामुळे भारत आता केवळ अनुकरण करणारा देश राहिला नसून, नवनिर्मिती करणारा देश बनला आहे. यामुळे आपल्या देशातील शास्त्रज्ञ आणि तरुणांना नवनवीन प्रयोग करण्यासाठी आता भारतातच मोठी संधी आणि मदत मिळत आहे. परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्याऐवजी आपण स्वतःची उत्पादने तयार करत आहोत, ज्यामुळे जगाच्या नजरेत भारताची प्रतिमा एक सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून अधिक उंचावली आहे.



- **भरारी :**
  २०१४ मध्ये आपण या निर्देशांकात ८१ व्या स्थानावर होतो, जे आज ३८ व्या स्थानावर (२०२५) पोहोचले आहे.
- **स्टार्टअप आणि पेटंटमध्ये वाढ :**
  'स्टार्टअप इंडिया' मोहिमेमुळे भारत आज जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम बनला आहे. तसेच, भारतीयांकडून नोंदणी केल्या जाणाऱ्या पेटंट्सच्या संख्येत विक्रमी वाढ झाली असून, संशोधनात भारत आता जागतिक केंद्र बनत आहे.
- **नॅशनल रिसर्च फाउंडेशन :**
  संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने 'अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन'ची स्थापना केली आहे. यामुळे विद्यापीठे आणि उद्योग क्षेत्रातील संशोधनाला मोठा निधी उपलब्ध होऊन नवनवीन तंत्रज्ञान विकसित होण्यास मदत होत आहे.
- **निम्न मध्यम उत्पन्न गटात प्रथम:**
  भारत सलग अनेक वर्षांपासून 'निम्न मध्यम उत्पन्न' असलेल्या देशांच्या गटात इनोव्हेशनमध्ये पहिल्या क्रमांकावर कायम आहे.



"ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये (जागतिक नाविन्यता निर्देशांक) भारताने मारलेली मोठी झेप हे आपल्या देशातील तरुणांच्या संशोधन आणि कल्पकतेचे यश आहे. भारत आज केवळ तंत्रज्ञानाचा वापर करणारा देश राहिलेला नाही, तर नवनवीन शोधांच्या बाबतीत जगात आघाडीवर जात आहे."

विकासाचे प्रगतीपुस्तक

आत्मनिर्भर भारताची तपपूर्ती

मेक इन इंडिया

एनडीए सरकारचे विकासपर्व

आज देशात ३०० हून अधिक मोबाईल कारखाने असून उत्पादन मूल्य ₹५.४५ लाख कोटींवर पोहोचले आहे. भारत जगातील २ रा मोठा उत्पादक बनला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

२०१४ पर्यंत भारत केवळ २ मोबाईल कारखान्यांसह आयातीवर अवलंबून होता आणि स्वदेशी उत्पादन नगण्य होते.

पीएलआय योजना

एनडीए सरकारचे विकासपर्व

१४ क्षेत्रांतील (पीएलआय) योजनेमुळे ₹२.९६ लाख कोटींची नवीन गुंतवणूक आली असून एकूण (एफडीआय) ७४८ अब्ज डॉलरच्या पुढे गेला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

उत्पादनासाठी कोणतेही आर्थिक प्रोत्साहन नसल्यामुळे १० वर्षांतील एकूण (एफडीआय) केवळ ३०८ अब्ज डॉलर इतका मर्यादित होता.

स्टार्टअप इंडिया

एनडीए सरकारचे विकासपर्व

'स्टार्टअप इंडिया'मुळे आज १,३०,०००+ मान्यताप्राप्त स्टार्टअप्स असून १२९ कंपन्या 'युनिकॉर्न' बनल्या आहेत. भारत जगात ३ ऱ्या क्रमांकावर आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

देशात स्टार्टअप संस्कृतीचा अभाव असल्याने केवळ ४०० ते ५०० नोंदणीकृत स्टार्टअप्स अस्तित्वात होते.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई)

एनडीए सरकारचे विकासपर्व

उद्यम' नोंदणी सुलभ केल्यामुळे ५ कोटींहून अधिक उद्योगांची नोंदणी झाली असून, ईसीएलजीएस योजनेद्वारे विना-तारण कर्ज पुरवून कोरोना काळात कोट्यवधी लहान उद्योगांना आर्थिक संरक्षण दिले गेले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

लघु उद्योगांसाठी नोंदणीची प्रक्रिया क्लिष्ट होती आणि विना-तारण कर्ज मिळणे कठीण असल्याने अनेक छोटे उद्योग मांडवलाअभावी डबघाईला येत होते.

व्यवसाय सुलभता

एनडीए सरकारचे विकासपर्व

केंद्र सरकारने १५०० पेक्षा जास्त जुने कायदे रद्द करून प्रक्रिया 'सिंगल विंडो' केल्यामुळे भारताने जागतिक क्रमवारीत ६३ व्या स्थानापर्यंत मोठी झेप घेतली असून भारत आता गुंतवणुकीसाठी जागतिक केंद्र बनला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

उद्योग सुरू करण्यासाठी शेकडो कागदपत्रांचे आणि जाचक कायद्यांचे ओझे होते, ज्यामुळे २०१४ मध्ये भारत जागतिक क्रमवारीत १४२ व्या स्थानावर पिछाडीवर होता.

ओएनडीसी आणि GeM पोर्टल

एनडीए सरकारचे विकासपर्व

GeM पोर्टलवर आतापर्यंत ₹१० लाख कोटींहून अधिक पारदर्शक व्यवहार झाले आहेत, तर (ओएनडीसी) मुळे लाखो लहान विक्रेते थेट डिजिटल बाजारात मोठ्या कंपन्यांच्या बरोबरीने उभे आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

सरकारी खरेदीत पारदर्शकतेचा अभाव होता आणि लहान व्यापाऱ्यांना मोठ्या ई-कॉमर्स कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी कोणतेही व्यासपीठ उपलब्ध नव्हते.

नॅशनल लॉजिस्टिक्स पॉलिसी

एनडीए सरकारचे विकासपर्व

नॅशनल लॉजिस्टिक्स पॉलिसीमुळे लॉजिस्टिक्स खर्च जीडीपीच्या ७.९७% या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर आला असून यामुळे भारतीय निर्यात अधिक स्वस्त झाली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

एकात्मिक धोरणाच्या अभावामुळे वाहतुकीचा खर्च जीडीपीच्या १४-१८% इतका प्रचंड होता, ज्यामुळे भारतीय वस्तू जागतिक स्तरावर महाग ठरत होत्या.

ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स

एनडीए सरकारचे विकासपर्व

२०२५-२६ च्या अहवालानुसार भारत आता जागतिक स्तरावर ३५ व्या स्थानावर पोहोचला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

संशोधनाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे २०१४ मध्ये जागतिक नाविन्यपूर्ण निर्देशांकात (GII) भारत ८१ व्या स्थानावर फेकला गेला होता.

संरक्षण उत्पादन व निर्यात

एनडीए सरकारचे विकासपर्व

'मेक इन इंडिया' मुळे वार्षिक देशांतर्गत संरक्षण उत्पादन ₹१५ लाख कोटींच्या पार गेले असून, भारताची संरक्षण निर्यात ₹३८,४२४ कोटींच्या ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

भारत जगातील सर्वात मोठा शस्त्र आयातदार देश होता; स्वदेशी संरक्षण उत्पादन रखडलेले होते आणि २०१४ पर्यंत संरक्षण निर्यात अवघी ₹१,५०० कोटी होती.



युवाकेंद्रित भारत - नव्या भारताचे ऊर्जास्रोत

स्वप्नांना पंख, हातांना कौशल्य: जागतिक पटलावर भारतीय तरुणाईचा जयजयकार पदकांपासून पेटंट्सपर्यंत; 'विकसित भारत'चा खरा शिल्पकार - भारतीय युवा

'उद्योग भारत'च्या माध्यमातून जेव्हा आपण 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भरते'चे स्वप्न पाहिले, तेव्हा त्या स्वप्नाला सत्यात उतरवण्याची सर्वात मोठी जबाबदारी आपल्या तरुण पिढीच्या खांद्यावर होती. कोणत्याही देशाचे भविष्य हे केवळ त्या देशाच्या कारखान्यांमध्ये नाही, तर त्या देशाच्या शाळा, महाविद्यालये आणि क्रीडांगणांवर घडत असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे ओळखले होते की, जर भारताला जगातील सर्वात तरुण देश म्हणून आपली ओळख सार्थ करायची असेल, तर केवळ पदव्या देऊन चालणार नाही; तर तरुणांच्या हातांना 'कौशल्य' आणि त्यांच्या मनात 'जिद्द' निर्माण करणे आवश्यक आहे.

गेल्या १२ वर्षांत 'युवा भारत' या संकल्पनेने देशात एक मोठे मानसिक परिवर्तन घडवून आणले आहे. पूर्वी खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन मानले जाई, पण आज 'खेलो इंडिया'मुळे देशातील दुर्गम भागातील खेळाडू ऑलिम्पिकच्या पदकापर्यंत पोहोचत आहेत. ज्या तरुणांना रोजगारासाठी वणवण फिरावे लागत होते, त्यांना 'स्किल इंडिया'ने आज जागतिक बाजारपेठेसाठी तयार केले आहे. हा प्रवास केवळ नोकरी मिळवण्याचा नाही, तर स्वतःच्या कौशल्याच्या जोरावर जगाला दिशा देण्याचा आहे.

आजचा भारतीय तरुण केवळ स्वतःच्या प्रगतीचा विचार करत नाही, तर तो 'माय भारत' सारख्या व्यासपीठावरून राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सहभागी होत आहे. 'नॅशनल एज्युकेशन पॉलिसी' मुळे शिक्षण हे आता केवळ पुस्तकी न राहता ते रोजगाराभिमुख आणि नाविन्यपूर्ण झाले आहे. जेव्हा एखादा तरुण खेळपट्टीवर तिरंगा फडकवतो किंवा एखादा युवा उद्योजक आपली कंपनी 'युनिकॉर्न' बनवतो, तेव्हा खऱ्या अर्थाने 'युवा भारत' उभा राहतो. ही केवळ एक पिढी नाही, तर हे भारताच्या आगामी सुवर्णकाळाचे उर्जा स्रोत आहेत.

भाजपा
महाराष्ट्र



खेलो इंडिया

प्रारंभ दिनांक - २० सप्टेंबर २०१७

खेळांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी आणि मैदानावरच्या प्रतिभेला जागतिक स्तरावर चमकण्याची संधी देण्यासाठी मोदीजींनी ही मोहीम सुरू केली. यामुळे आता ग्रामीण भागातील गरीब खेळाडूंना उत्तम प्रशिक्षण आणि सोयीसुविधा घरबसल्या मिळत आहेत. खेळाडूंना लागणारी आर्थिक मदत सरकार पुरवत असल्याने त्यांना आता केवळ आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करणे सोपे झाले आहे, ज्यामुळे ऑलिम्पिक सारख्या मोठ्या स्पर्धांमध्ये भारत जास्तीत जास्त पदके जिंकून अभिमानाने तिरंगा फडकवत आहे.

- **प्रतिभा शोध :**
  तळागाळातील खेळाडूंना शोधून त्यांना ८ वर्षांसाठी वार्षिक ₹५ लाखांची शिष्यवृत्ती दिली जाते.
- **यश :**
  ऑलिम्पिक आणि आशियाई खेळांमध्ये भारताने आजवरची सर्वोच्च पदक संख्या गाठली आहे.
- **पायाभूत सुविधा :**
  ग्रामीण आणि निमशहरी भागात अत्याधुनिक स्टेडियम्स आणि ट्रेनिंग सेंटर्सचे जाळे निर्माण केल्यामुळे खेळाडूंना आता सरावासाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागत नाही.
- **महिला खेळाडूंना प्रोत्साहन :**
  'खेलो इंडिया' अंतर्गत महिला खेळाडूंसाठी विशेष स्पर्धा आणि सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्याने, दुर्गम भागातील मुलींनाही क्रीडा क्षेत्रात आपले करिअर करण्याची संधी मिळाली आहे.



"खेलो इंडिया' कार्यक्रम देशातील क्रीडा संस्कृती तळागाळापासून पुनरुज्जीवित करत आहे. आपल्या प्रतिभावान खेळाडूंना सर्वोत्तम पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण देऊन जागतिक स्तरावर तिरंगा फडकवण्यासाठी सक्षम करणे हाच आमचा संकल्प आहे."

स्किल इंडिया

प्रारंभ दिनांक - १५ जुलै २०१५

पदवीसोबतच हाताला काम देणारे' कौशल्य' महत्त्वाचे आहे, या विचारातून कोट्यवधी तरुणांना काळाशी सुसंगत असे प्रशिक्षण दिले जात आहे. यामुळे आता केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता तरुणांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि तांत्रिक शिक्षण मिळत आहे. उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ गावातच तयार होत असल्याने रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत, ज्यामुळे भारतीय तरुण आता आत्मविश्वासाने नव्या युगातील आव्हानांना सामोरे जाऊन देशाच्या प्रगतीत योगदान देत आहेत.



- **प्रशिक्षण :**
  'प्रधानमंत्री कौशल विकास योजने'द्वारे ४ कोटींहून अधिक तरुणांना विविध तांत्रिक क्षेत्रांत प्रशिक्षित केले गेले.
- **जागतिक व्याप्ती :**
  भारतीय तरुणांना परदेशातही रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी 'स्किल इंडिया इंटरनॅशनल सेंटर्स' उभारली गेली आहेत.
- **उद्योजकता आणि स्वावलंबन :**
  प्रशिक्षण घेतल्यानंतर तरुणांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शनासोबतच आर्थिक पाठबळ दिले जात आहे, ज्यामुळे तरुण आत्मनिर्भर बनत आहेत.
- **उद्योगाभिमुख अभ्यासक्रम :**
  बदलत्या काळानुसार कोडिंग, एआय आणि रोबोटिक्स यांसारख्या आधुनिक विषयांचे प्रशिक्षण दिले जात असल्यामुळे तरुणांना थेट कंपन्यांमध्ये मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळणे सोपे झाले आहे.

"एकविसावे शतक हे कौशल्यांचे शतक आहे. 'स्किल इंडिया' मोहिमेचा उद्देश आपल्या तरुणांना सक्षम करून स्वावलंबी बनवणे आणि भारताला जागतिक कौशल्याची राजधानी बनवणे हाच आहे." नाहीत, तर भारताला जागतिक कौशल्याची राजधानी बनवतील."



माय भारत

प्रारंभ दिनांक - ३१ ऑक्टोबर २०२३

तरुणांना 'विकसित भारत' चे सक्रिय भागीदार बनवण्यासाठी आणि त्यांना सरकारी योजनांशी थेट जोडण्यासाठी हे एक आधुनिक डिजिटल व्यासपीठ आहे. यामुळे आता देशातील तरुणांना आपली मते आणि नवीन कल्पना थेट सरकारपर्यंत पोहोचवता येत आहेत. सरकारी उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होण्याची संधी मिळाल्यामुळे युवकांमध्ये जबाबदारीची भावना वाढली असून, त्यांच्या ऊर्जेचा वापर राष्ट्र उभारणीसाठी होत आहे, ज्यामुळे येणारा काळ भारतासाठी अधिक प्रगत आणि समृद्ध ठरणार आहे.

- **सहभाग :**
  १५ ते २९ वयोगटातील ३ कोटींहून अधिक तरुणांनी यावर नोंदणी करून राष्ट्रनिर्मितीच्या उपक्रमात सहभाग नोंदवला आहे.
- **सर्व संधी एकाच ठिकाणी :**
  कौशल्य विकास, इंटर्नशिप आणि स्वयंसेवा यांसारख्या विविध सरकारी संधींची माहिती आता तरुणांना एकाच पोर्टलवर उपलब्ध झाली आहे.
- **नेतृत्व विकास :**
  युवा नेत्यांना स्थानिक समस्या सोडवण्यासाठी प्रशासनासोबत काम करण्याची संधी मिळत असून, त्यांच्या नेतृत्वगुणांना वाव मिळत आहे.
- **लोकशाहीत सहभाग :**
  या माध्यमातून तरुण आपल्या नवीन कल्पना आणि सूचना थेट सरकारपर्यंत पोहोचवू शकत असून, धोरण निर्मितीत तरुणांचा आवाज ऐकला जात आहे.










"माय भारत व्यासपीठ देशातील तरुणांच्या आकांक्षा आणि ऊर्जा एकत्र आणणारे क्रांतिकारी माध्यम आहे. ही डिजिटल लोकचळवळ तरुणांना प्रगतीमध्ये थेट जोडून त्यांच्यात भविष्याचे नेतृत्वगुण विकसित करत आहे."

नॅशनल अप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीम

प्रारंभ दिनांक - ९९ ऑगस्ट २०९६

केवळ पुस्तकी ज्ञान न देता, तरुणांना प्रत्यक्ष कंपन्यांमध्ये काम करण्याचा अनुभव आणि विद्यावेतन मिळावे, यासाठी ही योजना राबवली जात आहे. यामुळे आता शिकता शिकता तरुणांना कामाचे व्यवहारिक ज्ञान मिळत असून त्यांचा आत्मविश्वास खूप वाढत आहे. प्रत्यक्ष अनुभवामुळे त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळणे सोपे झाले असून उद्योगांना देखील तयार मनुष्यबळ मिळत आहे, ज्यामुळे बेरोजगारीची समस्या पूर्णपणे दूर होण्यास मोठी मदत होत आहे.



- **विद्यावेतन :**
  शिकाऊ उमेदवारी दरम्यान तरुणांना थेट त्यांच्या बँक खात्यात विद्यावेतन दिले जाते, ज्यामुळे ३० लाखांहून अधिक उमेदवारांना लाभ झाला आहे.
- **व्यावहारिक कौशल्य :**
  केवळ सैद्धांतिक शिक्षण न देता प्रत्यक्ष कामाचा अनुभव दिल्याने तरुणांच्या रोजगारक्षमतेत मोठी वाढ झाली आहे.
- **औद्योगिक सहभाग :**
  या योजनेअंतर्गत उद्योगांना शिकाऊ उमेदवारांची नेमणूक करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते, ज्यामुळे उद्योगांना कुशल मनुष्यबळ मिळत आहे.
- **प्रमाणपत्र :**
  प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना 'नॅशनल अप्रेंटिसशिप सर्टिफिकेट' दिले जाते, ज्याला जागतिक स्तरावर मान्यता आहे.

"आपल्या तरुणांना केवळ पुस्तकी ज्ञान मिळून चालणार नाही, तर त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणे आवश्यक आहे. 'नॅशनल अप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीम' उद्योग आणि तरुण यांच्यातील अंतर मिटवत आहे. यामुळे तरुणांना शिकत असतानाच कमावण्याची आणि रोजगाराची खात्रीशीर संधी मिळत आहे."



डिजिटल शिक्षण आणि स्वयं

प्रारंभ दिनांक - १ जुलै २०१७

देशाच्या कानाकोपऱ्यातील गरीब विद्यार्थ्यांला आयआयटी सारख्या नामांकित संस्थांमधील शिक्षणाचा लाभ घेता यावा, यासाठी डिजिटल क्रांतीचा वापर केला गेला. यामुळे आता केवळ पैशाअभावी कोणाचेही शिक्षण थांबणार नाही आणि ग्रामीण भागातील मुले देखील घरी बसून जगातील सर्वोत्तम शिक्षकांकडून मोफत शिकू शकतील. या क्रांतीमुळे शिक्षणाची दरी कमी झाली असून, प्रत्येक हुशार विद्यार्थ्यांला प्रगतीची समान संधी मिळून देशाचे भवितव्य अधिक उज्ज्वल होत आहे.

- **मोफत कोर्सेस :**
  ५ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी या पोर्टलद्वारे उच्च दर्जाच्या शिक्षणाचा लाभ घेतला आहे.
- **समान संधी :**
  'स्वयं' प्लॅटफॉर्ममुळे देशातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत उच्च दर्जाचे आणि दर्जेदार शिक्षण विनामूल्य पोहोचले आहे.
- **क्रेडिट ट्रान्सफर :**
  या पोर्टलवरील कोर्सेस पूर्ण केल्यानंतर मिळणारे गुण विद्यार्थ्यांच्या नियमित पदवी शिक्षणात समाविष्ट करण्याची सुविधा उपलब्ध आहे.
- **विविधता :**
  शालेय शिक्षणापासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचे सर्व विषयांतील अभ्यासक्रम एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.





"तंत्रज्ञानाने शिक्षणाचे लोकशाहीकरण केले आहे. 'स्वयं' सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यातील गरीब विद्यार्थ्यांला सर्वोत्तम शिक्षकांकडून मोफत शिकण्याची संधी मिळत आहे. डिजिटल शिक्षण हे भारताच्या शैक्षणिक विषमतेला संपवण्याचे सर्वात मोठे साधन ठरत आहे."

टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम

प्रारंभ दिनांक - ९० सप्टेंबर २०१४

भारतातील सर्वोत्तम खेळाडूंना ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवून देण्यासाठी त्यांचे प्रशिक्षण आणि परदेशातील सराव यासाठी ही विशेष गुंतवणूक योजना आहे. यामुळे खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षक आणि आधुनिक सोयीसुविधा मिळत असून त्यांना पैशांची कोणतीही अडचण येत नाही. प्रतिभावान खेळाडूंना शोधून त्यांना लहानपणापासूनच पाठबळ दिल्यामुळे भारताची क्रीडा क्षेत्रात मोठी प्रगती होत आहे आणि जगभरातील मैदानांवर आपल्या देशाचा तिरंगा अभिमानाने उंच फडकत आहे.



- **वैयक्तिक लक्ष :**
  निवडक खेळाडूंवर सरकार थेट गुंतवणूक करते, ज्यामुळे जागतिक स्पर्धेत भारताचा दबदबा निर्माण झाला आहे.
- **जागतिक दर्जाचे प्रशिक्षण :**
  खेळाडूंना परदेशात सराव करण्याची संधी, प्रगत वैद्यकीय सुविधा आणि आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते.
- **आर्थिक भत्ता :**
  खेळाडूंना त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी दरमहा ₹५०,०००/- चा भत्ता दिला जातो.
- **क्रीडा क्षेत्रातील प्रगती :**
  या योजनेमुळे ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक आणि आशियाई खेळांमध्ये भारताच्या पदक संख्येत ऐतिहासिक वाढ झाली आहे.

"जेव्हा आपले खेळाडू ऑलिम्पिकच्या रिंगणात उतरतात, तेव्हा संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी उभा असतो. 'टॉप्स' योजनेच्या माध्यमातून आम्ही खेळाडूंच्या खाण्यापिण्यापासून, परदेशी प्रशिक्षणापर्यंत सर्व गरजांची थेट जबाबदारी घेतली आहे. खेळाडूंनी कोणत्याही चिंतेशिवाय फक्त पदकावर लक्ष केंद्रित करावे, हाच या योजनेचा उद्देश आहे."



नॅशनल करिअर सर्व्हिस

प्रारंभ दिनांक - २० जुलै २०१५

नोकरी शोधणारे तरुण आणि नोकरी देणारे उद्योग यांच्यातील दुवा म्हणून हे पारदर्शक डिजिटल व्यासपीठ काम करते. यामुळे आता कोणत्याही मध्यस्थाशिवाय सुशिक्षित तरुणांना त्यांच्या आवडीनुसार योग्य काम मिळणे खूप सोपे झाले आहे. कंपन्यांना देखील त्यांच्या गरजेनुसार चांगले आणि कुशल कामगार एका क्लिकवर सहज मिळत आहेत. परिणामी, वेळ आणि श्रम वाचून बेरोजगारी कमी होत असून देशाच्या आर्थिक विकासाला यामुळे मोठी गती मिळत आहे.

- **संधी :**
  आपल्या करियरसाठी ३.५ कोटींहून अधिक जण यावर नोंदणीकृत असून लाखो नोकऱ्यांची माहिती उपलब्ध करून दिली जाते.
- **एकात्मिक सेवा :**
  नोकरी शोधण्यासोबतच करियर समुपदेशन, व्यावसायिक मार्गदर्शन आणि कौशल्य विकास अभ्यासक्रमांची माहिती एकाच ठिकाणी मिळते.
- **विविध क्षेत्रांचा समावेश :**
  खाजगी क्षेत्रासह सरकारी नोकऱ्या आणि स्थानिक स्तरावरील कामाच्या संधींची माहिती तरुणांना विनामूल्य उपलब्ध आहे.
- **पारदर्शकता :**
  नोंदणीकृत तरुणांना थेट कंपन्यांशी जोडले जात असल्यामुळे भरती प्रक्रियेतील मध्यस्थांची गरज संपली असून फसवणुकीला आळा बसला आहे.





"देशातील नोकरी शोधणारे तरुण आणि नोकरी देणारे उद्योजक यांना एकाच छताखाली आणण्यासाठी 'नॅशनल करिअर सर्व्हिस' हे एक उत्तम डिजिटल व्यासपीठ बनले आहे. यामुळे रोजगार मिळवण्याची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि सुलभ झाली असून लाखो तरुणांना त्यांच्या पात्रतेनुसार करिअरच्या नवीन दिशा मिळत आहेत."

Y20 परिषद

प्रारंभ दिनांक -६ जानेवारी २०२३

जागतिक स्तरावर भारताच्या धोरणांची चर्चा करताना भारतीय तरुणांचा आवाज ऐकला जावा, यासाठी युवा नेतृत्वाला संधी दिली जात आहे. यामुळे आता तरुण पिढीला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची आणि आपली नवीन मते मांडण्याची संधी मिळत आहे. युवकांच्या कल्पक विचारांमुळे भारताची प्रतिमा अधिक आधुनिक आणि प्रगत बनत असून, जागतिक समस्यांवर उपाय शोधण्यात आपल्या देशातील तरुण आता महत्त्वाची आणि मोलाची भूमिका बजावत आहेत.

- **जागतिक नेतृत्व :**
  Y20 परिषदेच्या माध्यमातून भारतीय तरुणांनी हवामान बदल आणि उद्योजकतेवर जागतिक नेत्यांसोबत संवाद साधला.
- **सर्वसमावेशक सहभाग :**
  या परिषदेअंतर्गत देशभरात विविध 'चौपाल' आणि चर्चासत्रे आयोजित करून तळागाळातील तरुणांचे विचार जागतिक मंचावर मांडले गेले.
- **भविष्यातील आव्हाने :**
  आरोग्य, शांतता आणि लोकशाही यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर भारतीय तरुणांनी दिलेली मते 'जी-२०' च्या मुख्य जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात आली आहेत.
- **सांस्कृतिक देवाणघेवाण :**
  या उपक्रमामुळे भारतीय तरुणांना जागतिक स्तरावरील विविध संस्कृती आणि कार्यपद्धती समजून घेण्याची मोठी संधी मिळाली.





"Y20 परिषदेच्या व्यासपीठावरून भारताचा तरुण आज जागतिक आव्हानांवर आपले विचार मांडत आहे. हवामान बदल असो की शांतता प्रस्थापित करणे, आज जगाला भेडसावणाऱ्या समस्यांवर तरुण पिढीकडेच सर्वात नाविन्यपूर्ण तोडगे आहेत. युवाशक्ती हीच भविष्यातील जागतिक बदलाची खरी सूत्रधार आहे."

एक देश, एक सदस्यता

प्रारंभ दिनांक - ९ जानेवारी २०२५

देशातील संशोधक आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या ज्ञानाशी थेट जोडण्यासाठी सरकारने ही 'डिजिटल क्रांती' घडवून आणली आहे. या नाविन्यपूर्ण धोरणांतर्गत देशातील सर्व उच्च शैक्षणिक संस्था आणि प्रयोगशाळांना आंतरराष्ट्रीय शोधनिबंध आणि नामांकित जर्नल्सचे सबस्क्रिप्शन मोफत उपलब्ध करून दिले आहे. यामुळे आर्थिक अडसर दूर होऊन ग्रामीण भागातील गुणवत्तेलाही जागतिक स्तरावर संशोधन करण्याची समान संधी मिळाली असून, देशाच्या बौद्धिक प्रगतीला आणि नवसंशोधनाला मोठी गती मिळाली आहे.

- **जागतिक ज्ञान-कोषात थेट प्रवेश :**
  या योजनेमुळे जगातील १३,४०० पेक्षा जास्त प्रतिष्ठित वैज्ञानिक नियतकालिकांचा प्रवेश भारतीय शैक्षणिक संस्थांना एका क्लिकवर मिळाला आहे.

- **राष्ट्रीय संशोधन नेटवर्कची निर्मिती :**
  एकाच व्यासपीठावरून सर्वांना माहिती मिळाल्यामुळे देशातील विविध विद्यापीठे आणि संस्थांमध्ये 'माहितीचे अंतर' संपले आहे. यामुळे आंतर-संस्थात्मक सहकार्याला आणि संशोधनाला नवी दिशा मिळाली आहे.

- **'डिजिटल इंडिया'चे सक्षमीकरण :**
  हे केवळ पुस्तकं वाचण्याचे साधन नसून, ही एक डिजिटल इकोसिस्टम आहे. यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढून भारतीय तरुणांची बौद्धिक क्षमता जागतिक स्तरावर अधिक स्पर्धात्मक झाली आहे.

- **आर्थिक बचत आणि सुलभता :**
  प्रत्येक संस्थेला वेगवेगळी वर्गणी भरण्याची गरज संपल्याने सरकारी निधीची बचत झाली असून, दुर्गम भागातील संशोधकांनाही आता विनामूल्य उच्च दर्जाचे संशोधन साहित्य उपलब्ध झाले आहे.






"कॅबिनेटने मंजूर केलेली 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' योजना आपल्या संशोधक आणि विद्यार्थ्यांना जागतिक ज्ञान मोफत उपलब्ध करून देणारा गेम-चेंजर ठरेल. हे पाऊल भारताला जागतिक संशोधन आणि नवोन्मेषाचे मुख्य केंद्र बनवेल."

प्रधानमंत्री युवा योजना

प्रारंभ दिनांक - ३ नोव्हेंबर २०१६.

भारतातील तरुण लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि भारतीय संस्कृती, वारसा जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी 'पीएम युवा' योजना सुरू करण्यात आली आहे. हे व्यासपीठ नवोदित लेखकांना त्यांचे विचार मांडण्यासाठी एक मोठे व्यासपीठ देते. यामुळे देशातील नव्या प्रतिभेला अनुभवी लेखकांचे मार्गदर्शन मिळत असून, भारतीय साहित्याचा समृद्ध वारसा आता जगभर नव्या जोमाने पोहोचत आहे, ज्यामुळे आपल्या लेखणीला जागतिक स्तरावर मोठी ओळख आणि मान मिळत आहे.



- **लेखन कौशल्याचा विकास :**
  या योजनेअंतर्गत निवडक तरुण लेखकांना तज्ज्ञ लेखकांकडून मार्गदर्शन दिले जाते, ज्यामुळे त्यांच्या लेखनाचा दर्जा सुधारतो.

- **आर्थिक पाठबळ :**
  निवड झालेल्या लेखकांना सहा महिन्यांसाठी शिष्यवृत्ती दिली जाते, जेणेकरून ते कोणत्याही आर्थिक चिंतेशिवाय आपले पुस्तक पूर्ण करू शकतील.

- **सांस्कृतिक दूत :**
  भारतीय स्वातंत्र्य लढा, विस्मृतीत गेलेले नायक आणि स्थानिक संस्कृतीवर आधारित पुस्तके लिहून हे तरुण लेखक भारताचा गौरव वाढवत आहेत.

- **जागतिक व्यासपीठ :**
  नॅशनल बुक ट्रस्ट द्वारे या लेखकांची पुस्तके प्रकाशित केली जातात आणि विविध भाषांत अनुवादित करून ती आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनांत मांडली जातात.



"पीएम युवा योजना आपल्या तरुणांमधील उद्योग सुरू करण्याच्या कल्पनेला पंख देत आहे. आपले तरुण केवळ नोकऱ्या शोधणारे न राहता, नवीन नोकऱ्या निर्माण करणारे (Job Creators) बनावेत, हाच आमचा संकल्प आहे."

प्रधानमंत्री श्री स्कूल्स

प्रारंभ दिनांक - ७ सप्टेंबर २०२२

देशातील शाळांचा कायापालट करण्यासाठी 'पीएम श्री' ही योजना राबवली जात आहे. या शाळा केवळ शिक्षणाचे केंद्र नसून त्या 'आदर्श' शाळा म्हणून इतर शाळांना मार्गदर्शक ठरत आहेत. या शाळांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, ज्यामुळे ग्रामीण भागातील सामान्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असून, त्यांना स्पर्धात्मक युगासाठी सक्षम बनवून त्यांचे उज्ज्वल भविष्य घडवण्याचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरत आहे.

- **आधुनिक पायाभूत सुविधा :**
  या शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूम, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत, ज्यामुळे शिक्षण आनंददायी होत आहे.

- **पर्यावरणपूरक शाळा :**
  या शाळांमध्ये सौर ऊर्जा (अक्षय ऊर्जा), जलपुनर्भरण आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या 'ग्रीन' उपक्रमांवर भर दिला जात आहे.

- **कौशल्य आधारित शिक्षण :**
  केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये शिकवून त्यांना भविष्यातील रोजगारासाठी सज्ज केले जात आहे.

- **गुणवत्तापूर्ण नेतृत्व :**
  या शाळा आपल्या परिसरातील इतर शाळांना मार्गदर्शन करण्याचे काम करतात, ज्यामुळे संपूर्ण परिसरातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होत आहे.













"पीएम श्री शाळा आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रयोगशाळा ठरतील. या पर्यावरणपूरक मॉडेल शाळा आपल्या परिसरातील इतर शाळांना गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचे भविष्य उजळवतील."

उच्च शिक्षण आयोग

प्रारंभ दिनांक - २९ जुलै २०२०

भारताला पुन्हा एकदा 'विश्वगुरु' बनवण्यासाठी आणि उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी सरकारने उच्च शिक्षण आयोग आणि परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी दिली आहे. यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना मायदेशातच जागतिक दर्जाचे शिक्षण मिळणार आहे. हा निर्णय देशातील बुद्धिमत्ता परदेशात जाण्यापासून रोखणारा, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधनाला गती देणारा आणि भारताला ज्ञानाचे जागतिक केंद्र बनवून तरुणांसाठी उज्ज्वल भविष्याची दालनं उघडणारा ठरेल.

- **उच्च शिक्षण आयोग :**
  युजीसी आणि इतर जुन्या संस्थांच्या जागी आता एकच उच्च शिक्षण आयोग काम करेल, ज्यामुळे शैक्षणिक नियमावलीत सुटसुटीतपणा येईल.

- **परदेशी विद्यापीठांचे आगमन :**
  जगातील टॉप विद्यापीठे आता भारतात त्यांचे कॅम्पस उघडत आहेत, ज्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांचा परदेशात जाण्याचा मोठा खर्च वाचणार आहे.

- **ब्रेन ड्रेनला आळा :**
  उच्च दर्जाचे शिक्षण भारतातच उपलब्ध झाल्यामुळे बुद्धिमान तरुण परदेशात जाण्याऐवजी भारतातच राहून देशाच्या विकासात भर घालतील.

- **बहुविद्याशाखीय शिक्षण :**
  या सुधारणांमुळे विद्यार्थ्यांना आता एकाच वेळी विज्ञान, कला आणि वाणिज्य अशा विविध विषयांचा अभ्यास करण्याचे स्वातंत्र्य मिळाले असून, त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे.

"उच्च शिक्षण आयोग जुन्या आणि गुंतागुंतीच्या नियमांचे जाळे तोडून शिक्षण व्यवस्थेत सुसूत्रता आणेल. यामुळे आपल्या विद्यापीठांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आणि स्वायत्तता मिळेल."



अपार आयडी

प्रारंभ दिनांक - ९६ ऑक्टोबर २०२३

प्रत्येक विद्यार्थ्याची शैक्षणिक ओळख डिजिटल करण्यासाठी 'अपार' आयडीची सुरुवात करण्यात आली आहे. हा विद्यार्थ्यांसाठीचा 'आधार कार्ड' सारखाच एक कायमस्वरूपी ओळख क्रमांक आहे. यामुळे आता विद्यार्थ्यांचे सर्व निकाल, पदव्या आणि शैक्षणिक प्रमाणपत्रे एकाच ठिकाणी सुरक्षित राहतील. शाळा किंवा कॉलेज बदलताना कागदपत्रांची जुळवाजुळव करण्याची चिंता मिटली असून, तंत्रज्ञानाच्या या वापरामुळे प्रवेश प्रक्रिया अत्यंत सोपी झाली असून विद्यार्थ्यांचा वेळ वाचून पारदर्शकता अधिक वाढली आहे.

- **एकात्मिक शैक्षणिक रेकॉर्ड :**
  विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतचे सर्व मार्कशीट्स, प्रमाणपत्रे आणि पदव्या या एकाच आयडीला जोडलेल्या असतात.

- **सुलभ प्रवेश प्रक्रिया :**
  एका शाळेतून दुसऱ्या शाळेत किंवा महाविद्यालयात प्रवेश घेताना कागदपत्रांची पडताळणी करणे यामुळे अत्यंत सोपे आणि जलद झाले आहे.

- **डिजिटल लॉकर :**
  विद्यार्थ्यांचे सर्व शैक्षणिक क्रेडिट्स यात डिजिटल स्वरूपात सुरक्षित राहतात, जे नोकरीच्या वेळी पडताळणीसाठी उपयोगी पडतात.

- **डिजिटल ट्रॅकिंग :**
  विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे डिजिटल ट्रॅकिंग होत असून, शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करून त्यांना पुन्हा शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत.





आधार कार्डच्या धर्तीवर विद्यार्थ्यांसाठी 'अपार आयडी' ही' एक देश, एक विद्यार्थी ओळख' बनत आहे. हे विद्यार्थ्यांच्या बालवाडीपासूनच्या संपूर्ण शैक्षणिक प्रवासाचा, त्यांच्या कौशल्यांचा आणि क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा एक सुरक्षित डिजिटल साठा असेल, ज्यामुळे भविष्यात नोकरी मिळवणे आणि प्रवेश प्रक्रिया अत्यंत सोपी होईल."



विकासाचे प्रगतीपुस्तक

युवासमृद्ध भारताची तपपूर्ती

खेलो इंडिया

एनडीए सरकारचे विकासपर्व

खेलो इंडिया' अंतर्गत प्रतिभावान खेळाडूंना ८ वर्षांसाठी वार्षिक ₹५ लाखांची शिष्यवृत्ती दिली जाते, ज्यामुळे ऑलिम्पिक आणि आशियाई खेळांमध्ये भारताने आजवरची सर्वोच्च पदक संख्या गाठली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

खेळांकडे केवळ मनोरंजन म्हणून पाहिले गेले, तळागाळातील प्रतिभेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी कोणतीही ठोस यंत्रणा किंवा दीर्घकालीन शिष्यवृत्ती योजना नव्हती.

नॅशनल अप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीम

एनडीए सरकारचे विकासपर्व

एनएपीएस योजनेद्वारे आतापर्यंत ३० लाखांहून अधिक उमेदवारांना थेट लाभ मिळाला असून, त्यांच्या बँक खात्यात थेट विद्यावेतन जमा केले जात आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

शिकाऊ उमेदवारीसाठी कोणतीही प्रोत्साहनपर योजना नसल्यामुळे तरुणांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि विद्यावेतन मिळण्यात अडचणी येत होत्या.

स्किल इंडिया

एनडीए सरकारचे विकासपर्व

प्रधानमंत्री कौशल विकास योजने'द्वारे ४ कोटींहून अधिक तरुणांना काळाशी सुसंगत तांत्रिक प्रशिक्षण दिले गेले असून, परदेशातील नोकऱ्यांसाठी 'स्किल इंडिया इंटरनॅशनल सेंटर्स' उभारली गेली आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

केवळ पदव्या देण्यावर भर होता, तांत्रिक कौशल्यांचा अभाव असल्याने पदवीधारक असूनही कोट्यवधी तरुण रोजगारासाठी अपात्र ठरत होते.

डिजिटल शिक्षण आणि स्वयं

एनडीए सरकारचे विकासपर्व

स्वयं' पोर्टलद्वारे ४ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गरीब विद्यार्थ्यांना आयआयटी सारख्या संस्थांमधील शिक्षण मोफत उपलब्ध झाले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

उच्च दर्जाचे शिक्षण केवळ नामांकित संस्थांपुरते मर्यादित होते; दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शिक्षणाची कोणतीही मोफत मध्यवर्ती व्यवस्था नव्हती.

माय भारत

एनडीए सरकारचे विकासपर्व

१५ ते २९ वयोगटातील १.५ कोटींहून अधिक तरुणांनी या प्लॅटफॉर्मवर नोंदणी केली असून, 'विकसित भारत'च्या उभारणीत तरुण आता सरकारचे सक्रिय भागीदार बनले आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

तरुणांना राष्ट्रनिर्मितीमध्ये थेट सहभागी करून घेण्यासाठी किंवा त्यांना सरकारी योजनांशी जोडण्यासाठी कोणतेही आधुनिक डिजिटल व्यासपीठ उपलब्ध नव्हते.

टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम

एनडीए सरकारचे विकासपर्व

टॉप्स अंतर्गत सर्वोत्तम खेळाडूंवर सरकार थेट गुंतवणूक करत असून, या विशेष पाठबळामुळे भारताने ऑलिम्पिक आणि आशियाई खेळांत पदकांचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

खेळाडूंना परदेशातील सराव आणि प्रशिक्षणासाठी स्वतःच्या खर्चावर अवलंबून राहावे लागत होते, ज्यामुळे ऑलिम्पिकमधील कामगिरी अत्यंत मर्यादित होती.

नॅशनल करिअर सर्व्हिस

एनडीए सरकारचे विकासपर्व

एनसीएस पोर्टलवर ३.४३ कोटींहून अधिक रिक्त जागा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, ४० लाखांहून अधिक सक्रिय युजर्स या पारदर्शक व्यासपीठाशी जोडले गेले आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

नोकरी देणारे आणि शोधणारे यांना जोडण्यासाठी मध्यवर्ती यंत्रणा नव्हती.

प्रधानमंत्री युवा योजना

एनडीए सरकारचे विकासपर्व

आकडेवारीनुसार ७५ तरुण लेखकांची निवड करून त्यांना ६ महिन्यांसाठी ₹५०,००० प्रति महिना शिष्यवृत्ती आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जात आहे, ज्यामुळे भारतीय वारसा जागतिक स्तरावर पोहोचत आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

तरुण लेखकांसाठी कोणतीही राष्ट्रीय स्तरावरील मार्गदर्शक (मेंटॉरशिप) योजना नव्हती, ज्यामुळे नवोदित लेखकांना त्यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी आर्थिक आणि तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असे.

Y20 परिषद

एनडीए सरकारचे विकासपर्व

भारताच्या जी-२० अध्यक्षपदाच्या काळात Y20 परिषदेद्वारे भारतीय तरुणांनी हवामान बदल आणि उद्योजकतेवर जागतिक नेत्यांशी थेट संवाद साधला, ज्यामुळे भारताच्या युवा शक्तीची जागतिक प्रतिमा उंचावली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

संशोधनाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे २०१४ मध्ये जागतिक नाविन्यपूर्ण निर्देशांकात (GII) भारत ८१ व्या स्थानावर फेकला गेला होता.

प्रधानमंत्री श्री स्कूल्स

एनडीए सरकारचे विकासपर्व

₹२७,३६० कोटींच्या तरतुदीसह १४,५०० पेक्षा जास्त शाळांचा कायापालट केला जात आहे. या शाळा आता सौर ऊर्जा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज अशा 'मॉडेल' शाळा बनल्या आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

देशातील सरकारी शाळांची अवस्था दयनीय होती; स्मार्ट क्लासरूम आणि अत्याधुनिक प्रयोगशाळांचा अभाव असल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते.

वन नेशन वन सबस्क्रिप्शन

एनडीए सरकारचे विकासपर्व

₹६,००० कोटींच्या तरतुदीसह हे क्रांतिकारी धोरण लागू केले गेले असून, आता देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला जागतिक स्तरावरील संशोधन साहित्य मोफत आणि सहज उपलब्ध झाले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

महागड्या वैज्ञानिक नियतकालिकांचे सबस्क्रिप्शन केवळ मोठ्या आणि श्रीमंत शिक्षण संस्थांपुरते मर्यादित होते, ज्यामुळे ग्रामीण भागातील संशोधक आणि विद्यार्थी जागतिक ज्ञानापासून वंचित राहत होते.

उच्च शिक्षण आयोग आणि परदेशी विद्यापीठे

एनडीए सरकारचे विकासपर्व

'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' अंतर्गत एचसीएलमुळे शैक्षणिक नियमावली सुटसुटीत झाली असून, डीकिन सारख्या जगातील उत्तम विद्यापीठांनी भारतात कॅम्पस सुरू केले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा परदेश प्रवासाचा खर्च वाचून 'ब्रेन ड्रेन'ला आळा बसत आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

युजीसीसारख्या संस्थांच्या क्लिष्ट नियमावलीमुळे उच्च शिक्षणात अकार्यक्षमता होती; परदेशी विद्यापीठांना भारतात येण्यास परवानगी नसल्याने हजारो भारतीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी दरवर्षी अब्जावधी रुपये खर्च करून परदेशात जावे लागत असे.



मोदी सरकार 4 महाराष्ट्र



मोदी सरकार आणि महाराष्ट्र

"मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा! प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा।" कवी गोविंदग्रज यांचे हे शब्द महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आणि स्वाभिमान अचूकपणे मांडतात. या अलौकिक वारशाला आधुनिकतेची जोड देत २०१४ ते २०२६ या काळात राज्याने प्रगतीचा एक अभूतपूर्व सुवर्णकाळ पाहिला आहे. या मोठ्या बदलाचा पाया फक्त राजकीय नाही, तर त्याला 'राष्ट्र प्रथम' आणि 'अंत्योदय' या विचारांचा भक्कम वारसा लाभला आहे. शिवरायांचा स्वाभिमान आणि संतांचे संस्कार लाभलेल्या महाराष्ट्रात, याच मूल्यांमधून आलेली कर्तव्यनिष्ठा आणि लोकसेवेची भावना आज प्रत्येक विकासकामात स्पष्टपणे जाणवत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना महाराष्ट्रात प्रत्यक्षात आणण्याचे काम, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृष्टीने आणि खंबीर नेतृत्वाने केले. भारताला आर्थिक महासत्ता बनवण्यात महाराष्ट्राचा वाटा सर्वात मोठा आहे. देशात सर्वाधिक महसूल देणारे महाराष्ट्र हेच भारताच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ आणि केंद्रबिंदू आहे. देशातील हे पहिल्या क्रमांकाचे स्थान म्हणजेच संपूर्ण भारताला गती देणारा महाराष्ट्राचा दबदबा आहे! मोदीजींचे खंबीर नेतृत्व आणि केंद्राच्या मोठ्या पाठबळामुळेच राज्याच्या कानाकोपऱ्यात आज विकासाची नवी पहाट उजाडली आहे.

आजचा महाराष्ट्र पाहताना एक नवा इतिहास घडताना दिसतो. मुंबईचा देखणा 'अटल सेतू' आणि सुसाट धावणारी मेट्रो आज जागतिक पातळीवर स्पर्धा करत आहेत. दुसरीकडे, भारतीय जनता पक्षाच्या वैचारिक अधिष्ठानाचे मुख्य केंद्र असणाऱ्या नागपूरचा झालेला कायापालट, तिथली देखणी 'माझी मेट्रो' आणि थेट उपराजधानीला मुंबईशी जोडणारा 'समृद्धी महामार्ग' आज विदर्भ आणि संपूर्ण राज्याच्या प्रगतीचा मुख्य कणा बनला आहे. हा केवळ रस्ते आणि इमारतींचा विकास नाही, तर सांस्कृतिक अस्मितेचा सोहळा आहे. नाशिकचा भव्य सिंहस्थ कुंभमेळा असो की पंढरपूरचे पावन पालखी मार्ग; केंद्राच्या भक्कम पाठबळामुळे सांस्कृतिक वैभवाला एक नवे आणि सुंदर रूप मिळाले आहे. त्यातच, संत ज्ञानेश्वरांच्या "अमृतातेही पैजा जिंके" अशा मराठी भाषेला मिळालेला 'अभिजात भाषेचा' दर्जा म्हणजे भाषिक वारशाला मिळालेली सर्वोच्च राजमान्यताच आहे.

या संपूर्ण विकास प्रवासाला थेट जनतेच्या दारापर्यंत नेण्यासाठी कार्यकर्त्यांचे एक भक्कम संघटन उभे आहे, ज्याची संघटनात्मक धुरा आज प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी समर्थपणे सांभाळली आहे. याच प्रेरणेतून, कोकणच्या किनारपट्टीपासून ते गडचिरोलीच्या आदिवासी पाड्यापर्यंत, आणि उत्तर महाराष्ट्राच्या दुर्गम भागातील शेतकऱ्याच्या घरापासून ते मराठवाड्याच्या दुष्काळमुक्त होत असलेल्या गावांपर्यंत आज जो समृद्ध बदल दिसतोय, त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मार्गदर्शक नेतृत्व, राज्याचे योग्य नियोजन आणि लाखो कार्यकर्त्यांची अहोरात्र घेतलेली मेहनत लागली आहे. हा नवा, बलशाली महाराष्ट्र आता थांबणार नाही, तो देशाला प्रगतीच्या शिखरावर घेऊन जाण्यासाठी पूर्णपणे सज्ज झाला आहे !

जय हिंद, जय महाराष्ट्र !

महाराष्ट्राच्या विकासाचे नवे पर्व :

जीएसटी संकलन
महाराष्ट्राने एप्रिल २०२६ मध्ये ₹२२,९२९ कोटी संकलित केले. (आर्थिक वर्ष २०२५-२६ चे एकूण वार्षिक संकलन ₹१.८७ लाख कोटी आहे). महाराष्ट्र राज्य भारतामध्ये सर्वाधिक GST संकलन करणारे आहे.

पीएम आवास योजना
महाराष्ट्र राज्यात आतापर्यंत एकूण २८.४० लाख घरे बांधून पूर्ण झाली आहेत.

राष्ट्रीय महामार्ग
राज्यातील राष्ट्रीय महामार्गांचे जाळे विस्तारित होऊन आता एकूण लांबी १८,४६२ किमी वर पोहोचली आहे.

जल जीवन मिशन
ग्रामीण महाराष्ट्रातील ९०.४७% घरांना आता नळाद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

रेल्वे अर्थसंकल्प
२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र राज्यासाठी विक्रमी ₹२३,७७८ कोटींची वार्षिक तरतूद करण्यात आली आहे.

इलेक्ट्रिक वाहने
महाराष्ट्रात ९,२७,३४० हून अधिक ईव्ही नोंदणी झाली असून राज्य देशातील 'इलेक्ट्रिक व्हेईकल हब' बनले आहे.

अक्षय ऊर्जा
महाराष्ट्राची अक्षय ऊर्जा स्थापित क्षमता आता १८,०४६ मेगावॅट इतक्या उच्चांकावर पोहोचली आहे.

केंद्राचा कर परतावा
राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्राकडून २०२५-२६ मध्ये ₹८७,९०३ कोटींचा थेट कर परतावा प्राप्त झाला आहे.

संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग
आळंदी ते पंढरपूर दरम्यानच्या २३४ किमी महामार्गाचे ₹७,६२५ कोटी खर्चून ४-लेन रस्ते रुंदीकरण करण्यात आले असून, वारकऱ्यांसाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला स्वतंत्र ४.५ मीटरचा विस्तीर्ण पादचारी मार्ग बांधण्यात आला आहे.

संत तुकाराम पालखी मार्ग
देहू ते पंढरपूर दरम्यानच्या १३० किमी मार्गाचे ₹४,४१६ कोटी खर्चून काम केले जात असून, यातील पाटस-बारामती टप्पा पूर्ण झाला आहे आणि इंदापूर-तोंडले टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

मेट्रो रेल्वे
राज्यात २४० किमी पेक्षा जास्त मेट्रो मार्ग कार्यान्वित असून दररोज २२ लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करत आहेत.

रेल्वे अर्थसंकल्प
२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र राज्यासाठी विक्रमी ₹२३,७७८ कोटींची वार्षिक तरतूद करण्यात आली आहे.



स्वामित्व योजना
राज्यातील ३७,३४० गावांमधील घरांची ड्रोनद्वारे मोजणी पूर्ण होऊन प्रॉपर्टी कार्ड वाटपाचे काम प्रगत टप्प्यावर आहे.

वाढवण बंदर
पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदरासाठी ₹७६,२२० कोटींच्या गुंतवणुकीसह जागतिक दर्जाच्या कामाला गती मिळाली आहे.

पीएम स्वनिधी
महाराष्ट्रातील ८.८५ लाखांहून अधिक पथविक्रेत्यांना बँकांमार्फत विनातारण कर्ज उपलब्ध करून दिले आहे.

नवी मुंबई विमानतळ
विमानतळाचे काम पूर्ण झाले असून मार्च २०२६ मध्ये उड्डाणे सुरू झाली आहेत.

पीएम मत्स्य संपदा
कोळी बांधवांसाठी आणि मासेमारीच्या विकासासाठी ₹१३०० कोटींचे विशेष प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.

मराठी अभिजात भाषा
केंद्र सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठीला 'अभिजात भाषेचा' दर्जा दिला असून, संशोधन केंद्रासाठी वार्षिक ₹१ ते ₹१.५ कोटी केंद्रीय निधीची तरतूद केली आहे.

लातूर वंदे भारत फॅक्टरी
या प्रकल्पासाठी एकूण ₹६८५.७९ कोटी खर्च झाले असून, १२० स्लीपर वंदे भारत ट्रेनसेट तयार करण्याचे काम वेगात सुरू आहे आणि जून २०२६ मध्ये पहिल्या ट्रेनची चाचणी घेतली जाईल.

वारी महामार्ग विकास
एकूण ५७४ किमी लांबीचे १३ महामार्गांच्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवली असून या पालखी मार्गांच्या विकासासाठी एकूण ₹१२,२९४ कोटींची गुंतवणूक झाली आहे.

दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे
महाराष्ट्रातील १७१ किमी टप्प्यासाठी ₹२३,००० कोटी खर्च केले जात असून, माथेरान पर्यावरण क्षेत्रात ४ किमीचा ८-लेन बोगदा कार्यरत झाला आहे.

नाशिक सिंहस्थ कुंभमेळा
केंद्र आणि महाराष्ट्र शासनाने ₹२५,०५५ कोटींचा भव्य आराखडा मंजूर केला असून, नाशिकमध्ये ₹३९३ कोटींचे १८ नवीन उड्डाणपूल होणार आहेत, जेणेकरून १४ कोटी भाविकांसाठी २१ महिन्यांचा सोहळा सुलभ होईल.

पुणे इन्फ्रा कॉरिडोर
पुण्याची ट्रॅफिक कोंडी फोडण्यासाठी १७२ किमीचा आऊटर रिंग रोड आणि ५३.४ किमीचा पुणे-शिरूर एलिव्हेटेड हायवे यांसारख्या भव्य प्रकल्पांवर ₹२४,००० कोटींपेक्षा जास्त खर्च केला जात असून, यामुळे ६ राष्ट्रीय महामार्ग थेट जोडले जातील.

स्माईल योजना
देशात आतापर्यंत ३३,१९१ पेक्षा जास्त तृतीयपंथीयांना ओळखपत्रे दिली असून, २३ गरिमा गृहांद्वारे पुनर्वसन आणि आयुष्मान भारत योजनेअंतर्गत प्रतिवर्ष ₹५ लाखांचे मोफत आरोग्य कवच दिले आहे.

पीएम आयुष्यमान भारत
राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या अधिकृत अहवालानुसार महाराष्ट्रात आतापर्यंत २ कोटी ७९ लाखांपेक्षा जास्त वैयक्तिक आयुष्मान कार्डे थेट नागरिकांना जारी करण्यात आली.

विज्ञान भारत - तंत्रज्ञान क्रांतीचा नवा अध्याय

प्रयोगशाळेतून अवकाशापर्यंत: 'स्वदेशी' तंत्रज्ञानाचा जागतिक दबदबा लस निर्मिती ते अंतराळ स्थानक; आधुनिक भारताची विज्ञानाकडे झेप

'युवा भारत' या प्रकरणात आपण पाहिले की, देशातील तरुणाई आज खेळ आणि उद्योजकतेमध्ये नवीन शिखरे सर करत आहे. पण ही युवा शक्ती जेव्हा आधुनिक विज्ञानाची कास धरते, तेव्हा जग बदलण्याची ताकद निर्माण होते. एकेकाळी भारत तंत्रज्ञानासाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून असायचा, पण गेल्या १२ वर्षांत ही परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' मध्ये 'जय अनुसंधान' (संशोधन) हा नवा मंत्र जोडला आणि तिथूनच खऱ्या अर्थाने 'विज्ञान भारत'च्या प्रवासाला वेग आला.

या क्रांतीची पहिली मोठी साक्ष जगाला तेव्हा मिळाली जेव्हा संपूर्ण जग कोरोनाच्या संकटात होते. भारताने केवळ स्वतःची 'मेड इन इंडिया' लस तयार केली नाही, तर 'व्हॅक्सिन मैत्री'च्या माध्यमातून जगाला संजीवनी दिली. विज्ञानाचा हा वारसा केवळ जमिनीवर मर्यादित राहिला नाही, तर तो अवकाशातही पोहोचला. चांद्रयान-३ च्या दक्षिण ध्रुवावरील यशस्वी लँडिंगने भारताने इतिहास रचला आणि आता भारत स्वतःचे 'भारतीय अंतराळ स्थानक' उभारण्याच्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे.

विज्ञानाचा हा प्रवास केवळ मोठ्या मोहिमांपुरता मर्यादित नाही, तर तो सामान्यांच्या आयुष्यात 'डिजिटल इंडिया' आणि 'स्वदेशी 5जी'च्या रूपाने पोहोचला आहे. हायड्रोजन मिशनपासून ते डीप ओशन मिशनपर्यंत, भारत आज अशा क्षेत्रांत संशोधन करत आहे जिथे जगातील मोजकेच देश पोहोचू शकले आहेत. ही केवळ विज्ञानाची प्रगती नाही, तर हे प्रत्येक भारतीयाच्या आत्मविश्वासाचे आणि तांत्रिक सामर्थ्याचे प्रतिबिंब आहे.

भाजपा
महाराष्ट्र



लस निर्मिती व संशोधन

प्रारंभ दिनांक - २९ नोव्हेंबर २०२०

जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय संशोधनात भारताने जागतिक स्तरावर आपली क्षमता सिद्ध केली असून, देश आता वैयक्तिक आरोग्य उपचारांच्या नव्या युगात प्रवेश करत आहे. यामुळे आता अत्याधुनिक जनुकीय संशोधनाचा वापर करून प्रत्येक रुग्णाच्या प्रकृतीनुसार विशेष उपचार पद्धती विकसित केल्या जात आहेत. गंभीर आजारांचे निवारण करणे सुलभ झाले असून, सर्वसामान्य नागरिकांना कमी खर्चात जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळून त्यांचे आयुष्य अधिक सुरक्षित होत आहे.

- **स्वदेशी बनावट :**
  भारताने कोवॅक्सीन आणि कोविशिल्डच्या माध्यमातून जगातील सर्वात मोठी आणि यशस्वी लसीकरण मोहीम राबवली आहे.
- **व्हॅक्सिन मैत्री :**
  भारताने 'वसुधैव कुटुंबकम' या भावनेतून १०० हून अधिक देशांना ३० कोटींपेक्षा जास्त लसींचे डोस पुरवून 'जगाचे औषधालय' म्हणून आपली प्रतिमा निर्माण केली.
- **जीनोम इंडिया प्रोजेक्ट :**
  १०,००० भारतीय जनुकीय माहितीचा अभ्यास पूर्ण करून भविष्यातील वैयक्तिक आणि अचूक औषधोपचाराचा पाया रचला आहे.
- **जैव-तंत्रज्ञान हब :**
  'मिशन कोव्हिड सुरक्षा' अंतर्गत लस उत्पादनासाठी पायाभूत सुविधा बळकट केल्यामुळे भारत आता केवळ मानवी लस नव्हे, तर डीएनए (DNA) आधारित लसींच्या संशोधनातही जगात आघाडीवर आहे.






"आज भारत जगाची फार्मसी बनला आहे. आपल्या शास्त्रज्ञांनी स्वदेशी लस तयार करून केवळ देशाचेच नाही, तर संपूर्ण जगाचे प्राण वाचवले आहेत."

नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशन

प्रारंभ दिनांक- ४ जानेवारी २०२३

पारंपारिक इंधनावरील अवलंबित्व कमी करून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी भारत हायड्रोजन ऊर्जेचा जागतिक उत्पादक बनण्याच्या दिशेने पावले टाकत आहे. यामुळे आता कार्बन उत्सर्जन कमी होऊन हवामान बदलाचे संकट दूर होण्यास मदत होईल आणि हरित ऊर्जेच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होऊन देश आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम बनेल, ज्यामुळे भविष्यात भारताला ऊर्जेसाठी इतर देशांवर अवलंबून राहण्याची अजिबात गरज भासणार नाही.



- **ऊर्जा स्वातंत्र्य :**
  २०३० पर्यंत वार्षिक ५ दशलक्ष मेट्रिक टन हायड्रोजन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवून भारत इंधन क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहे.
- **मोठी गुंतवणूक :**
  या मिशनसाठी सरकारने ₹१९,७४४ कोटींची तरतूद केली असून यामुळे कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.
- **जागतिक हब :**
  भारत जगातील ग्रीन हायड्रोजन निर्मिती आणि निर्यातीचे मुख्य केंद्र (Hub) बनण्याच्या दिशेने पावले टाकत आहे.
- **रोजगार निर्मिती :**
  या मिशनमुळे २०२३ पर्यंत देशात ६ लाखांहून अधिक नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा आणि जीवाश्म इंधनाच्या आयातीत १ लाख कोटी रुपयांची बचत होण्याचा अंदाज आहे.



"नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशन भारताला हरित ऊर्जा क्षेत्रात जागतिक केंद्र बनवेल. हा आपला ऊर्जेत पूर्णपणे आत्मनिर्भर होण्याचा महासंकल्प आहे."

5जी

प्रारंभ दिनांक - ९ ऑक्टोबर २०२२

दूरसंचार क्षेत्रात परकीय तंत्रज्ञानावर विसंबून न राहता, भारताने स्वतःचे नेटवर्क विकसित करून दळणवळणाची गती बदलून टाकली आहे. स्वदेशी ५जी तंत्रज्ञानामुळे आता ग्रामीण भागातही वेगवान इंटरनेट पोहोचले असून, यामुळे शिक्षण, आरोग्य आणि व्यापार क्षेत्रात मोठी डिजिटल क्रांती घडून आली आहे. भारताची ही तांत्रिक झेप देशाला जागतिक स्तरावर दूरसंचार क्षेत्रात एक प्रबळ आणि आत्मनिर्भर राष्ट्र म्हणून खऱ्या अर्थाने स्थापित करत आहे.

- **विक्रमी विस्तार :**
  जगातील सर्वात वेगवान 5जी मोबाईल सेवा भारतात सुरू झाली असून ४ लाखांहून अधिक 5जी बेस स्टेशन्स कार्यान्वित झाली आहेत.
- **स्वदेशी तंत्रज्ञान :**
  भारताने स्वतःचे 5जी तंत्रज्ञान विकसित केले असून आता 'स्वदेशी 6जी' तंत्रज्ञानावर वेगाने संशोधन सुरू आहे.
- **कनेक्टिव्हिटी :**
  डिजिटल क्रांतीचा वेग वाढवण्यासाठी देशातील दुर्गम भागांतही हाय-स्पीड इंटरनेट पोहोचवण्यात आले आहे.
- **आर्थिक प्रभाव :**
  ५जी तंत्रज्ञानामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला २०३५ पर्यंत ३६ लाख कोटी रुपयांहून अधिक (४५० अब्ज डॉलर्स) लाभ मिळण्याची शक्यता आहे.





"भारताने ५जी क्षेत्रात जगात सर्वात वेगवान प्रगती केली आहे. आता आपण ६जी (6G) तंत्रज्ञानात जगात आघाडी घेण्यासाठी आत्तापासूनच सज्ज झालो आहोत."

डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर

प्रारंभ दिनांक -९ जुलै २०१५

तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसामान्य नागरिकांचे जीवन सुकर आणि शासकीय सेवा पारदर्शक बनवण्यात भारताचे डिजिटल प्रारूप जगात आघाडीवर आहे. युपीआय आणि आधारसारख्या सुविधांमुळे आता सर्वसामान्यांचे आर्थिक व्यवहार सुरक्षित झाले असून सरकारी योजनांचा लाभ थेट लोकांच्या बँक खात्यात विनासायास जमा होत आहे. या डिजिटल क्रांतीमुळे भ्रष्टाचाराला आळा बसून कामात प्रचंड वेग आला आहे, ज्यामुळे भारताची प्रगती अधिक शाश्वत आणि सर्वसमावेशक होत आहे.



- **UPI क्रांती :**
  यूपीआय तंत्रज्ञानाने भारताला डिजिटल पेमेंटमध्ये जगात प्रथम स्थानी नेले असून अनेक देशांनी हे प्रारूप स्वीकारले आहे.
- **आधार आणि डिजिलॉकर :**
  कागदमुक्त प्रशासन आणि पारदर्शक सेवांसाठी आधार व डिजिलॉकर यांसारख्या स्वदेशी सुविधांनी क्रांती घडवली आहे.
- **ग्लोबल स्टँडर्ड :**
  भारताचे डिजिटल प्रारूप आज जागतिक स्तरावर 'इंडियन स्टॅक' म्हणून ओळखले आणि वाखाणले जात आहे.
- **डिजिलॉकर :**
  कागदमुक्त प्रशासनासाठी तयार केलेल्या डिजिलॉकरचे ६७ कोटींहून अधिक वापरकर्ते असून ६ अब्जांहून अधिक कागदपत्रे यात डिजिटल स्वरूपात उपलब्ध आहेत.




"भारताचे 'डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर' हे तंत्रज्ञानाच्या लोकशाहीकरणाचे जिवंत उदाहरण आहे. याने देशाच्या शेवटच्या टोकावरील नागरिकाला थेट सक्षम केले आहे."

डीप ओशन मिशन

मंजुरी दिनांक - १६ जून २०२१

अंतराळाप्रमाणेच महासागराच्या अथांग आणि दुर्गम तळाचा अभ्यास करून देशाची आर्थिक ताकद वाढवण्यासाठी हे मिशन सुरू करण्यात आले आहे. यामुळे आता खोल समुद्रातील मौल्यवान खनिजे आणि नैसर्गिक संसाधनांचा शोध घेणे शक्य होणार असून, निळ्या अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. भारताचे हे पाऊल सागरी सुरक्षेसोबतच वैज्ञानिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून, देश या क्षेत्रात जगाचे नेतृत्व करण्यास सज्ज आहे.

- **मत्स्य ६००० :**
  समुद्राच्या ६,००० मीटर खोलवर मानवाला नेणारी 'मत्स्य ६०००' ही स्वदेशी पाणबुडी विकसित करून भारत सागरी संशोधनात आघाडी घेत आहे.
- **खनिज शोध :**
  समुद्राच्या तळाशी असलेल्या दुर्मिळ खनिजांचा शोध घेऊन 'ब्लू इकॉनॉमी' मजबूत करणे हे या मिशनचे मुख्य ध्येय आहे.
- **मोजकेच देश :**
  अशा प्रकारचे अत्याधुनिक खोल सागरी अभियान राबवणारा भारत हा जगातील मोजक्या सहा देशांपैकी एक आहे.
- **पर्यावरण अभ्यास :**
  या मिशनमुळे हवामान बदलाचा समुद्रावर होणारा परिणाम आणि सागरी जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी नवीन व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.





"ज्याप्रमाणे आपण अंतराळाच्या कक्षा पादाक्रांत करत आहोत, तसेच 'डीप ओशन मिशन'द्वारे आपण समुद्राच्या अथांग खोलीत उतरत आहोत. ही 'ब्लू इकॉनॉमी' आपल्या समृद्धीचा नवा पाया आहे."

भारतीय अंतराळ मिशन

प्रारंभ दिनांक -२४ सप्टेंबर २०१४

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने अत्यंत मर्यादित संसाधनांमध्ये अशक्य वाटणाऱ्या मोहिमा फत्ते करून जागतिक स्तरावर इतिहास रचला आहे. चंद्रयान आणि मंगळयान सारख्या यशस्वी मोहिमांमुळे भारताची तांत्रिक क्षमता जगाने मान्य केली असून, आता गगनयान मोहिमेद्वारे आपण मानवाला अंतराळात पाठवण्यास सज्ज झालो आहोत. या यशाने केवळ देशाचा अभिमान वाढला नाही, तर जागतिक अंतराळ बाजारपेठेत भारताने स्वतःचे एक भक्कम आणि विश्वासार्ह स्थान निर्माण केले आहे.



- **मंगळयान :**
  भारताने ५ नोव्हेंबर २०१३ रोजी 'मार्स ऑर्बिटर मिशन' प्रक्षेपित केले आणि २४ सप्टेंबर २०१४ रोजी पहिल्याच प्रयत्नात मंगळाच्या कक्षेत प्रवेश करणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला.
- **चांद्रयान-३ :**
  २३ ऑगस्ट २०२३ रोजी चांद्रयान-३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी 'सॉफ्ट लँडिंग' केले. अशी कामगिरी करणारा भारत हा जगातील पहिला देश बनला.
- **कमी खर्च :**
  भारताने अतिशय कमी खर्चात आणि स्वदेशी तंत्रज्ञानाच्या जोरावर या आंतरराष्ट्रीय मोहिमा यशस्वी केल्या आहेत. आणि वाखाणले जात आहे.
- **व्यावसायिक यश :**
  इस्रोने आतापर्यंत ४०० हून अधिक परदेशी उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण करून जागतिक अंतराळ बाजारपेठेत भारताला एक विश्वासार्ह केंद्र बनवले आहे.



"चंद्रयान आणि आदित्य एल-१ मोहिमांनी हे सिद्ध केले आहे की भारत अंतराळ संशोधनात जगात कोणापेक्षाही कमी नाही. आपल्या इस्रोच्या वैज्ञानिकांचा देशाला सार्थ अभिमान आहे."

भारतीय अंतराळ स्थानक

मंजुरी दिनांक - १८ सप्टेंबर २०२४

अंतराळ क्षेत्रातील महासत्ता म्हणून स्वतःची ओळख अधिक मजबूत करण्यासाठी भारत आता अवकाशात स्वतःचे केंद्र प्रस्थापित करत आहे. या भारतीय अंतराळ स्थानकामुळे भविष्यातील मोहिमांसाठी शास्त्रज्ञांना अवकाशात राहून दीर्घकाळ संशोधन करणे शक्य होईल, ज्यामुळे विज्ञानातील नवीन शोध लागतील. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारताचे अंतराळ तंत्रज्ञान अधिक स्वावलंबी बनेल आणि जागतिक स्तरावर आपला देश अंतराळ संशोधनात सर्वोच्च शिखरावर पोहोचून जगाला नवी दिशा देईल.

- **स्वतःचे घर :**
  २०३५ पर्यंत भारताचे स्वतःचे अंतराळ स्थानक उभारण्याचे नियोजन असून ते पूर्णपणे स्वदेशी बनावटीचे असेल.
- **दीर्घकालीन संशोधन :**
  यामुळे भारतीय अंतराळवीरांना अवकाशात दीर्घकाळ राहून वैज्ञानिक प्रयोग करण्याची संधी उपलब्ध होईल.
- **प्रगतीपथावर :**
  २०२८ पर्यंत या स्थानकाचा पहिला टप्पा कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट इस्रोने ठेवले आहे.
- **तंत्रज्ञान प्रदर्शन :**
  या स्थानकासाठी आवश्यक असणारे 'डॉकिंग तंत्रज्ञान' आणि 'स्पेस कॅप्सूल'चे प्राथमिक परीक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे.





"अंतराळात आता भारताचे स्वतःचे घर असेल. २०३५ पर्यंत आपण स्वतःचे 'भारतीय अंतराळ स्थानक' उभारण्याच्या ध्येयावर वेगाने काम करत आहोत."

गगनयान मोहीम

प्रारंभ दिनांक -२१ ऑक्टोबर २०२३

भारतीय बनावटीच्या रॉकेटमधून भारतीय नागरिकाला अवकाशात पाठवून सुरक्षित परत आणण्याची ही भारताची अत्यंत प्रतिष्ठेची मोहीम आहे. या 'गगनयान' मोहिमेमुळे भारत मानवी अंतराळ प्रवास करणारा जगातील चौथा देश ठरेल, ज्यामुळे आपल्या शास्त्रज्ञांच्या कौशल्याचा गौरव होईल. या ऐतिहासिक यशामुळे भविष्यात अंतराळ संशोधनाच्या नवीन संधी उपलब्ध होतील आणि देशातील तरुण पिढीला विज्ञानाच्या क्षेत्रात मोठी कामगिरी करण्याची प्रेरणा मिळून भारताची मान जगात उंचावेल.



- **मानवी झेप :**
  भारतीय अंतराळवीरांना स्वदेशी रॉकेटमधून अवकाशात पाठवण्याची ही भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे.
- **सुरक्षितता चाचण्या :**
  अंतराळवीरांसाठी जीवनावश्यक 'क्रू एस्केप सिस्टिम आणि ह्युमन-रेटेड रॉकेटच्या विविध चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या आहेत.
- **निवड आणि प्रशिक्षण :**
  या मोहिमेसाठी चार अंतराळवीरांची निवड करण्यात आली असून त्यांचे सखोल प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.
- **रोबोटिक चाचणी :**
  मानवाआधी 'व्योममित्र' नावाचा स्वदेशी मानवरूपी रोबोट (Humanoid) अवकाशात पाठवून सर्व यंत्रणांची तांत्रिक तपासणी केली जाणार आहे.



"गगनयान मोहीम हा भारताच्या अंतराळ प्रवासातील ऐतिहासिक टप्पा आहे. या मोहिमेद्वारे भारताचे स्वतःचे अंतराळवीर आपल्या स्वतःच्या रॉकेटमधून अंतराळात झेप घेतील."

नॅशनल सुपरकॉम्प्युटिंग मिशन

प्रारंभ दिनांक - २५ मार्च २०१५

जटिल वैज्ञानिक संशोधन आणि डेटा विश्लेषणाचा वेग वाढवण्यासाठी देशात महासंगणकांचे एक मोठे जाळे निर्माण केले जात आहे. या अद्ययावत सुपरकॉम्प्युटिंग सुविधेमुळे आता हवामानाचा अचूक अंदाज वर्तवणे, औषध निर्मिती आणि संरक्षण क्षेत्रातील प्रगत चाचण्या करणे अधिक सोपे झाले आहे. भारताची ही तांत्रिक प्रगती देशाला विज्ञानाच्या जगात महासत्ता बनवण्यासाठी अत्यंत मोलाची ठरणार असून, यामुळे संशोधकांना जागतिक दर्जाची साधनसामग्री आता मायदेशातच उपलब्ध होत आहे.

- **परम मालिका :**
  'परम' मालिकेतील स्वदेशी महासंगणक देशभर बसवण्यात आले असून संशोधनाचा वेग अनेक पटींनी वाढला आहे.
- **उपयोग :**
  हवामान अंदाज, औषध निर्मिती आणि जटिल वैज्ञानिक गणनांसाठी या सुपरकॉम्प्युटर्सचा मोठा लाभ होत आहे.
- **शैक्षणिक प्रगती :**
  देशातील ३० हून अधिक संस्थांमध्ये सुपरकॉम्प्युटिंग ग्रिड तयार करून संशोधकांसाठी मोठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे.
- **आत्मनिर्भरता :**
  मिशनच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत आता सुपरकॉम्प्युटरचे मुख्य भाग भारतातच तयार करून 'डिझाइन आणि मॅन्युफॅक्चरिंग'मध्ये भारत स्वावलंबी होत आहे.





"डेटा आणि गती हीच २१ व्या शतकातील खरी ताकद आहे. 'नॅशनल सुपरकॉम्प्युटिंग मिशन' द्वारे आपण भारतीय संशोधनाला महासंगणकांची अभूतपूर्व शक्ती देत आहोत."

इंडिया एआय मिशन

प्रारंभ दिनांक- ७ मार्च २०२४

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात भारताला जागतिक स्तरावर आघाडीवर नेण्यासाठी सरकार एआय पायाभूत सुविधांचा विस्तार करत आहे. यासाठी 'इंडिया एआय मिशन' अंतर्गत सुपरकम्प्युटिंग यंत्रणा, डेटा सेंटर्स आणि तांत्रिक संसाधनांची निर्मिती वेगाने सुरू आहे. या भक्कम डिजिटल पायामुळे देशात नाविन्यपूर्ण संशोधनाला गती मिळेल, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि भारत तंत्रज्ञान क्षेत्रात आत्मनिर्भर बनून जगाचे नेतृत्व करेल.



- **GPU सबसिडी :**
  स्टार्टअप्स आणि संशोधकांसाठी हाय-एंड GPU सर्व्हर्स केवळ ₹६५ प्रति तास या सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले जात आहेत.
- **एआय पायाभूत सुविधा :**
  भारताला 'एआय हब' बनवण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर तांत्रिक पायाभूत सुविधांची उभारणी केली आहे.
- **स्वदेशी मॉडेल्स :**
  भारतीय भाषा आणि स्थानिक गरजांसाठी विशेष एआय मॉडेल्स विकसित करण्यावर भर दिला जात आहे.
- **एआय साक्षरता :**
  टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील तरुणांना एआयचे प्रगत शिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवले जात आहेत.



"भारताचे धोरण 'AI फॉर ऑल' (सर्वांसाठी एआय) हे आहे. 'इंडिया एआय मिशन'च्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर सामान्य माणसाचे जीवन अधिक सुकर करण्यासाठी केला जात आहे."

विकासाचे प्रगतीपुस्तक

विज्ञाननिष्ठ भारताची तपपूर्ती

लस निर्मिती व बायोटेक

एनडीए सरकारचे विकासपर्व

भारताने स्वदेशी 'कोवॅक्सीन' तयार केली आणि 'व्हॅक्सिन मैत्री' द्वारे १०० हून अधिक देशांना लसींचा पुरवठा केला.

यूपीए सरकारची दुरावस्था

भारत नवीन लसींच्या संशोधनासाठी आणि उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय देशांवर अवलंबून होता.

डिजिटल इन्फ्रा

एनडीए सरकारचे विकासपर्व

युपीआय, आधार आणि डिजिलॉकरच्या माध्यमातून भारताने जगातील सर्वात प्रगत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभी केली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

देशाचा आर्थिक गाडा हा कागदी व्यवहार आणि रोख अर्थव्यवस्थेवर चालत होता, ज्यामुळे सेवा पोहोचण्यात विलंब होत असे.

ग्रीन हायड्रोजन मिशन

एनडीए सरकारचे विकासपर्व

₹१९,७४४ कोटींच्या गुंतवणुकीसह भारत २०३० पर्यंत ५ दशलक्ष मेट्रिक टन हायड्रोजन उत्पादनाचे लक्ष्य ठेवून जागतिक हब बनत आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

देशाचे मुख्य लक्ष केवळ पारंपारिक इंधनावर होते आणि हरित ऊर्जेचे कोणतेही ठोस राष्ट्रीय धोरण अस्तित्वात नव्हते.

डीप ओशन मिशन

एनडीए सरकारचे विकासपर्व

'मत्स्य ६०००' या स्वदेशी पाणबुडीद्वारे ६ किमी खोल समुद्रतळ गाठण्याची क्षमता मिळवून भारत अशा मोहिमेतील जगातील ६ वा देश ठरला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

महासागराच्या अथांग तळाचा अभ्यास करण्यासाठी भारताकडे पुरेशी संसाधने आणि प्रगत तांत्रिक यंत्रणा उपलब्ध नव्हती.

5जी तंत्रज्ञान

एनडीए सरकारचे विकासपर्व

भारताने जगातील सर्वात वेगवान 5जी नेटवर्क विस्तार केला असून आता स्वदेशी 6जी तंत्रज्ञानावर संशोधन करणारा अग्रणी देश बनला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

दूरसंचार क्षेत्रात भारत २जी आणि ३जी तंत्रज्ञानाच्या वापरासाठी पूर्णपणे परकीय कंपन्यांच्या उपकरणांवर विसंबून होता.

चांद्रयान आणि मंगलयान

एनडीए सरकारचे विकासपर्व

चांद्रयान-३ द्वारे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला असून मंगळयान मोहीम यशस्वी केली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

भारताचे अंतराळ अभियान हे सुरुवातीच्या टप्प्यात होते आणि मोहिमांचे यश केवळ कक्षेत पोहोचण्यापुरते मर्यादित होते.

भारतीय अंतराळ स्थानक

एनडीए सरकारचे विकासपर्व

भारताने २०३५ पर्यंत स्वतःचे स्वदेशी 'भारतीय अंतराळ स्थानक' उभारण्याचे अधिकृत उद्दिष्ट ठेवून त्यावर काम सुरू केले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

भविष्यातील अंतराळ संशोधनासाठी भारताचे स्वतःचे स्वतंत्र केंद्र असावे, असे कोणतेही निश्चित ध्येय किंवा आराखडा नव्हता.

इंडिया एआय मिशन

एनडीए सरकारचे विकासपर्व

स्टार्टअप्ससाठी जगात सर्वात स्वस्त GPU (₹६५/प्रतितास) उपलब्ध करून देऊन भारताने स्वतःचे स्वतंत्र एआय मिशन आणि मॉडेल विकसित केले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

कृत्रिम बुद्धिमत्ता एआय क्षेत्रात भारताचे धोरण आणि तांत्रिक पायाभूत सुविधा जागतिक तुलनेत नगण्य होत्या.

गगनयान मोहीम

एनडीए सरकारचे विकासपर्व

भारतीय अंतराळवीरांची निवड, प्रशिक्षण पूर्ण झाले असून स्वदेशी रॉकेटद्वारे मानवाला अवकाशात पाठवण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

मानवी अंतराळ मोहिमेचा विचार प्राथमिक स्तरावर होता, परंतु त्यासाठी लागणारे रॉकेट आणि तंत्रज्ञान विकसित झाले नव्हते.

सेमीकंडक्टर मिशन

एनडीए सरकारचे विकासपर्व

₹७६,००० कोटींच्या 'सेमीकॉन इंडिया' मिशनद्वारे देशातच सेमीकंडक्टर आणि चिप निर्मितीचे महाप्रकल्प सुरू करून भारताने पाया रचला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

इलेक्ट्रॉनिक्स आणि मायक्रोचिपच्या आयातीसाठी भारत पूर्णपणे परकीय देशांवर अवलंबून होता, ज्यामुळे देशाची तांत्रिक सुरक्षा धोक्यात होती.

सुपरकॉम्प्युटिंग

एनडीए सरकारचे विकासपर्व

'नॅशनल सुपरकॉम्प्युटिंग मिशन' अंतर्गत 'परम' मालिकेतील स्वदेशी महासंगणकांचे जाळे देशभर उभारून वैज्ञानिक प्रगतीला गती दिली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

महासंगणकांसाठी भारत पूर्णपणे परकीय बनावटीच्या चिप्स आणि सॉफ्टवेअरवर अवलंबून असल्याने संशोधनात मर्यादा येत होत्या.

राष्ट्रीय क्वांटम मिशन

एनडीए सरकारचे विकासपर्व

₹६,००३ कोटींच्या निधीसह 'नॅशनल क्वांटम मिशन' सुरू करून, या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर काम करणारा भारत जगातील मोजक्या ६व्या देशांमध्ये सामील झाला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

भविष्यातील सर्वात प्रगत आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या क्वांटम कॉम्प्युटिंग क्षेत्रात भारताचे कोणतेही ठोस राष्ट्रीय धोरण नव्हते.



मातृप्रधान भारत

घराच्या उंबरठ्यापासून संसदेपर्यंत: 'नारीशक्ती' चा सुवर्णकाळ
सुरक्षा, सन्मान आणि सक्षमीकरण; नव्या भारताच्या विकासाचे मातृरूप

'विज्ञान भारत' या प्रकरणात आपण पाहिले की, भारताने अवकाशात आणि तंत्रज्ञानात कशी झेप घेतली आहे. पण या विज्ञानाचा आणि प्रगतीचा खरा उपयोग तेव्हाच होतो जेव्हा समाजातील महत्वपूर्ण शक्ती, म्हणजेच आपली मातृशक्ती, मुख्य प्रवाहात येते. 'चांद्रयान-३' च्या यशात जसा महिला शास्त्रज्ञांचा मोठा वाटा होता, तसेच देशाच्या प्रगतीच्या प्रत्येक क्षेत्रात आज महिला नेतृत्व करत आहेत. गेल्या १२ वर्षांत 'मातृप्रधान भारत' ही संकल्पना खऱ्या अर्थाने वास्तवात आली आहे.

या परिवर्तनाची सुरुवात घराच्या स्वयंपाकघरातून झाली. 'उज्ज्वला योजने'ने माता-भगिनींना धुरापासून मुक्ती देऊन त्यांचे आरोग्य सुरक्षित केले, तर 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' मोहिमेने मुलींकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला. विज्ञानाने दिलेल्या सोयी आणि सरकारने केलेल्या 'तिहेरी तलाक' सारख्या ऐतिहासिक कायद्यांमुळे महिलांना सामाजिक सुरक्षा मिळाली. केवळ सुरक्षाच नाही, तर 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'द्वारे (महिला आरक्षण बिल) त्यांना देशाच्या सर्वोच्च धोरणनिर्मिती प्रक्रियेत सन्मानाचे स्थान देण्यात आले आहे.

आजची भारतीय महिला केवळ लाभार्थी नाही, तर ती 'ड्रोन दीदी' बनून शेती करत आहे, लढाऊ विमाने चालवत आहे आणि स्टार्टअप्सच्या माध्यमातून अर्थव्यवस्था सावरत आहे. जेव्हा स्त्री सक्षम होते, तेव्हा एक कुटुंब सक्षम होते आणि पर्यायाने देश महासत्तेकडे वाटचाल करतो. हा प्रवास केवळ स्त्री सक्षमीकरणाचा नाही, तर भारताला पुन्हा एकदा 'मातृप्रधान' संस्कृतीकडे नेणारा एक गौरवशाली अध्याय आहे.

भाजपा
महाराष्ट्र



प्रधानमंत्री उज्ज्वला योजना

प्रारंभ दिनांक-१ मे २०१६

ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्यांना पारंपरिक चूल-धुराच्या त्रासातून मुक्त करून सन्मानाचे जीवन देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. यामुळे आता स्वच्छ इंधन मिळाल्याने महिलांना श्वसनाच्या आजारांपासून मुक्ती मिळाली असून, स्वयंपाकाचा वेळ वाचल्यामुळे त्या इतर आर्थिक कामात स्वतःला गुंतवू शकत आहेत. या बदलामुळे ग्रामीण कुटुंबांचे जीवनमान उंचावले असून, पर्यावरणाचे रक्षण आणि महिला सक्षमीकरणाचा एक नवा अध्याय देशात सुरू झाला आहे.

- **धूरमुक्त जीवन :**
  ग्रामीण भागातील १०.३ कोटींहून अधिक महिलांना मोफत गॅस कनेक्शन देऊन त्यांना लाकूड फाट्याच्या धुरापासून आणि श्वसनाच्या आजारांपासून मुक्त केले आहे.

- **आरोग्य आणि वेळ :**
  या योजनेमुळे महिलांच्या वेळेची बचत झाली असून, त्या वेळेचा वापर त्या आता लघुउद्योगांसाठी किंवा कौटुंबिक प्रगतीसाठी करत आहेत.

- **आर्थिक दिलासा :**
  गरिबातील गरीब कुटुंबापर्यंत स्वच्छ इंधन पोहोचवून सरकारने महिलांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारला आहे.

- **उज्ज्वला २.० :**
  स्थलांतरित मजुरांना कोणताही रहिवासी पुरावा न देता केवळ स्व-घोषणेच्या आधारावर मोफत गॅस कनेक्शन देण्याची सुलभ सुविधा या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात सुरू करण्यात आली आहे.





"स्वयंपाकघरात लाकडाचा धूर सहन करावा लागू नये म्हणून उज्ज्वला योजनेअंतर्गत गॅस कनेक्शन देण्यात आले. एलपीजीमुळे (LPG) पारंपारिक सरपण गोळा करण्यात जाणारा महिलांचा वेळ आणि श्रम वाचले आहेत, ज्यामुळे त्यांना आपल्या फावल्या वेळेचा उपयोग आर्थिक प्रगतीसाठी करणे शक्य झाले आहे."

बेटी बचाओ, बेटी पढाओ

२२ जानेवारी २०१५

मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, त्यांचे संरक्षण करणे आणि त्यांना दर्जेदार शिक्षण देऊन समाजात एकसमान स्थान मिळवून देणे हे या मोहिमेचे मुख्य ध्येय आहे. यामुळे आता समाजाचा दृष्टिकोन बदलत असून मुलींना प्रगतीच्या समान संधी मिळत आहेत, ज्यायोगे त्या प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करत आहेत. या सकारात्मक बदलामुळे देशातील स्त्री-पुरुष लिंगगुणोत्तर सुधारण्यास मोठी मदत होऊन महिला सक्षमीकरणाचा पाया अधिक भक्कम झाला आहे.



- **लिंगदरात सुधार :**
  या मोहिमेमुळे देशातील लिंग गुणोत्तर सुधारले असून दर १००० मुलांमागे मुलींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

- **शिक्षण प्रसार :**
  मुलींच्या शाळेतील गळतीचे प्रमाण कमी झाले असून उच्च शिक्षणात मुलींचा सहभाग पूर्वीपेक्षा अनेक पटींनी वाढला आहे.

- **सामाजिक जागृती :**
  'मुलगा-मुलगी एकसमान' ही भावना जनमानसात रुजवण्यात या योजनेने मोठी भूमिका बजावली आहे.

- **संस्थात्मक प्रसूती वाढली :**
  या मोहिमेमुळे ग्रामीण भागात गरोदर महिलांची रुग्णालयातील प्रसूती वाढली असून, माता आणि बाल मृत्यू दरात मोठी घट झाली आहे.



"'बेटी बचाओ बेटी पढ़ाओ' मोहिमेने देशातील लैंगिक भेदभाव दूर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या योजनेने एक अशी योग्य परिसंस्था तयार केली आहे, ज्यामुळे आपल्या मुलींना शिक्षण मिळणे आणि त्यांना आपली स्वप्ने पूर्ण करण्याच्या पुरेशा संधी मिळणे निश्चित झाले आहे."

सुकन्या समृद्धी योजना

प्रारंभ दिनांक- २२ जानेवारी २०१५

मुलींच्या उच्च शिक्षणाचा आणि उज्ज्वल भविष्याचा आर्थिक भार पालकांवर पडू नये, यासाठी ही एक अत्यंत फायदेशीर आणि सुरक्षित बचत योजना आहे. या योजनेमुळे पालकांना आपल्या मुलीच्या लग्नासाठी आणि शिक्षणासाठी वेळेवर हक्काचा मोठा निधी उपलब्ध होतो, ज्यामुळे कुटुंबाची आर्थिक ओढाताण थांबली आहे. सरकारी हमी आणि चांगल्या परताव्यामुळे ग्रामीण भागातील मुलींच्या प्रगतीला मोठी चालना मिळत असून त्या आता स्वतःचे स्वप्न साकार करत आहेत.

- **आर्थिक सुरक्षितता :**
  मुलींच्या भविष्यातील शिक्षण आणि लग्नासाठी पालकांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सर्वात जास्त व्याजदराची बचत योजना म्हणून ओळखली जाते.
- **विक्रमी खाती :**
  देशात ३ कोटींहून अधिक सुकन्या समृद्धी खाती उघडण्यात आली असून, त्याद्वारे मुलींच्या नावे मोठी रक्कम सुरक्षित जमा होत आहे.
- **आत्मनिर्भर भविष्य :**
  १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मुलीला स्वतःच्या उच्च शिक्षणासाठी यातील ५०% रक्कम काढण्याची मुभा देण्यात आली आहे.
- **कर सवलत :**
  या योजनेत गुंतवलेली रक्कम, त्यावर मिळणारे व्याज आणि मॅच्युरिटीनंतर मिळणारी एकूण रक्कम या तिन्हींवर प्राप्तिकरातून पूर्णपणे सूट मिळते.





"सुकन्या समृद्धी योजना ही भारतभरातील लाखो मुलींसाठी आशा आणि सक्षमीकरणाचा एक नवा किरण आहे. मुलींची स्वप्ने आणि त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सरकारच्या असलेल्या कटिबद्धतेचे हे जिवंत प्रतीक आहे. आर्थिक सुरक्षा आणि सामाजिक सक्षमीकरण एकाच सूत्रात विणणे हाच याचा मुख्य उद्देश आहे."

तिहेरी तलाक विरोधी कायदा

प्रारंभ दिनांक-१ ऑगस्ट २०१९

मुस्लिम महिलांना शतकानुशतके चालत आलेल्या एका अन्यायी प्रथेपासून मुक्त करून त्यांना सामाजिक समता आणि कायदेशीर हक्क मिळवून देणारा हा एक ऐतिहासिक निर्णय आहे. या कायद्यामुळे आता तात्काळ तिहेरी तलाक देण्याच्या अघोरी प्रथेला चाप बसला असून, महिलांना कौटुंबिक छळापासून कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. यामुळे मुस्लिम भगिनींना सन्मानाने जगण्याची नवी संधी प्राप्त झाली आहे, ज्यामुळे समाजात खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता नांदण्यास मदत होईल.



- **कायदेशीर संरक्षण :**
  मुस्लिम महिलांना जाचक 'तिहेरी तलाक' प्रथेपासून मुक्त करून त्यांना सामाजिक आणि कायदेशीर न्याय मिळवून दिला आहे.
- **सन्मानाने जगण्याचा अधिकार :**
  या कायद्यामुळे महिलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण झाले असून कुटुंबातील त्यांचे स्थान अधिक सुरक्षित झाले आहे.
- **गुन्हेगारीला आळा :**
  बेकायदेशीररित्या घटस्फोट देणाऱ्या प्रवृत्तींवर कायदेशीर वचक निर्माण झाला असून घटस्फोटाच्या प्रमाणात मोठी घट झाली आहे.
- **आर्थिक तरतूद :**
  या कायद्यानुसार पीडित महिला आपल्या पतीकडून स्वतःच्या आणि मुलांच्या निर्वाहासाठी 'भत्ता' मागण्यास कायदेशीररीत्या पात्र ठरली आहे.

"तीन तलाक सारख्या कुप्रथांमुळे महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी कडक कायदा बनवण्यात आला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे देशातील करोडो मुस्लिम भगिनींना सुरक्षा, सन्मान आणि एक नवीन आत्मविश्वास मिळाला आहे."



महिला आरक्षण बिल - नारी शक्ती वंदन अधिनियम

देशाच्या राजकारणात आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवून त्यांना धोरणात्मक अधिकार देण्यासाठी संसदेने मंजूर केलेला हा अत्यंत क्रांतिकारी कायदा आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना हक्काचे आरक्षण मिळणार असून, यामुळे देशाच्या विकासाशी संबंधित महत्त्वाच्या धोरणांमध्ये स्त्रीशक्तीचा आवाज अधिक प्रभावी ठरेल. या बदलामुळे लोकशाही मजबूत होऊन महिलांना राजकीय क्षेत्रात नेतृत्व करण्याची समान संधी उपलब्ध होईल. हा कायदा खऱ्या अर्थाने निर्णायक ठरेल.

- **राजकीय प्रतिनिधित्व :**
  संसदेत आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३% आरक्षण; ज्यामुळे भारताची लोकशाही अधिक प्रगल्भ, सशक्त आणि सर्वसमावेशक बनेल.
- **निर्णय प्रक्रियेत सहभाग :**
  देशाची राष्ट्रीय धोरणे ठरवताना महिलांचा सहभाग वाढणार; ज्यामुळे त्यांच्या मूलभूत समस्यांवर अधिक प्रभावी आणि शाश्वत उपाय शोधणे शक्य होईल.
- **नवे नेतृत्व :**
  राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर महिला नेतृत्वाची एक सक्षम फळी तयार होणार; जी देशाच्या राजकीय आणि सामाजिक भविष्याला नवी दिशा देईल.
- **सामाजिक न्यायाची प्रस्थापना :**
  राजकारणातील महिलांची भागीदारी केवळ सक्षमीकरण नसून सामाजिक न्याय आहे; ज्यामुळे समाजात महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल.



"नारी शक्ती वंदन अधिनियमाची अंमलबजावणी ही सर्व महिलांच्या जीवनात एक खूप मोठी संधी ठरणार आहे. आता पंचायत ते संसदेपर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास सुलभ होईल. आज, 'विकसित भारत' घडवण्याच्या आपल्या प्रवासात महिलांची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण बनली आहे."

नमो ड्रोन दीदी योजना

प्रारंभ दिनांक- ३० नोव्हेंबर २०२३

ग्रामीण महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन त्यांना शेती व्यवसायात सक्षम करणे, हे 'लखपती दीदी' बनवण्याच्या दिशेने एक क्रांतिकारी पाऊल आहे. महिलांच्या हाती ड्रोनसारखे प्रगत साधन देऊन भारताने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा चेहरा बदलण्यास सुरुवात केली आहे. यामुळे शेती अधिक स्मार्ट आणि सुरक्षित झाली असून, या उपक्रमाद्वारे ग्रामीण भागातील स्त्रिया आता तंत्रज्ञानाच्या जोरावर समृद्ध आणि खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर भारताच्या नव्या शिल्पकार ठरत आहेत.





- **कृषी क्षेत्रातील तांत्रिक क्रांती :**
  महिला बचत गटांना ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण आणि ड्रोन उपलब्ध करून दिल्याने, शेतात खते व कीटकनाशकांची फवारणी करणे अधिक सोपे, अचूक आणि सुरक्षित झाले आहे.
- **नवे रोजगार आणि सक्षमीकरण :**
  'ड्रोन पायलट' म्हणून प्रशिक्षण मिळाल्याने ग्रामीण महिलांना रोजगाराची आधुनिक संधी मिळाली असून, त्या गावातील 'स्मार्ट' उद्योजिका म्हणून नावारूपास येत आहेत.
- **वेळ, पाणी आणि खर्चाची बचत :**
  ड्रोनच्या सहाय्याने अवघ्या काही मिनिटांत फवारणी शक्य झाल्याने औषधांचा अपव्यय टळला आहे, परिणामी शेतकऱ्यांच्या वेळेत आणि खर्चात मोठी बचत होत आहे.
- **आधुनिक शेतीला विज्ञानाचा आधार :**
  मजुरांच्या कमतरतेवर मात करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून, या माध्यमातून महिला ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रगतीत मुख्य भूमिका बजावत आहेत.

"नमो ड्रोन दीदी अभियानाने आपल्या बहिणी आणि मुलींच्या कामाचा सन्मान वाढवून ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण केल्या आहेत . गावातील माता-भगिनी केवळ एकाच हंगामात शेतीत ड्रोन चालवून लाखो रुपये कमवत आहेत."



लखपती दीदी योजना

प्रारंभ दिनांक १५ ऑगस्ट २०२३

ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांचे वार्षिक उत्पन्न किमान १ लाख रुपये करणे. या महत्त्वपूर्ण ध्येयामुळे आता गावागावांत महिला बचत गटांना मोठे बळ मिळाले असून, त्यांना कौशल्य विकास आणि उद्योजकतेचे विशेष धडे दिले जात आहेत. या उपक्रमामुळे दुर्गम भागातील स्त्रिया आता स्वतःचे छोटे उद्योग यशस्वीपणे चालवत आहेत, ज्यायोगे त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावून ग्रामीण भारतात समृद्धीची आणि सक्षमीकरणाची एक नवीन लाट निर्माण होत आहे.

- **कौशल्य विकास आणि प्रशिक्षण :**
  महिला बचत गटांना ड्रोन पायलट, प्लंबिंग आणि एलईडी बल्ब बनवण्यासारख्या आधुनिक तांत्रिक व्यवसायांचे विशेष प्रशिक्षण देऊन त्यांना काळाशी जोडले जात आहे.

- **आर्थिक पाठबळ आणि भांडवल :**
  कोट्यवधी महिलांना बचत गटांच्या माध्यमातून व्यवसायासाठी सुलभ कर्ज आणि सरकारी भांडवल उपलब्ध करून दिले आहे, ज्यामुळे त्यांच्या उद्योगांना गती मिळाली आहे.

- **बाजारपेठ आणि उद्योजकता :**
  महिलांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देत, ३ कोटी महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

- **आत्मसन्मान आणि स्वावलंबन :**
  या उपक्रमामुळे महिला केवळ पारंपरिक कामात न अडकता आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाल्या आहेत, ज्यायोगे त्यांच्या कुटुंबाचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावला आहे.





"जेव्हा आपण 'विकसित भारत'चा विचार करतो, तेव्हा आपली 'नारी शक्ती' त्याचे सर्वात मोठे आधारस्तंभ आहे. आम्ही देशातील ३ कोटी ग्रामीण बहिणींना 'लखपती दीदी' बनवण्याचा महासंकल्प केला आहे. आज २ कोटींहून अधिक भगिनी लखपती दीदी बनून कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावत आहेत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करत आहेत."

महिला श्रमशक्ती सहभाग

प्रारंभ दिनांक- १ एप्रिल २०१७

गेल्या १२ वर्षांत भारतीय महिला केवळ कुटुंबाचा आधार न राहता देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा बनल्या आहेत. महिला श्रमशक्ती सहभागात झालेली विक्रमी वाढ ही त्यांच्या जिद्दीची आणि आर्थिक स्वावलंबनाची एक यशोगाथा आहे. यामुळे आता महिला केवळ नोकरी शोधणाऱ्या न राहता नोकरी देणाऱ्या उद्योजिका बनल्या असून, त्यांच्या कौशल्यामुळे भारताचे नाव जगात उंचावत आहे. भविष्यात देशाला तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनवण्यासाठी अत्यंत मोलाचे योगदान देणार आहे.



- **आर्थिक क्रांती आणि स्वावलंबन :**
  शेतमजुरीपासून स्टार्टअप्सपर्यंत महिलांचा सहभाग वाढला असून, सत्तेचे आणि संपत्तीचे विकेंद्रीकरण खऱ्या अर्थाने महिलांच्या हाती पोहोचले आहे.

- **कौशल्य आणि तंत्रज्ञानाची जोड :**
  डिजिटल क्रांतीमुळे महिला आता पारंपरिक कामाच्या पलीकडे जाऊन तांत्रिक क्षेत्रात नेतृत्व करत आहेत, ज्यामुळे त्यांची उत्पादकता आणि सामाजिक सन्मान वाढला आहे.

- **आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षा :**
  नियमित रोजगार आणि विम्यासारख्या सामाजिक सुरक्षेमुळे महिलांच्या आयुष्यात आर्थिक स्थैर्य आले असून, अर्थार्जन ही आता त्यांच्या स्वाभिमानाची बाब बनली आहे.

- **निर्णय प्रक्रिया आणि नेतृत्व :**
  आर्थिक स्वातंत्र्यामुळे महिला आता 'नोकरी शोधणाऱ्या' न राहता 'नोकरी देणाऱ्या' उद्योजिका बनल्या आहेत, ज्यामुळे सामाजिक स्तरावर त्यांच्या निर्णयक्षमतेला नवी ओळख मिळाली आहे.



"देशाच्या वाढत्या अर्थव्यवस्थेचा महिलांना फायदा तर होतच आहे, पण महिला देखील देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. स्टार्टअप्सपासून ते अंतराळ क्षेत्रापर्यंत, आज आपल्या मुली पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून देशाच्या विकासात बरोबरीच्या भागीदार बनल्या आहेत."

विकासाचे प्रगतीपुस्तक

नारीसिद्ध भारताची तपपूर्ती

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना

एनडीए सरकारचे विकासपर्व

१०.३ कोटींहून अधिक महिलांना मोफत गॅस कनेक्शन देऊन त्यांना धूरमुक्त आणि आरोग्यदायी जीवन मिळाले आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

ग्रामीण भागातील कोट्यवधी महिलांना स्वयंपाकासाठी लाकूड आणि शेणाच्या धुराचा सामना करावा लागत होता.

तिहेरी तलाक विरोधी कायदा

एनडीए सरकारचे विकासपर्व

केंद्र सरकारने ऐतिहासिक कायदा करून ही प्रथा बंद केली असून, महिलांना सामाजिक सुरक्षा आणि सन्मानाने जगण्याचा हक्क दिला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

मुस्लिम महिलांना 'तिहेरी तलाक' सारख्या जाचक प्रथेमुळे कोणताही कायदेशीर आधार नसताना अन्यायाचा सामना करावा लागत होता.

बेटी बचाओ, बेटी पढाओ

एनडीए सरकारचे विकासपर्व

लिंग गुणोत्तरात लक्षणीय सुधारणा झाली असून मुलींचा शिक्षणातील सहभाग आणि आत्मविश्वास वाढला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

अनेक राज्यांमध्ये मुलींच्या जन्माचे प्रमाण (लिंग गुणोत्तर) वेगाने घटत होते आणि शैक्षणिक गळती मोठी होती.

नारी शक्ती वंदन अधिनियम

एनडीए सरकारचे विकासपर्व

संसदेने महिला आरक्षण विधेयक मंजूर करून देशाच्या धोरण निर्मितीत महिलांचा सहभाग निश्चित करणारा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

विधानसभा आणि संसदेत महिलांच्या ३३% आरक्षणाची मागणी अनेक दशकांपासून प्रलंबित होती.

सुकन्या समृद्धी योजना

एनडीए सरकारचे विकासपर्व

३ कोटींहून अधिक खाती उघडली गेली असून, मुलींच्या नावे सुरक्षित आर्थिक तरतूद करण्याची मोठी चळवळ उभी राहिली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

मुलींच्या भविष्यातील शिक्षण आणि लग्नासाठी पालकांकडे कोणतीही विशेष आणि उच्च व्याजदराची बचत योजना उपलब्ध नव्हती.

नमो ड्रोन दीदी योजना

एनडीए सरकारचे विकासपर्व

ग्रामीण महिलांना ड्रोन पायलटचे प्रशिक्षण देऊन त्यांना आधुनिक शेतीचे नेतृत्व करण्याची आणि नवे उत्पन्न मिळवण्याची संधी मिळाली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

शेती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान आणि ड्रोनचा वापर केवळ मर्यादित स्वरूपात किंवा मोठ्या संस्थांपुरता मर्यादित होता.

लखपती दीदी योजना

एनडीए सरकारचे विकासपर्व

तांत्रिक कौशल्य आणि आर्थिक पाठबळाच्या जोरावर ३ कोटी महिलांना वार्षिक १ लाख रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवून देण्याचे उद्दिष्ट साध्य होत आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

महिला बचत गटांचे काम प्रामुख्याने लहान घरगुती उत्पादनांपुरते आणि मर्यादित उत्पन्नापुरतेच सीमित राहिले होते.

महिला श्रमशक्ती सहभाग दर

एनडीए सरकारचे विकासपर्व

एनडीए च्या काळात सरकारने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे यामध्ये मोठी झेप पाहायला मिळाली असून त्यात १०.५% ची वाढ झाली असून ते ४२% झाली आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

युपीए च्या काळात महिलांचा सहभाग दर अत्यंत संथ होता आणि २०११-१२ पर्यंत तो केवळ ३१.२% वर रेंगाळत होता.

मातृत्व सुरक्षा व स्त्री आरोग्य

एनडीए सरकारचे विकासपर्व

'सुरक्षित मातृत्व अभियाना'द्वारे दरमहा ९ तारखेला मोफत तज्ज्ञ तपासणी सुरू झाली, आणि 'जनऔषधी' केंद्रांद्वारे अवघ्या १ रुपयात सॅनिटरी नॅपकिन्स उपलब्ध करून महिलांचे आरोग्य सुरक्षित केले.

यूपीए सरकारची दुरावस्था

ग्रामीण गर्भवती महिलांच्या मोफत आरोग्य तपासणीची आणि सॅनिटरी नॅपकिन्ससारख्या मूलभूत साधनांची मोठी कमतरता होती.



समृद्ध - स्वच्छ - स्वस्थ भारत


विकासाचा महामार्ग, आरोग्याचा आधार: समृद्धीच्या दिशेने भारताची मोठी झेप
आधुनिक पायाभूत सुविधा आणि निरोगी नागरिक; विकसित भारताचा नवा मंत्र

'नारीशक्ती' या प्रकरणात आपण पाहिले की, महिलांच्या सन्मानासाठी 'उज्ज्वला' आणि 'स्वच्छ भारत' सारख्या मोहिमांनी कशी क्रांती घडवली. पण ही शक्ती जेव्हा एका निरोगी आणि स्वच्छ वातावरणात कार्य करते, तेव्हा देशाला 'समृद्ध भारत' होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. समृद्धीचा अर्थ केवळ आर्थिक प्रगती नसून, तो देशातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्य, वैचारिक प्रगती आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांशी निगडित आहे. गेल्या १२ वर्षांत भारताने याच व्यापक समृद्धीचे स्वप्न पाहिले आणि ते सत्यात उतरवण्यासाठी 'स्वच्छता' हा संस्कार बनवला.

'स्वच्छ भारत' मोहिमेमुळे केवळ कचरामुक्त शहरे झाली नाहीत, तर 'स्वस्थ भारत'च्या दिशेने आपण पहिले पाऊल टाकले. 'आयुष्मान भारत' सारख्या जगातील सर्वात मोठ्या आरोग्य योजनेने गरिबांना उपचारांचा हक्क दिला, तर 'प्रधानमंत्री जन औषधी' केंद्रांनी महागडी औषधे स्वस्त करून सर्वसामान्यांचे खिसे सावरले. ही आर्थिक समृद्धी केवळ आरोग्यापुरती मर्यादित नाही; आज भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला असून, 'गती शक्ती' आणि 'नॅशनल इन्फ्रा पाईपलाईन' मुळे देशाचा कानाकोपरा आधुनिक रस्ते, रेल्वे आणि विमानतळांनी जोडला गेला आहे.

वैचारिक समृद्धीचा विचार करताना, आपण आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगायला शिकलो आहोत. 'काशी विश्वनाथ धाम' पासून ते 'अयोध्या राम मंदिरा'पर्यंत आणि 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' सारख्या वास्तूंतून भारताचे पर्यटन जागतिक नकाशावर चमकत आहे. जेव्हा एखादा पर्यटक भारतात येतो, तेव्हा त्याला केवळ रस्ते दिसत नाहीत, तर त्याला एक स्वच्छ, स्वस्थ आणि वैचारिकदृष्ट्या प्रबळ झालेला भारत दिसतो. हाच समृद्ध भारत उद्याच्या 'विकसित भारत'चा खरा चेहरा आहे.

भाजपा
महाराष्ट्र



स्वच्छ आणि स्वस्थ भारत

प्रारंभ दिनांक- २ ऑक्टोबर २०१४

निरोगी नागरिक हाच देशाच्या विकासाचा पाया असतो, हे लक्षात घेऊन आरोग्य आणि स्वच्छतेच्या क्षेत्रात भारताने जागतिक स्तरावर सर्वात मोठे बदल घडवून आणले आहेत. यामुळे आता प्रत्येक खेड्यापाड्यात शुद्ध पिण्याचे पाणी आणि शौचालयांची सोय उपलब्ध झाली असून, आरोग्यावरील वैयक्तिक खर्च कमी झाला आहे. डिजिटल आरोग्य सुविधेमुळे वैद्यकीय सेवा मिळवणे अधिक सुलभ झाले असून, एक सशक्त आणि आजारमुक्त राष्ट्र निर्माण होत आहे.

- **स्वच्छ भारत मिशन :**
  ११ कोटींहून अधिक शौचालये बांधून 'हागणदारीमुक्त' भारताचे स्वप्न पूर्ण केले, ज्याने जलजन्य आजारांत मोठी घट घडवून आणली आहे.
- **आयुष्मान भारत योजना :**
  जगातील सर्वात मोठ्या विमा योजनेद्वारे ५५ कोटी नागरिकांना वार्षिक ५ लाखांपर्यंत मोफत उपचार मिळून सामान्यांच्या आरोग्यावरील खर्च कमी झाला आहे.
- **जन औषधी केंद्रे :**
  देशभरात १०,००० हून अधिक केंद्रांमधून ब्रँडेड औषधांच्या तुलनेत ५०% ते ९०% स्वस्त दरात उच्च दर्जाची औषधे रुग्णांना उपलब्ध करून दिली आहेत.
- **डिजिटल आरोग्य क्रांती :**
  'आयुष्मान भारत डिजिटल मिशन' आणि 'ई-संजीवनी'द्वारे वैद्यकीय नोंदींचे डिजिटलीकरण आणि ऑनलाईन डॉक्टरी सल्ला मिळवणे प्रत्येकासाठी आता अधिक सोपे झाले आहे.





"स्वच्छता आणि आरोग्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जेव्हा आपण देश स्वच्छ ठेवतो, तेव्हा आपण गरिबांना आजारांपासून वाचवून एका स्वस्थ भारताची निर्मिती करतो. ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे."

आर्थिक समृद्धी

प्रारंभ दिनांक- ९ सप्टेंबर २०२२

आर्थिक धोरणांमधील सातत्य आणि डिजिटल क्रांतीच्या बळावर भारताने जागतिक अर्थव्यवस्थेत स्वतःचे एक वेगळे आणि भक्कम स्थान निर्माण केले आहे. गेल्या दशकात भारताने आर्थिक क्षेत्रात घेतलेली गगनभरारी आणि डिजिटल क्रांतीमुळे देश आज जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनला आहे. या प्रगतीमुळे आता सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक जीवन सुसह्य झाले असून, भारत येत्या काळात जगातील तिसरी मोठी आर्थिक शक्ती बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.



- **जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था :**
  गेल्या दशकभरातील धोरणात्मक निर्णयामुळे भारताने मोठी झेप घेत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याचा बहुमान मिळवला आहे.
- **डिजिटल पेमेंट आणि यूपीआय :**
  'कॅशलेस इंडिया'मुळे चहाच्या टपरीपासून मोठ्या मॉलपर्यंत पारदर्शक व्यवहार होत असून, जगातील एकूण ४६% डिजिटल व्यवहार एकट्या भारतात होत आहेत.
- **स्टार्टअप आणि उद्योजकता :**
  २ लाखांहून अधिक स्टार्टअप्ससह भारत आज जगातील तिसरी मोठी स्टार्टअप इकोसिस्टम बनला असून, भारतीय तरुण आता 'नोकरी देणारे' बनत आहेत.
- **थेट लाभ हस्तांतरण :**
  सरकारी योजनांचा पैसा 'जन धन' आणि 'आधार'च्या माध्यमातून थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत असल्याने भ्रष्टाचाराला आळा बसून पारदर्शकता आली आहे.



"गेल्या दशकात भारत जगातील दहाव्या क्रमांकावरून पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. आमचा उद्देश सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तन याद्वारे देशाच्या कानाकोपऱ्यात आर्थिक समृद्धी पोहोचवणे हा आहे."

पीएम गतिशक्ती

प्रारंभ दिनांक- १३ ऑक्टोबर २०२१

आधुनिक दळणवळण आणि वेगवान वाहतुकीसाठी देशाच्या कानाकोपऱ्यात रस्ते, रेल्वे आणि विमानतळांचे अत्याधुनिक जाळे विणले जात आहे. या पायाभूत सुविधांमुळे आता प्रवासाचा वेळ वाचत असून मालवाहतूक अधिक स्वस्त आणि जलद झाली आहे, ज्यामुळे उद्योगांना मोठी चालना मिळत आहे. पीएम गतिशक्ती आणि वंदे भारत सारख्या उपक्रमांमुळे दुर्गम भाग शहरांशी जोडले जाऊन देशाच्या कानाकोपऱ्यात नवीन रोजगार आणि आर्थिक विकासाच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत.

- **नॅशनल हायवे आणि एक्सप्रेसवे :**
  रस्ते बांधणीचा वेग दिवसाला ३७ किमी पर्यंत पोहोचला असून, देशाच्या कानाकोपऱ्यात जलदगती एक्सप्रेसवेचे जाळे विणले गेले आहे.

- **रेल्वे आधुनिकिकरण :**
  'वंदे भारत' सारख्या हाय-स्पीड ट्रेन्स आणि 'अमृत भारत' योजनेंतर्गत रेल्वे स्थानकांचे जागतिक दर्जाचे नूतनीकरण वेगाने सुरू आहे.

- **विमानतळ आणि उडाण योजना :**
  'उडाण' मुळे सर्वसामान्यांना विमान प्रवास परवडणारा झाला असून, देशातील विमानतळांची संख्या ७४ वरून १५० च्या वर गेली आहे.

- **बंदरे आणि जलमार्ग विकास :**
  'सागरमाला' प्रकल्प आणि राष्ट्रीय जलमार्गांच्या विकासामुळे मालवाहतूक स्वस्त झाली असून, भारताच्या सागरी व्यापाराला नवी दिशा मिळाली आहे.





"PM गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लान हा २१ व्या शतकातील भारताला नवी गती देणारा ठरेल. यामुळे पायाभूत सुविधांचे नियोजन वेगवान होईल, वाहतुकीचा खर्च कमी होईल आणि पुढील पिढीसाठी जागतिक दर्जाची कनेक्टीव्हिटी निर्माण होईल."

पर्यटन आणि सांस्कृतिक समृद्धी

प्रारंभ दिनांक - ९ मे २०१५

भारताचा प्राचीन सांस्कृतिक वारसा जतन करतानाच, धार्मिक पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थांना बळकटी देण्याचे काम केले जात आहे. यामुळे आता जगभरातून येणाऱ्या भाविकांची संख्या वाढल्याने वाहतूक, राहण्याची व्यवस्था आणि स्थानिक बाजारपेठांना मोठा फायदा होत आहे. अध्यात्माची आधुनिक विकासाशी सांगड घातल्यामुळे केवळ आपली श्रद्धास्थाने उजळून निघाली नाहीत, तर कोट्यवधी तरुणांना पर्यटन क्षेत्रात सन्मानाने रोजगार मिळवण्याची एक सुवर्णसंधी देखील निर्माण झाली आहे.



- **सांस्कृतिक पुनरुत्थान :**
  अयोध्या राम मंदिर, काशी विश्वनाथ आणि महाकाल लोकच्या निर्मितीमुळे धार्मिक पर्यटनात मोठी वाढ होऊन स्थानिक बाजारपेठांना मोठे आर्थिक बळ मिळाले आहे.

- **स्टॅच्यू ऑफ युनिटी :**
  सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जगातील सर्वात उंच पुतळ्यामुळे गुजरातच्या केवडिया भागाचे जागतिक पर्यटन केंद्र म्हणून रूपांतर होऊन आदिवासी भागाचा विकास झाला आहे.

- **विशेष पर्यटन सर्किट्स :**
  वाराणसी, अयोध्या आणि बौद्ध सर्किटसारख्या विशेष मार्गांमुळे कनेक्टिव्हिटी वाढली असून, परदेशी पर्यटकांची संख्या आणि परकीय चलन मिळवण्यात मोठी भर पडली आहे.

- **स्थानिक रोजगार आणि आदरातिथ्य :**
  पर्यटन क्षेत्रात वाढ झाल्यामुळे हॉटेल, गाईड्स, हस्तकला आणि वाहतूक क्षेत्रात रोजगाराच्या सुवर्णसंधी निर्माण होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेचा चेहरा बदलला आहे.

"भारताचा इतिहास, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा हे आपले सर्वात मोठे सामर्थ्य आहेत. जेव्हा आपण आपल्या पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर मजबूत करतो, तेव्हा केवळ संस्कृतीचे रक्षण होत नाही, तर स्थानिक पातळीवर रोजगाराच्या लाखो नव्या संधी निर्माण होतात."



वैचारिक आणि शैक्षणिक समृद्धी

प्रारंभ दिनांक- २१ जुलै २०२०

भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी युवा पिढीला कौशल्याधारित शिक्षण देणे आणि जागतिक स्तरावर भारताचे नेतृत्व प्रस्थापित करण्यावर विशेष भर दिला जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळत असून, तंत्रज्ञानाच्या जोरावर भारत आता 'विश्वमित्र' म्हणून उदयास येत आहे. या प्रगतीमुळे भारतीय तरुण जागतिक स्पर्धेत आघाडीवर असून, स्वावलंबी आणि समर्थ भारत घडवण्याच्या प्रक्रियेत त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरत आहे.

- **राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) :**
  ३४ वर्षांनंतर बदललेल्या या धोरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, संशोधन आणि मातृभाषेतून शिक्षणाला प्रोत्साहन मिळून शिक्षणाचे भारतीयकरण झाले आहे.

- **ग्लोबल लीडरशिप आणि विश्वमित्र :**
  'G-20' चे यशस्वी यजमानपद भूषवून भारताने हवामान बदल आणि डिजिटल क्रांती यांसारख्या जागतिक प्रश्नांवर जगाचे प्रभावी नेतृत्व केले आहे.

- **आत्मनिर्भर भारत आणि निर्यात :**
  संरक्षण साहित्यापासून मोबाईल निर्मितीपर्यंत भारत आता केवळ आयातदार राहिला नसून, एक मोठा निर्यातदार देश म्हणून जगात स्वावलंबी होत आहे.

- **युवा सक्षमीकरण आणि स्टार्टअप :**
  नवीन शैक्षणिक संधींमुळे भारतीय तरुण आता जागतिक पातळीवर नवनवीन स्टार्टअप्स उभे करत असून, देशाच्या विकासात सक्रिय भागीदार बनले आहेत.





"नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे (NEP) आपण भारताला पुन्हा एकदा जागतिक ज्ञानाचे केंद्र बनवण्यासाठी सज्ज होत आहोत. नालंदाच्या प्राचीन वैचारिक समृद्धीला आधुनिक संशोधनाची जोड देणे हेच आपले ध्येय आहे."

अपारंपरिक ऊर्जा

प्रारंभ दिनांक- १३ फेब्रुवारी २०२४

पर्यावरणाचे रक्षण आणि ऊर्जा क्षेत्रात देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी भारत आज शाश्वत ऊर्जेचे जागतिक केंद्र बनत आहे. नैसर्गिक स्रोतांचा वापर करून 'नेट झिरो' कडे जाणारी ही भारताची एक मोठी हरित क्रांती आहे. सौर आणि ई-मोबिलिटीच्या जोरावर आपण इंधनासाठीचे परकीय अवलंबित्व कमी करत आहोत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे आता प्रत्येक भारतीय घर आणि शेत ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊन पर्यावरणाचे रक्षण करत आहे.



- **सौर ऊर्जा क्रांती :**
  'पीएम सूर्यघर' योजनेद्वारे १ कोटी कुटुंबांना ३०० युनिटपर्यंत मोफत वीज आणि सौर पार्क्सच्या उभारणीमुळे भारत सौर ऊर्जेत जगात चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे.

- **पीएम कुसुम योजना :**
  २१.७७ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सौर कृषी पंप देऊन डिझेलचा खर्च वाचवला आणि दिवसा मोफत वीज देऊन शेतीला ऊर्जेत स्वयंपूर्ण केले आहे.

- **ई-मोबिलिटी आणि सक्षमीकरण :**
  'पीएम ई-ड्राइव्ह' योजनेमुळे इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढला असून, इंधनासाठीचे परकीय अवलंबित्व कमी करून 'नेट झिरो'च्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू आहे.

- **हरित हायड्रोजन आणि भविष्य :**
  अपारंपरिक ऊर्जेच्या नव्या स्रोतांवर भर देऊन भारत आता जगाची 'ग्रीन एनर्जी फॅक्टरी' बनत आहे, ज्यामुळे पर्यावरणासोबतच अर्थव्यवस्थेलाही मोठे बळ मिळत आहे.



"आज भारत अपारंपरिक ऊर्जा (Renewable Energy) क्षमतेच्या बाबतीत जगात अव्वल देशांमध्ये समाविष्ट आहे. पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेसारख्या उपक्रमांमुळे प्रत्येक कुटुंब आज वीज ग्राहक बनण्यासोबतच वीज उत्पादक देखील बनत आहे."

अणुऊर्जा

प्रारंभ दिनांक- ३१ ऑगस्ट २०२३

भारताचा अणुऊर्जा प्रवास स्वावलंबन, विज्ञान आणि राष्ट्रीय सुरक्षेचा अभिमान आहे. होमी भाभांच्या दूरदृष्टीपासून सुरू झालेला हा प्रवास आज स्वदेशी ७०० मेगावॉट रिॲक्टर, कल्पक्कमचा फास्ट ब्रीडर रिॲक्टर,आणि थोरियम तंत्रज्ञानापर्यंत पोहोचला आहे. मोदी सरकारच्या अणुऊर्जा अभियानामुळे २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जा क्षमतेचे लक्ष्य भारताला हरित, सुरक्षित आणि विकसित राष्ट्र बनवेल.

- **क्षमता वाढ आणि नवीन प्रकल्प :**
  भारताने अणुऊर्जा निर्मिती क्षमता तिपटीने वाढवण्याचे लक्ष्य ठेवले असून, गुजरात, राजस्थान आणि हरियाणामध्ये नवीन अणुभट्ट्यांचे काम वेगाने सुरू आहे. 'काक्रापार' येथील ७०० मेगावॅटची संपूर्ण स्वदेशी बनावटीची अणुभट्टी भारताच्या तांत्रिक प्रगतीचे प्रतीक आहे.

- **तीन टप्प्यातील अणू कार्यक्रम :**
  भाराताकडे असलेल्या थोरियमच्या अफाट साठ्याचा वापर करून ऊर्जा निर्मिती करण्यासाठी'थ्री-स्टेज न्यूक्लियर पॉवर प्रोग्राम'वर काम केले जात आहे. यामुळे भविष्यात भारत इंधनासाठी इतर देशांवर अवलंबून न राहता स्वतःच्या बळावर वीज निर्मिती करू शकेल.

- **शाश्वत आणि कार्बनमुक्त ऊर्जा :**
  सौर आणि पवन उर्जेला मर्यादा असल्या तरी, अणुऊर्जा ही चोवीस तास (24x7) उपलब्ध राहणारी प्रदूषण मुक्त ऊर्जा आहे. 'नेट झिरो २०७०' चे ध्येय गाठण्यासाठी आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी हे मिशन भारताच्या विकास प्रवासात कणा ठरणार आहे.





"भविष्यातील देशाच्या शाश्वत विकासासाठी आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी नागरी अणू ऊर्जा हे एक महत्त्वाचे माध्यम ठरणार आहे. २०४७ पर्यंत भारताची अणुऊर्जा क्षमता १० पटीने वाढवण्याचा आमचा संकल्प आहे."

ज्ञानभारतम् अभियान

प्रारंभ दिनांक- ९ फेब्रुवारी २०२५

भारताचा ऐतिहासिक वारसा केवळ वास्तूंमध्ये नसून तो पूर्वजांनी लिहिलेल्या लाखो हस्तलिखितांमध्ये साठवलेला आहे. हा अमूल्य ठेवा जतन करून प्राचीन भारतीय ज्ञानाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी 'ज्ञानभारतम्' ही एक व्यापक डिजिटल लोकचळवळ ठरत आहे. या मोहिमेमुळे लुप्त होत चाललेले खगोलशास्त्र, गणित आणि आयुर्वेदाचे ज्ञान पुन्हा प्रकाशात येत असून, आपली गौरवशाली संस्कृती आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भविष्यातील पिढ्यांसाठी अधिक सुरक्षित आणि समृद्ध केली जात आहे.



- **डिजिटल संवर्धन आणि ओळख :**
  प्राचीन हस्तलिखितांचे सर्वेक्षण करून त्यांना 'युनिक आयडी' दिला जात आहे, ज्यामुळे आपला सांस्कृतिक आणि वैज्ञानिक ठेवा डिजिटल स्वरूपात कायमस्वरूपी सुरक्षित राहील.

- **प्राचीन विज्ञानाचे पुनरुज्जीवन :**
  हस्तलिखितांमधील विखुरलेले ज्ञान एकत्रित करून त्यावर आधुनिक संशोधन केले जात आहे, ज्यामुळे प्राचीन भारताची वैज्ञानिक प्रगती पुन्हा एकदा जगासमोर ताकदीने येत आहे.

- **मराठी भाषेचा समृद्ध वारसा :**
  महाराष्ट्रातील १३ व्या शतकापासूनचा साहित्यिक इतिहास आणि मोडी लिपीतील दुर्मिळ हस्तलिखिते जतन करून मराठी भाषेची महान परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवली जात आहे.

- **लोकसहभाग आणि ज्ञानकोश :**
  'ज्ञानभारतम्' ॲपच्या माध्यमातून सामान्य नागरिकही आपल्याकडील हस्तलिखितांची माहिती देऊन या राष्ट्रीय ज्ञानकोशात योगदान देत आहेत, ज्यामुळे ही चळवळ घराघरांत पोहोचली आहे.

"भारताची हस्तलिखिते ही केवळ कागदपत्रे नाहीत, तर मानवाच्या विकास प्रवासाच्या पाऊलखुणा आहेत. 'ज्ञानभारतम् मिशन' हे केवळ सरकारी काम नाही, तर ते भारताची संस्कृती, साहित्य आणि चेतना जागवणारे एक मोठे आंदोलन आहे. या माध्यमातून आपण आपला प्राचीन ज्ञानवारसा आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने डिजिटल स्वरूपात सुरक्षित करत आहोत."



विकासाचे प्रगतीपुस्तक

नववैभवशाली भारताची तपपूर्ती

स्वच्छ आणि स्वस्थ भारत

एनडीए सरकारचे विकासपर्व

११ कोटी+ शौचालयांची निर्मिती; स्वच्छता व्याप्ती १००%. आयुष्मान भारत अंतर्गत १२ कोटी कुटुंबांना ₹५ लाखांचा मोफत विमा.

यूपीए सरकारची दुरावस्था

स्वच्छता व्याप्ती केवळ ३९% होती. गंभीर उपचारांसाठी गरिबांना पदरमोड करावी लागे.

आर्थिक समृद्धी

एनडीए सरकारचे विकासपर्व

भारत जगातील ५ वी मोठी अर्थव्यवस्था बनला. जगातील ४६% रियल-टाइम डिजिटल व्यवहार एकट्या भारतात होत आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

भारत जगातील १० वी मोठी अर्थव्यवस्था होता. GDP $१९ ट्रिलियनच्या आसपास होता.

पायाभूत सुविधा

एनडीए सरकारचे विकासपर्व

हायवे बांधणीचा वेग दिवसाला ३७ किमी झाला. १५० हून अधिक विमानतळे कार्यरत असून वंदे भारत सारख्या आधुनिक ट्रेन धावत आहेत.

यूपीए सरकारची दुरावस्था

नॅशनल हायवे बांधणीचा वेग दिवसाला १२ किमी होता. विमानतळांची संख्या केवळ ७४ होती.

पर्यटन आणि वैचारिक समृद्धी

एनडीए सरकारचे विकासपर्व

अयोध्या राम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडोर यामुळे धार्मिक पर्यटनात ऐतिहासिक वाढ. स्टॅच्यू ऑफ युनिटी हे जागतिक केंद्र बनले.

यूपीए सरकारची दुरावस्था

धार्मिक स्थळांकडे आणि सांस्कृतिक वारशाकडे पायाभूत सुविधांच्या दृष्टीने दुर्लक्ष होते.

वैचारिक आणि शैक्षणिक समृद्धी

एनडीए सरकारचे विकासपर्व

नवीन शिक्षण धोरण लागू. भारत आज मोबाईल निर्मिती आणि संरक्षण साहित्याचा मोठा निर्यातदार बनला आहे.

यूपीए सरकारची दुरावस्था

३४ वर्षांपासून जुने शैक्षणिक धोरण होते. भारत प्रामुख्याने संरक्षण साहित्याचा मोठा आयातदार होता.

अपारंपरिक ऊर्जा

एनडीए सरकारचे विकासपर्व

सौर उर्जेत भारत जगात ३ ऱ्या क्रमांकावर. (पीएम) सूर्यघर योजनेतून १ कोटी घरांना ३०० युनिट मोफत वीज. (पीएम) कुसुम द्वारे २० लाखांपेक्षा जास्त लाख शेतकरी जोडले.

यूपीए सरकारची दुरावस्था

सौर ऊर्जा क्षमता नगण्य होती. शेतकरी विजेसाठी पूर्णपणे वीज वितरण कंपन्यांवर अवलंबून होते.

अणुऊर्जा

एनडीए सरकारचे विकासपर्व

अणुऊर्जा क्षमता तिपटीने वाढवण्याचे लक्ष्य. काक्रापार (७०० MW) ही पहिली पूर्णपणे स्वदेशी बनावटीची अणुभट्टी कार्यान्वित.

यूपीए सरकारची दुरावस्था

अणुऊर्जा प्रकल्पांची गती संथ होती. तांत्रिक बाबींसाठी परकीय देशांवर मोठे अवलंबित्व होते.

एकत्रित ऊर्जा स्वावलंबन

एनडीए सरकारचे विकासपर्व

३१ मार्च २०२६ च्या अंतिम अहवालानुसार, देशाची एकूण स्थापित बिगर-जीवाश्म (Non-Fossil) क्षमता ऐतिहासिक २८३.४६ GW पार.

यूपीए सरकारची दुरावस्था

पारंपारिक धोरणांमुळे परकीय इंधन आयातीवर आणि ग्रीडच्या विजेवर मोठे अवलंबित्व.

डिजिटल पायाभूत सुविधा

एनडीए सरकारचे विकासपर्व

१२ मार्च २०२६ च्या संसदेतील लेखी उत्तराम्यानुसार, देशात ५.२३ लाख ५जी बेस स्टेशन्सचे यशस्वी रोलआउट; देशातील ९९.९% जिल्हे ५जी नेटवर्कने कव्हर.

यूपीए सरकारची दुरावस्था

कागदी कारभार आणि संथ इंटरनेटमुळे सरकारी सेवांमध्ये वेळ व पारदर्शकतेचा अभाव.



सनातन भारत

अध्यात्माचा आधार, परंपरेचा अभिमान: आधुनिकतेशी जोडलेली संस्कृती राम मंदिर ते सेंगोल; 'सनातन भारत'च्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचा अध्याय

'समृद्ध भारत' या प्रवासात आपण पाहिले की, देशाने आर्थिक आणि आरोग्य क्षेत्रात कशी क्रांती केली आहे. पण भारताची खरी ओळख ही इथली हजारो वर्षांची 'सनातन संस्कृती' आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'विकासासोबत वारसा' (विकास भी... विरासत भी...) हा जो विचार दिला, त्याने भारतीयांच्या मनात आपल्या संस्कृतीबद्दल एक नवा स्वाभिमान जागा केला आहे. आजचा भारत केवळ आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारत नाही, तर तो आपल्या प्राचीन मुळांकडे मोठ्या अभिमानाने परतत आहे.

या सांस्कृतिक क्रांतीचे सर्वात मोठे प्रतीक म्हणजे अयोध्या येथील भव्य राम मंदिर. पाच शतकांच्या प्रतीक्षेनंतर जेव्हा प्रभू रामलल्ला आपल्या मंदिरात विराजमान झाले, तेव्हा ती केवळ एका वास्तूची उभारणी नव्हती, तर तो भारताच्या सांस्कृतिक आत्म्याचा विजय होता. अशाच प्रकारे काशी विश्वनाथ धाम आणि महाकाल कॉरिडोर मुळे आपली प्राचीन तीर्थक्षेत्रे केवळ सुंदरच झाली नाहीत, तर तिथली स्थानिक अर्थव्यवस्था आणि पर्यटनालाही मोठी चालना मिळाली आहे. त्याहून अधिक म्हणजे अखंड भारताला आणि भारतीयांना भाजपाने "मंदिर वही बनायेंगे" असे वचन दिले ते पूर्ण केले.

केवळ मंदिरेच नव्हे, तर भारताच्या लोकशाही परंपरेला अध्यात्माची जोड देणारे 'सेंगोल' जेव्हा नवीन संसदेत स्थापित झाले, तेव्हा भारताने जगाला सांगितले की आपली लोकशाही ही पाश्चात्य आयात नसून ती आपल्या 'सनातन' मूल्यांवर आधारित आहे. 'भगवद्गीता' हा केवळ ग्रंथ न राहता, तो जीवनाचा मार्गदर्शक म्हणून जागतिक स्तरावर स्वीकारला जात आहे. तसेच नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) सारख्या कायद्यांतून भारताने आपल्या संस्कृतीचा भाग असलेल्या पीडित बांधवांना सुरक्षित आश्रय देऊन आपल्या माणुसकीच्या धर्माचे रक्षण केले आहे. हा 'सनातन भारत' आधुनिक आहे, पण तो आपल्या मुळांशी घट्ट जोडलेला आहे.

भाजपा
महाराष्ट्र



अयोध्या राम मंदिर

प्रारंभ दिनांक-२२ जानेवारी २०२४

शतकांपासून कोट्यवधी भारतीयांच्या हृदयात असलेल्या श्रद्धेचे मूर्त रूप म्हणजे अयोध्या येथील प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर, ज्याने देशात एक नव्या सांस्कृतिक पर्वाची सुरुवात केली आहे. ५०० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर साकारलेले हे मंदिर केवळ भक्तीचे प्रतीक नसून, प्रगत आणि एकसंध भारताच्या पुनरुत्थानाचे केंद्र बनले आहे. या ऐतिहासिक कार्यामुळे भारताची आध्यात्मिक शक्ती आणि गौरवशाली वारसा आज संपूर्ण जगाला थक्क करत आहे.

- **ऐतिहासिक प्राणप्रतिष्ठा :**
  २२ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या सोहळ्याने ५०० वर्षांचे स्वप्न पूर्ण करून भारताच्या सांस्कृतिक एकतेचे आणि अजेय इच्छाशक्तीचे दर्शन संपूर्ण जगाला घडवले आहे.

- **आर्थिक आणि पर्यटन क्रांती :**
  राम मंदिरामुळे अयोध्येचा जागतिक स्तरावर कायापालट झाला असून, पर्यटनातील वाढीमुळे स्थानिक व्यापार, हॉटेल आणि वाहतूक क्षेत्रात रोजगाराच्या लाखो संधी निर्माण झाल्या आहेत.

- **स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना :**
  आधुनिक तंत्रज्ञान आणि प्राचीन भारतीय स्थापत्यशास्त्राचा मिलाफ असलेल्या या वास्तूने भारताच्या कलात्मक वारशाची मान जगभरात उंचावली असून, ते एक मोठे सांस्कृतिक केंद्र बनले आहे.

- **सामाजिक समरसता आणि एकता :**
  राम मंदिराच्या उभारणीने जाती-पातींच्या पलीकडे जाऊन संपूर्ण देशाला एका सूत्रात गुंफले असून, 'रामराज्य' संकल्पनेतून विकासाची आणि न्यायाची नवीन दिशा अधोरेखित केली आहे.





"आपले रामलल्ला आता तंबूत राहणार नाहीत, तर या दिव्य मंदिरात विराजमान होतील. २२ जानेवारी २०२४ चा हा ऐतिहासिक क्षण एका नवीन कालचक्राची सुरुवात आहे. राम हा विवाद नाही, तर तो समाधान आहे. राम मंदिर हे राष्ट्रीय चेतनेचे मंदिर आहे."



सोमनाथ स्वाभिमान पर्व

पर्व प्रारंभ ८ जानेवारी २०२६

सोमनाथ मंदिर हे भारताच्या अजेय आत्मबलाचे आणि सांस्कृतिक पुनरुत्थानाचे अजरामर प्रतीक आहे. इतिहासातील अनेक आक्रमणे सोसूनही हे मंदिर दरवेळी अधिक भव्यतेने उभे राहिले. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनाखाली होत असलेले या क्षेत्राचे नवनिर्माण, भारताच्या चिरंतन श्रद्धेचा आणि अढळ अस्मितेचा जागतिक स्तरावर झालेला गौरवशाली विजय आहे. या पवित्र स्थानामुळे भारताची आध्यात्मिक शक्ती आणि स्वाभिमानी वारसा आज पुन्हा एकदा प्रज्वलित झाला आहे.



- **सोमनाथ स्वाभिमान पर्व :**
  १०२६ च्या पहिल्या आक्रमणाला १००० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' साजरे होत असून, हे आक्रमकांविरुद्ध लढणाऱ्या भारतीय शौर्याचे स्मरण आहे.

- **सोमनाथ अमृत महोत्सव :**
  स्वातंत्र्यानंतर साकारलेल्या मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याने 'सोमनाथ अमृत महोत्सव' साजरा केला जात असून, हे स्थळ 'अमृत काळातील' मुख्य प्रेरणास्थान बनले आहे.

- **आधुनिक पायाभूत सुविधा :**
  पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली सोमनाथमध्ये जागतिक दर्जाचे रस्ते, रेल्वे आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, ज्यामुळे भाविकांना दर्शन घेणे अधिक सुलभ आणि सुरक्षित झाले आहे.

- **सामाजिक परिवर्तनाचे केंद्र :**
  श्री सोमनाथ ट्रस्टच्या माध्यमातून केवळ धार्मिकच नव्हे, तर कौशल्य विकास आणि जनकल्याणाचे उपक्रम राबवून या परिसराचा एक आदर्श सामाजिक केंद्र म्हणून विकास केला जात आहे.



"सोमनाथचा इतिहास कधीही विनाश किंवा पराभवाचा राहिला नाही, तर तो आपल्या पूर्वजांच्या शौर्याचा, विजयाचा आणि पुनरुत्थानाचा इतिहास आहे. हजारो वर्षांच्या आक्रमणांनंतरही ना सोमनाथ मिटला, ना भारत झुकला; कारण भारताचे अस्तित्व आणि आपला अभिमान आपल्या याच शाश्वत आस्थेमध्ये सामावलेला आहे ."

काशी विश्वनाथ धाम

प्रारंभ दिनांक : १३ डिसेंबर २०२१

आपल्या प्राचीन आणि ऐतिहासिक धार्मिक स्थळांना आधुनिक सोयी-सुविधांची जोड देऊन त्यांचा मूळ वैभवशाली वारसा पुन्हा जिवंत करण्याचा हा यशस्वी प्रयत्न आहे. वाराणसी येथील काशी विश्वनाथ कॉरिडॉरमुळे या प्राचीन शहराला नवे रूप मिळाले असून, गंगेचा घाट थेट मंदिराशी जोडला गेला आहे. यामुळे भाविकांचा प्रवास सुलभ होऊन भारतीय संस्कृती आणि अध्यात्माचा एक नवा व प्रगत अध्याय जागतिक स्तरावर अभिमानाने सुरू झाला आहे.

- **वाराणसीचा कायापालट :**
  प्राचीन परिसराला आधुनिक सुविधांची जोड देऊन भाविकांसाठी सुसज्ज करण्यात आले असून, अरुंद गल्ल्यांच्या जागी आता भव्य, स्वच्छ आणि प्रशस्त परिसर निर्माण झाला आहे.

- **गंगा ते मंदिर थेट मार्ग :**
  'गंगा ते बाबा विश्वनाथ' असा थेट मार्ग तयार केल्यामुळे भाविकांना पवित्र गंगेचे जल थेट मंदिरापर्यंत नेणे सुलभ झाले असून, येथे वास्तुकलेचा अद्वितीय संगम दिसतो.

- **सांस्कृतिक आणि पर्यटन वाढ :**
  या प्रकल्पामुळे वाराणसीतील पर्यटनात विक्रमी वाढ झाली आहे, परिणामी स्थानिक व्यापार तेजीत आला असून जागतिक स्तरावर भारतीय संस्कृतीची प्रतिमा अधिक उजळली आहे.

- **आध्यात्मिक आणि डिजिटल सुविधा :**
  मंदिर परिसरात भाविकांसाठी आधुनिक माहिती केंद्रे, ध्यान केंद्रे आणि डिजिटल सुविधा उपलब्ध केल्या आहेत, ज्यामुळे तरुण पिढीलाही प्राचीन संस्कृतीशी जोडणे अधिक सोपे झाले आहे.














"काशी विश्वनाथ धामचा हा भव्य परिसर केवळ एक इमारत नाही, तर तो भारताच्या सनातन संस्कृतीचे आणि आध्यात्मिक आत्म्याचे प्रतीक आहे. येथे प्राचीनता आणि नवीनता एकत्र जीवंत होत असून, आपल्या भूतकाळातील गौरवाची जाणीव करून देत आहेत."











श्री महाकाल लोक

प्रारंभ: ९ ऑक्टोबर २०२२

आपला ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा जपतानाच, तिथे येणाऱ्या भाविकांना सर्व आधुनिक सुविधा मिळाव्यात यासाठी उचललेले हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. उज्जैनमधील महाकाल कॉरिडॉरमुळे या शहराला भव्य स्वरूप प्राप्त झाले असून, येथे पौराणिक कथा सुंदर शिल्पकलेच्या माध्यमातून साकारल्या आहेत. यामुळे धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळाली असून, विज्ञान आणि परंपरेचा सुरेख संगम या भव्य प्रकल्पाच्या निमित्ताने संपूर्ण जगाला पाहायला मिळत आहे.



- **महाकाल लोकचा कायापालट :**
  उज्जैनमधील मंदिर परिसराचे रूपांतर एका भव्य 'महाकाल लोक'मध्ये करण्यात आले आहे, जिथे प्राचीन पौराणिक कथा आधुनिक शिल्पकलेच्या माध्यमातून जिवंत झाल्या आहेत.

- **प्रशस्त आणि कलात्मक परिसर :**
  ९०० मीटर लांबीच्या या कॉरिडॉरमध्ये शिवपुराणातील प्रसंगांवर आधारित १०८ स्तंभ आणि विशेष भित्तीचित्रे उभारली असून, हे विज्ञानाचे आणि कलेचे उत्तम उदाहरण आहे.

- **सांस्कृतिक आणि आर्थिक प्रभाव :**
  या प्रकल्पामुळे उज्जैन जागतिक धार्मिक पर्यटनाचे केंद्र बनले आहे, ज्यामुळे भाविकांची सोय होण्यासोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेला आणि व्यापाराला मोठी गती मिळाली आहे.

- **आधुनिक सुविधा आणि लेझर शो :**
  पर्यटकांसाठी अत्याधुनिक माहिती केंद्रे आणि संध्याकाळी होणाऱ्या भव्य लेझर शोमुळे तरुण पिढीला भारतीय संस्कृतीची माहिती अधिक रंजक पद्धतीने मिळत आहे.



"स्वातंत्र्याच्या या अमृतकाळात आपण गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होत आहोत. भारत आपल्या गमावलेल्या वैभवाचा जीर्णोद्धार करून त्याची पुनर्स्थापना करत आहे. महाकाल लोक हे आपल्या प्राचीन गौरवशाली अतीतासह उज्ज्वल भविष्याचे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे."

सेंगोल - राजदंड

प्रारंभ दिनांक- २८ मे २०२३

भारताच्या सर्वोच्च लोकशाही मंदिरामध्ये प्राचीन परंपरेचे आणि न्यायाचे प्रतीक असलेल्या राजदंडाची स्थापना करून देशाच्या ऐतिहासिक वारशाचा गौरव करण्यात आला आहे. हे केवळ सत्तेच्या हस्तांतरणाचे साधन नसून, राष्ट्रकारभारात कर्तव्य, निष्पक्षता आणि नैतिकतेचे स्मरण करून देणारे पवित्र प्रतीक आहे. चोल साम्राज्यापासून चालत आलेली ही सुवर्ण परंपरा नव्या संसदेत प्रस्थापित करून भारताने आपल्या सांस्कृतिक अस्मितेची पुनर्रचना केली आहे.

- **लोकशाहीचा ऐतिहासिक वारसा :**
  नवीन संसदेत स्थापित 'सेंगोल' हा प्राचीन चोल साम्राज्यातील न्याय आणि नीतीचे प्रतीक असून, तो भारताच्या समृद्ध शासन परंपरेची साक्ष देतो.

- **सांस्कृतिक आणि आधुनिक मेळ :**
  सेंगोलची स्थापना ही आधुनिक लोकशाहीला हजारो वर्षांच्या प्राचीन संस्कृतीशी जोडणारा एक महत्त्वाचा दुवा ठरली असून, यामुळे संसदेची प्रतिष्ठा वाढली आहे.

- **तमिळ संस्कृतीचा गौरव :**
  दक्षिण भारताची महान परंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांना दिल्लीच्या सत्तास्थानी मानाचे स्थान देऊन, भारताच्या विविधतेचा आणि एकात्मतेचा खऱ्या अर्थाने सन्मान केला गेला आहे.

- **न्याय आणि धर्माचे प्रतीक :**
  सेंगोल केवळ एक दंड नसून, तो राज्यकर्त्यांना त्यांच्या कर्तव्याची आणि जनकल्याणाची आठवण करून देणारा एक आध्यात्मिक आधार म्हणून संसदेत स्थापित करण्यात आला आहे.






"महान चोल साम्राज्यात 'सेंगोल' हा कर्तव्य, सेवा आणि राष्ट्र उभारणीच्या मार्गाचे प्रतीक मानला गेला होता. हे आपल्या भूतकाळाला भविष्याशी जोडणाऱ्या एका महान वारशाचे प्रतीक आहे. संसदेच्या सभागृहाची कार्यवाही सुरू होताना हा पवित्र सेंगोल आपल्याला निरंतर लोकशाहीच्या मूल्यांची प्रेरणा देत राहील."

नागरिकत्व सुधारणा कायदा

प्रारंभ दिनांक- १० जानेवारी २०२०

भारताच्या मूळ सांस्कृतिक आणि मानवतावादी कर्तव्याचे पालन करत, शेजारील देशांमध्ये अन्यायाचा सामना करणाऱ्या तिथल्या अल्पसंख्यांक बांधवांना हक्काचे घर देणारा हा ऐतिहासिक निर्णय आहे. धार्मिक छळामुळे विस्थापित झालेल्या निर्वासितांना कायदेशीर संरक्षण देऊन सन्मानाचे जीवन देण्याची ही भारताची वचनबद्धता आहे. या कायद्यामुळे अनेक वर्षांपासून असुरक्षिततेत जगणाऱ्या हजारो कुटुंबांना आता भारतीय नागरिकत्वाचा हक्क मिळून त्यांच्या सुरक्षित भविष्याचा पाया रचला गेला आहे.



- **सांस्कृतिक आणि सनातन कर्तव्य :**
  शेजारील देशांतील पीडित हिंदू, शीख, बौद्ध आणि इतर अल्पसंख्याकांना नागरिकत्व देऊन भारताने आपले ऐतिहासिक आणि नैतिक कर्तव्य खऱ्या अर्थाने पूर्ण केले आहे.

- **सुरक्षितता आणि सन्मान :**
  या कायद्यामुळे हजारो कुटुंबांना भारतात भेदभावाशिवाय सन्मानाने आणि सुरक्षितपणे जगण्याची अधिकृत संधी मिळाली असून, त्यांच्या आयुष्यात एक नवीन पहाट आली आहे.

- **मानवतावादी ऐतिहासिक निर्णय :**
  पिढ्यानपिढ्या आश्रयासाठी आणि मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या बांधवांना स्वतःच्या हक्काचे घर मिळवून देणारा हा एक अत्यंत धाडसी आणि मानवतावादी निर्णय ठरला आहे.

- **स्थैर्य आणि सामाजिक मुख्यप्रवाह :**
  नागरिकत्वामुळे या बांधवांना आता सरकारी योजनांचा लाभ, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळतील, ज्यामुळे ते देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने सहभागी होऊ शकतील.



"नागरिकत्व सुधारणा कायदा हा शेजारील देशांमध्ये धार्मिक छळाला बळी पडलेल्या आणि भारतात आश्रय घेतलेल्या निर्वासितांना सन्मान देण्याचा कायदा आहे. आम्ही फाळणीच्या काळात अत्याचार सहन केलेल्या आमच्या बांधवांना भारताचे नागरिकत्व देऊन त्यांचे हक्क आणि भविष्य सुरक्षित करत आहोत."

स्व-संस्कृतीचा ध्यास

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' १२ मार्च २०२१...'

आधुनिकतेची कास धरतानाच आपली ज्ञानपरंपरा जपणे आणि तिचा जगाच्या कल्याणासाठी प्रसार करणे हा या विचारसरणीचा मुख्य गाभा आहे. 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या अभियानातून देशाने आपल्या गौरवशाली इतिहासाचे आणि क्रांतीकारकांच्या बलिदानाचे स्मरण केले. हा महोत्सव केवळ भूतकाळाचा आदर करणारा नसून, तरुणांमध्ये स्व-भाषेचा अभिमान, सांस्कृतिक वारसा आणि देशाबद्दलची एकात्मता जागवून आत्मनिर्भर भारताची नवी पहाट घडवणारा ठरला आहे.

- **वैश्विक मार्गदर्शक ग्रंथ :**
  भगवद्गीता ही केवळ धार्मिक ग्रंथ नसून, आधुनिक व्यवस्थापन आणि जीवनातील संघर्षावर तोडगा देणारा जागतिक मार्गदर्शक ग्रंथ म्हणून जगभरात प्रस्थापित होत आहे.

- **भारतीय ज्ञान परंपरा :**
  नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेचा समावेश करून नव्या पिढीला आपल्या वैभवशाली इतिहासाची, विज्ञानाची आणि प्राचीन मूल्यांची अधिकृत ओळख करून दिली जात आहे.

- **योग आणि जागतिक कल्याण :**
  'आंतरराष्ट्रीय योग दिन'च्या माध्यमातून भारताने आपल्या प्राचीन योगविद्येचा वारसा संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी देऊन 'वसुधैव कुटुंबकम'ची भावना खऱ्या अर्थाने सिद्ध केली आहे.

- **सांस्कृतिक पुनर्जागरण :**
  भारतीय सण, परंपरा आणि अध्यात्मिक मूल्यांचे जागतिक स्तरावर संवर्धन केल्यामुळे भारताची 'सॉफ्ट पॉवर' वाढली असून तरुणांमध्ये आपल्या संस्कृतीबद्दल सार्थ अभिमान निर्माण झाला आहे.



"देशाला जर प्रगती करायची असेल, तर त्याला आपल्या समृद्ध वारशाचा सार्थ अभिमान असलाच पाहिजे. वारशाचा अभिमान बाळगण्यासोबतच गुलामगिरीच्या मानसिकतेतून पूर्ण मुक्ती मिळवणे अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा आपली स्वतःची सांस्कृतिक ओळख परत येते, तेव्हाच राष्ट्राचा गमावलेला आत्मविश्वास पुन्हा जागा होतो."























भगवान बौद्ध सर्किट विकास

प्रारंभ दिनांक - १ जानेवारी २०१५

भगवान बुद्धांच्या शांती आणि करुणेच्या विचारांची जन्मदात्री असलेल्या भारताला, जागतिक बौद्ध अनुयायांसाठी श्रद्धेचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. 'स्वदेश दर्शन' आणि 'प्रसाद' योजनांद्वारे बोधगया, सारनाथ, कुशीनगर आणि महाराष्ट्रातील अजिंठा-वेरूळ यांसारख्या पवित्र ऐतिहासिक स्थळांना 'बौद्ध सर्किट'मध्ये जोडण्यात आले आहे. आधुनिक पायाभूत सुविधांमुळे या धार्मिक वारशाचा कायापालट झाला असून, जागतिक पर्यटनाला आणि भारताच्या सांस्कृतिक वैभवाला मोठी चालना मिळाली आहे.

- **आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी :**
  कुशीनगर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारून आणि बोधगया, सारनाथ, लुंबिनी या स्थळांना आधुनिक रेल्वे-रस्त्यांच्या जाळ्याने जोडून जगभरातील अनुयायांसाठी थेट प्रवासाची सोय केली आहे.

- **जागतिक दर्जाच्या सुविधा :**
  सांची स्तूप ते अजिंठा-वेरूळपर्यंतच्या परिसराचे सौंदर्यीकरण करून तिथे आधुनिक ध्यान केंद्रे, संग्रहालये आणि डिजिटल गाईड्स उपलब्ध केले आहेत, ज्यामुळे पर्यटनाला जागतिक दर्जा प्राप्त झाला आहे.

- **सांस्कृतिक मुत्सद्देगिरी :**
  भगवान बौद्ध सर्किटच्या माध्यमातून भारताने जगाला शांतीचा संदेश देत आशियाई देशांशी सांस्कृतिक संबंध दृढ केले आहेत, ज्यामुळे भारताची जागतिक प्रतिमा अधिक उजळली आहे.

- **स्थानिक रोजगार आणि समृद्धी :**
  पर्यटन वाढल्यामुळे भगवान बौद्ध सर्किटमधील गावांमधे हॉटेल, गाईड्स आणि हस्तकला उद्योगांना मोठी बाजारपेठ मिळाली असून, दुर्गम भागातील स्थानिकांचे आर्थिक जीवनमान उंचावले आहे.



"आज देशभरात 'बौद्ध सर्किट' विकसित केले जात आहे जेणेकरून जगातील बौद्ध यात्रेकरूंना श्रद्धा आणि आध्यात्मिकतेचा अखंड अनुभव घेता येईल. भगवान बुद्धांचा शांततेचा संदेश आजच्या २१ व्या शतकात जगातील विविध देशांना आणि विचारसरणींना एकत्र जोडणारा एक भक्कम पूल ठरत आहे."

विकासाचे प्रगतीपुस्तक

धर्माभिमानी भारताची तपपूर्ती

राम मंदिर, अयोध्या

एनडीए सरकारचे विकासपर्व

भव्य राम मंदिर निर्माण पूर्ण; दररोज लाखो भाविकांचे दर्शन सुलभ.

यूपीए सरकारची दुरावस्था

  बंदरांच्या जवळ विशेष आर्थिक क्षेत्र आणि औद्योगिक क्लस्टर्स विकसित करून निर्यातक्षम उत्पादनाला आणि रोजगाराला मोठी चालना दिली जात आहे.
- **किनारपट्टी विकास :**
  कोस्टल कम्युनिटी डेव्हलपमेंटच्या माध्यमातून मच्छिमार बांधवांचे सक्षमीकरण आणि सागरी पर्यटनाला चालना देऊन किनारपट्टीवरील लोकांचे जीवनमान उंचावले जात आहे.



"भारत सरकार 'बंदरांच्या नेतृत्वाखालील विकास' या संकल्पनेवर काम करत आहे. सागरमाला प्रकल्पाच्या माध्यमातून बंदरांचे आधुनिकीकरण आणि त्यांची कनेक्टिव्हिटी वाढवणे हा आपल्या देशाच्या सागरी सामर्थ्याला बळ देणारा एक महत्त्वाचा भाग आहे."

१२ नवीन औद्योगिक स्मार्ट शहरे

'मेक इन इंडिया'ला गती देण्यासाठी देशाच्या विविध भागांत आधुनिक औद्योगिक शहरांचे जाळे विणले जात आहे. नुकत्याच मंजूर झालेल्या १२ नवीन शहरांचा पायाभूत विकास केला जात असून, या शहरांमुळे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि रोजगार वाढेल. ही शहरे जागतिक दर्जाच्या सुविधांनी सज्ज असतील आणि भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्यासाठी आणि आर्थिक प्रगतीला वेग देण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतील.

- **स्मार्ट औद्योगिक पायाभूत सुविधा :**
  प्लग-अँड-प्ले कारखाने, अखंडित वीज-पाणी आणि प्रगत दळणवळणामुळे उद्योजकांना अतिशय कमी वेळात उत्पादन करणे सोपे होणार.
- **गुंतवणूक आणि व्यवसाय वृद्धी :**
  १२ नवीन औद्योगिक शहरांच्या निर्मितीमुळे स्वदेशी व विदेशी गुंतवणूकदारांसाठी सुरक्षित वातावरण तयार होऊन अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार.
- **स्थानिक रोजगार निर्मिती :**
  सूक्ष्म, लघू आणि मोठ्या उद्योगांना बळ देत स्थानिक तरुणांसाठी त्यांच्याच भागात लाखो नवीन आणि शाश्वत रोजगारांच्या संधी निर्माण होणार.
- **लॉजिस्टिक्स आणि कनेक्टिव्हिटी :**
  नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉरमुळे देशातील प्रमुख बंदरे आणि विमानतळांपर्यंत वेगवान वाहतूक होणार, ज्यामुळे देशाची निर्यात क्षमता कमालीची वाढणार.





"ही १२ नवीन औद्योगिक शहरे केवळ कारखाने उभारण्यासाठी नसून, ती प्रगत पायाभूत सुविधांनी सज्ज असलेले 'प्लग-अँड-प्ले' इकोसिस्टम आहेत; जे 'मेक इन इंडिया' आणि तरुणांच्या रोजगाराला नवी गती देतील."

१० ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था

भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनवण्यासाठी हे एक महत्त्वाकांक्षी आर्थिक लक्ष्य आहे. २०३५ पर्यंत भारताला १० ट्रिलियन डॉलरच्या आर्थिक टप्प्यावर नेण्याचे ध्येय असून, यामुळे भारताचे जागतिक बाजारपेठेतील स्थान अधिक भक्कम होईल. हे ध्येय साध्य करण्यासाठी पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि मानवी संसाधनांमध्ये मोठी गुंतवणूक केली जात आहे, ज्यामुळे प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावेल आणि देश प्रगतीच्या एका नव्या उंचीवर पोहोचेल.



- **तिसरी मोठी अर्थव्यवस्था :**
  हे उद्दिष्ट गाठल्यामुळे भारत जपान आणि जर्मनीला मागे टाकून अमेरिका आणि चीननंतर जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता म्हणून प्रस्थापित होईल, ज्यामुळे भारताचा जागतिक दबदबा वाढेल.
- **पायाभूत सुविधांचा विकास :**
  १० ट्रिलियन डॉलरच्या प्रवासात रस्ते, रेल्वे, बंदरे आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीमध्ये होणारी प्रचंड गुंतवणूक देशाच्या कानाकोपऱ्यात नवीन औद्योगिक संधी आणि समृद्धी घेऊन येईल, ज्यामुळे व्यवसायांना मोठी गती मिळेल.
- **उत्पादन आणि निर्यातीला चालना :**
  'मेक इन इंडिया' सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून भारत जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनेल, ज्यामुळे स्थानिक उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळेल आणि परकीय चलन साठ्यात मोठी वाढ होऊन अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.
- **सर्वसमावेशक प्रगती :**
  या आर्थिक वाढीचा थेट फायदा सामान्य जनतेला होईल; वाढते दरडोई उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील सुधारणा आणि रोजगाराच्या कोट्यवधी संधींमुळे गरिबी निर्मूलनास मोठी मदत होऊन सामाजिक स्थैर्य प्राप्त होईल.

"भारत पुढील १० वर्षांत १० ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनेल," असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. "भारत लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल."



नेट झिरो २०७०

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि ग्लोबल वॉर्मिंगवर मात करण्यासाठी भारत अक्षय ऊर्जेकडे वेगाने वळत आहे. कार्बन उत्सर्जन शून्यावर नेण्यासाठी 'नेट झिरो २०७०' या दीर्घकालीन प्रकल्पावर प्रभावी काम सुरू असून, निसर्ग आणि विकास यांचा समतोल राखणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. ही मोहीम भविष्यातील पिढ्यांना प्रदूषणमुक्त आणि सुरक्षित वातावरण देण्यास बांधील असून, भारताला शाश्वत विकासाच्या मार्गावर जागतिक स्तरावर एक आदर्श देश म्हणून प्रस्थापित करेल.

- **अक्षय ऊर्जेवर भर :**
  सौर, पवन आणि हरित हायड्रोजनचा वापर वाढवून जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे.
- **नेट झिरो २०७० लक्ष्य :**
  कार्बन उत्सर्जन आणि शोषण यात समतोल साधून, २०७० पर्यंत भारताला पूर्णपणे कार्बन न्यूट्रल बनवण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय.
- **इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन :**
  देशात ईव्ही इकोसिस्टम वेगाने विकसित करून रस्ते वाहतुकीतील प्रदूषण कमी करणे आणि हवेची गुणवत्ता सुधारणे.
- **वनीकरण आणि जैवविविधता :**
  मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करून निसर्ग आणि आधुनिक विकास यांचा योग्य ताळमेळ राखणे.





"भारत २०७० पर्यंत 'नेट झिरो' उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्यासाठी कटिबद्ध आहे. आमचे ध्येय 'विरासत आणि विकास' या दोन्ही संकल्पनांना एकत्र घेऊन निसर्ग आणि प्रगतीचा समतोल राखणे हेच आहे."

6जी नेटवर्क लाँच

भविष्यातील डिजिटल गरजा पूर्ण करण्यासाठी भारत आता प्रगत इंटरनेट तंत्रज्ञानावर संशोधन करत आहे. २०३० पर्यंत देशात हाय-स्पीड 6G तंत्रज्ञान सुरू करण्याचे नियोजन असून, यामुळे दळणवळण आणि डेटा ट्रान्सफरची गती अनेक पटींनी वाढेल. हे तंत्रज्ञान भारताच्या डिजिटल क्रांतीला एका नव्या उंचीवर नेईल, ज्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि उद्योग क्षेत्रात अभुलाग्र बदल घडून येतील आणि जागतिक स्तरावर भारत तंत्रज्ञान क्षेत्रात आपले वर्चस्व अधिक भक्कमपणे सिद्ध करेल.



- **अतिवेगवान कनेक्टिव्हिटी :**
  6G तंत्रज्ञानामुळे इंटरनेटचा वेग 5G पेक्षा १०० पटीने जास्त असेल, ज्यामुळे मोठा डेटा आणि चित्रपट अवघ्या काही सेकंदात डाउनलोड करणे शक्य होऊन मानवी जीवन अधिक सुसह्य होईल.
- **प्रगत तांत्रिक क्रांती :**
  हे तंत्रज्ञान केवळ फोनपुरते मर्यादित न राहता होलोग्राफिक कम्युनिकेशन, स्मार्ट शहरे आणि स्वयंचलित वाहनांच्या अचूक संचालनासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल, जे विज्ञानातील एक मोठे यश असेल.
- **आत्मनिर्भर भारत आणि पेटंट :**
  6G च्या संशोधनात भारताचा सक्रिय सहभाग असल्यामुळे जागतिक स्तरावर भारतीय पेटंट्सची संख्या वाढेल आणि टेलिकॉम क्षेत्रात परदेशी उपकरणांवरील अवलंबित्व पूर्णपणे कमी होऊन देश स्वावलंबी बनेल.
- **आरोग्य आणि शिक्षण क्षेत्राचा कायापालट :**
  या तंत्रज्ञानामुळे दुर्गम भागांतही टेलि-सर्जरी आणि व्हर्चुअल क्लासरूम्स उच्च दर्जाचे शिक्षण आणि आरोग्य सुविधा पोहोचवणे अधिक सुलभ आणि प्रभावी होईल, ज्याचा फायदा शेवटच्या घटकाला मिळेल.



आम्ही २०३० पर्यंत देशात 6जी सेवा अधिकृतपणे सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी 'भारत 6जी अलायन्स' वेगाने काम करत आहे 6जी च्या युगात भारत केवळ तंत्रज्ञानाचा वापरकर्ता न राहता, जागतिक स्तरावर त्याचे नियम आणि मानके ठरवणारा मुख्य देश बनेल."

खावडा हायब्रीड रिन्युएबल एनर्जी पार्क

अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात भारत जगाचे नेतृत्व करत असून गुजरातमध्ये जगातील सर्वात मोठा महाप्रकल्प उभा राहत आहे. या सौर-पवन ऊर्जा पार्कचे पूर्ण क्षमतेने उद्घाटन करण्याचे मुख्य उद्दिष्ट असून, यामुळे भारताची ऊर्जा सुरक्षा भविष्यात अधिक मजबूत होईल. हा प्रकल्प पर्यावरणाचे रक्षण करण्यासोबतच देशाला स्वच्छ ऊर्जेमध्ये आत्मनिर्भर बनवेल. या ऐतिहासिक पावलामुळे भारताची जागतिक स्तरावर एक हरित ऊर्जा महासत्ता म्हणून नवी ओळख निर्माण होण्यास मदत होईल.

- **जगातील सर्वात मोठा पार्क :**
  गुजरातच्या कच्छमध्ये उभारला जाणारा हा हायब्रीड अक्षय ऊर्जा पार्क ३०,००० मेगावॅट वीज निर्मिती करण्याची क्षमता ठेवतो, जो जागतिक स्तरावर एक विक्रम ठरेल.

- **सौर आणि पवन ऊर्जेचा संगम :**
  एकाच ठिकाणी सौर पॅनेल आणि विंड टर्बाइन्सचा वापर केल्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा कमाल उपयोग होईल आणि वीज पुरवठ्यात कमालीचे सातत्य आणि स्थिरता प्राप्त होईल.

- **कार्बन उत्सर्जन कपात :**
  या विशाल प्रकल्पामुळे दरवर्षी लाखो टन कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल, जे भारताच्या 'नेट झिरो' उद्दिष्टाच्या दिशेने टाकलेले एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

- **आर्थिक आणि औद्योगिक प्रगती :**
  या परिसरातील गुंतवणुकीमुळे हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि स्थानिक उद्योगांना स्वस्त तसेच अखंडित वीज मिळाल्यामुळे राज्याच्या व देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल.





"गुजरातच्या कच्छमधील खावडा येथील हा हायब्रीड अक्षय ऊर्जा पार्क जगातील सर्वात मोठा हरित ऊर्जा प्रकल्प आहे जितका मोठा सिंगापूर देश आहे, तितक्या मोठ्या भूभागावर हा प्रकल्प पसरला असून तो २१ व्या शतकातील भारताच्या तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षमतेचे दर्शन घडवतो."

केन-बेतवा नदी जोडणी

जलव्यवस्थापन सुधारून दुष्काळ आणि पुराची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी हा देशातील पहिला मोठा नदी जोड प्रकल्प आहे. भारतातील या पहिल्या ऐतिहासिक प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्याचे ध्येय असून, यामुळे लाखो हेक्टर शेतीला हक्काचे पाणी मिळेल. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होईल. हा प्रकल्प निसर्ग आणि मानवी गरजांचा समतोल राखून जलसंधारणाच्या क्षेत्रात भारताला एका नव्या उंचीवर नक्कीच घेऊन जाईल.



- **दुष्काळ आणि पूर निवारण :**
  अतिरिक्त पाणी असलेल्या नदीतून पाणी टंचाई असलेल्या भागात पाणी वळवल्यामुळे एका भागातील पूर आणि दुसऱ्या भागातील भीषण दुष्काळ अशा दोन्ही समस्यांवर कायमस्वरूपी मात करता येईल.

- **कृषी क्षेत्राचा कायापालट :**
  या प्रकल्पामुळे लाखो हेक्टर कोरडवाहू जमीन ओलिताखाली येईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना वर्षातून दोन-तीन पिके घेणे शक्य होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक मोठी उभारी व मजबूती प्राप्त होईल.

- **जलसुरक्षा आणि समृद्धी :**
  पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटल्यामुळे महिलांचे कष्ट कमी होतील आणि औद्योगिक क्षेत्रालाही मुबलक पाणी मिळाल्यामुळे नवीन कारखाने आणि रोजगाराच्या संधी स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होण्यास मदत होईल.

- **पर्यावरणपूरक जलसंधारण :**
  आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नद्यांचे नैसर्गिक चक्र न बिघडवता जलसाठा वाढवला जात आहे, ज्यामुळे भूगर्भातील पाणी पातळी वाढेल आणि वन्यजीव व स्थानिक पर्यावरणाला देखील त्याचा मोठा सकारात्मक फायदा होईल.



"केन-बेतवा नदी जोड प्रकल्प केवळ पाण्याचा पायाभूत प्रकल्प नाही, तर तो बुंदेलखंडमधील कोट्यवधी बंधू-भगिनींचे जीवन बदलणारा भक्कम आधार आहे. या प्रकल्पामुळे दुष्काळी भूमीला हक्काचे पाणी मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी उभारी येईल."

झोजिला टनल

दुर्गम भागांना बाराही महिने कनेक्टिव्हिटी देण्यासाठी हा बोगदा अत्यंत महत्त्वाचा आहे. श्रीनगर आणि लेहला वर्षभर जोडणारा हा आशियातील सर्वात लांब द्वि-दिशा बोगदा असेल. हा प्रकल्प सामरिकदृष्ट्या देशाच्या सुरक्षेसाठी मैलाचा दगड ठरेल. यामुळे लडाखमधील नागरिकांचे जीवन सुसह्य होईल. प्रतिकूल हवामानातही दळणवळण सुरू राहिल्याने सीमावर्ती भागातील सैन्य हालचालींना वेग येईल. हा प्रकल्प भारताच्या अभियांत्रिकी कौशल्याचा उत्तम नमुना असून प्रादेशिक विकासाला यामुळे मोठी गती मिळणार आहे.

- **सामरिक महत्त्व :**
  आव्हानात्मक हवामानातही भारतीय सैन्याला सीमेवर रसद आणि अवजड सामग्रीची जलद वाहतूक करणे शक्य होईल.
- **बाराही महिने कनेक्टिव्हिटी :**
  हिवाळ्यातील बर्फवृष्टीमुळे लडाखचा तुटणारा संपर्क आता कायमचा जोडला जाईल, ज्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा खंडित होणार नाही.
- **प्रवासाच्या वेळेत बचत :**
  सध्या झोजिला खिंड ओलांडण्यासाठी लागणारे कित्येक तास आता केवळ १५-२० मिनिटांवर येतील, परिणामी पर्यटन आणि स्थानिक व्यापाराला मोठी चालना मिळेल.
- **आशियातील सर्वात लांब बोगदा :**
  सुमारे १४.१५ किमी लांबीचा हा आशियातील सर्वात लांब द्वि-दिशा (Bi-directional) बोगदा ठरेल, जो भारताच्या पायाभूत क्षमतेची नवी ओळख आहे.











"झोजिला बोगदा हा लडाखला देशाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणारा विश्वासाचा सेतू आहे. या बोगद्यामुळे दळणवळण बाराही महिने सुरू राहील आणि येथील पर्यटन व व्यापाराला अभूतपूर्व गती मिळेल."

प्रस्तावित ७ बुलेट ट्रेन मार्ग

पहिल्या बुलेट ट्रेननंतर देशात अशाच प्रकारच्या इतर सात हाय-स्पीड मार्गांचे मोठे जाळे विणले जाणार आहे. दिल्ली-वाराणसी आणि मुंबई-नागपूर यांसारख्या नवीन मार्गांचे काम सुरू करण्याचे नियोजन असून, यामुळे रेल्वे प्रवासाचा संपूर्ण चेहरामोहरा बदलेल. हे जाळे भारताला जगातील प्रगत राष्ट्रांच्या बरोबरीने उभे करेल. या प्रकल्पामुळे राज्याराज्यांतील अंतर कमी होईल आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि अत्यंत जलद प्रवासाचा एक वेगळा अनुभव मिळेल.

- **देशव्यापी कनेक्टिव्हिटी :**
  देशातील प्रमुख महानगरांना हाय-स्पीड रेल्वेने जोडण्याचे सरकारचे लक्ष्य असून, यामुळे दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि चेन्नई यांसारखी मोठी आर्थिक केंद्रे एकमेकांशी अत्यंत कमी वेळात जोडली जातील.
- **आर्थिक कॉरिडॉरचा विकास :**
  या सात नवीन मार्गांमुळे केवळ प्रवासाचा वेग वाढणार नाही, तर या मार्गांलगत नवीन शहरे आणि औद्योगिक वसाहती निर्माण होतील, ज्यामुळे प्रादेशिक अर्थव्यवस्थेला आणि उद्योगांना मोठी उभारी मिळेल.
- **आधुनिक रेल्वे तंत्रज्ञान :**
  जपान आणि इतर प्रगत देशांच्या सहकार्याने भारतात हे प्रकल्प राबवले जात असून, यामुळे भारतीय रेल्वेमध्ये सिग्नलिंग, ट्रॅक आणि डब्यांच्या रचनेत जागतिक दर्जाचे स्वदेशी तंत्रज्ञान विकसित होण्यास मदत होईल.
- **प्रचंड रोजगार निर्मिती :**
  या सात भव्य मार्गांच्या बांधकाम आणि देखभालीसाठी देशात लाखो नवीन तांत्रिक आणि बिगर-तांत्रिक नोकऱ्या निर्माण होतील, ज्यामुळे तरुणांना प्रगत क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध होऊन बेरोजगारी कमी होईल.



"देशातील प्रमुख शहरांना हाय-स्पीड रेल्वेने जोडणे, हे भारताच्या आधुनिक पायाभूत विकासाचे महत्त्वाचे पाऊल आहे."

वंदे भारत स्लीपर आणि वंदे मेट्रो

सर्वसामान्यांचा रेल्वे प्रवास अधिक आरामदायी आणि वेगवान करण्यासाठी ही नवी पिढी आता सज्ज आहे. या नवीन प्रकारच्या गाड्यांचे पूर्ण देशभर जाळे पसरवणे हे मुख्य उद्दिष्ट असून, आधुनिक सुविधांनी युक्त अशा या गाड्या भारतीय रेल्वेची नवी ओळख बनत आहेत. या गाड्यांमुळे प्रवाशांना विमानासारखा अनुभव रेल्वेमध्ये मिळेल. हे तंत्रज्ञान भारतीय रेल्वेचे आधुनिकीकरण करून प्रवासाचा वेळ वाचवण्यास आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यास मदत करेल.

- **वेगवान आणि आधुनिक तंत्रज्ञान :**
  पूर्णपणे स्वदेशी बनावटीच्या आणि वेगवान गाड्या; ज्यामुळे प्रमुख शहरांमधील प्रवासाचा वेळ कमी होऊन कनेक्टिव्हिटी अधिक जलद झाली आहे.

- **जागतिक दर्जाच्या सुविधा :**
  स्वयंचलित दरवाजे, जीपीएस माहिती प्रणाली आणि आरामदायी रोटेटिंग खुर्च्या; ज्यामुळे प्रवाशांना विमानासारखा हाय-टेक अनुभव मिळतो.

- **कवच सुरक्षा प्रणाली :**
  गाड्यांमध्ये स्वदेशी अपघात-विरोधी 'कवच' तंत्रज्ञान; ज्यामुळे समोरासमोर होणारी धडक टळून रेल्वे प्रवास पूर्णपणे सुरक्षित झाला आहे.

- **पर्यावरणपूरक आणि ऊर्जा कार्यक्षम :**
  प्रगत रिजनरेटिव्ह ब्रेकिंग सिस्टममुळे विजेची मोठी बचत; जी रेल्वेला 'नेट झिरो' उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्यास मदत करत आहे.





"वंदे भारत, वंदे स्लीपर आणि वंदे मेट्रो या स्वदेशी गाड्या आधुनिक भारताची नवी ओळख आहेत. रेल्वेचे आधुनिकीकरण करून सर्वसामान्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुबक आणि वेगवान करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे."

ग्रेट निकोबार ट्रान्सशिपमेंट पोर्ट

जागतिक सागरी व्यापारात भारताचा वाटा वाढवण्यासाठी हे धोरणात्मक बंदर उभारले जात आहे. हिंदी महासागरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ट्रान्सशिपमेंट बंदर उभारणे हे ध्येय असून, यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार मार्गावर भारताचे नियंत्रण वाढेल. हे बंदर भारताला जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचा दुवा बनवेल. या प्रकल्पामुळे मोठ्या जहाजांना भारतात येणे सुलभ होईल, ज्यामुळे परकीय व्यापार वाढून देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल आणि नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील.



- **स्ट्रॅटेजिक ट्रान्सशिपमेंट हब :**
  हे बंदर आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारी मार्गाच्या अगदी जवळ असल्यामुळे, जगातील मोठी मालवाहू जहाजे येथे थांबू शकतील, ज्यामुळे भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील दबदबा आणि प्रभाव मोठ्या प्रमाणावर वाढेल.

- **परकीय चलनाची बचत :**
  सध्या भारताचा बराचसा माल परदेशी बंदरांवरून ट्रान्सशिप केला जातो; हे बंदर कार्यान्वित झाल्यावर तो खर्च वाचेल आणि देशाच्या परकीय चलन साठ्यात मोठी भर पडेल, ज्यामुळे अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.

- **ब्लू इकॉनॉमीला चालना :**
  या बंदरामुळे सागरी क्षेत्राशी संबंधित उद्योग, मत्स्यव्यवसाय आणि जहाज बांधणी क्षेत्राला मोठी गती मिळेल, ज्यामुळे किनारपट्टी भागातील पायाभूत सुविधांचा विकास होऊन स्थानिक लोकांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होईल.

- **सुरक्षा आणि देखरेख :**
  हिंदी महासागरातील भारताच्या या धोरणात्मक उपस्थितीमुळे सागरी सुरक्षा अधिक भक्कम होईल आणि व्यापारी मार्गावर देखरेख ठेवणे सोपे जाईल, जे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आणि फायद्याचे ठरेल.



"ग्रेट निकोबार बंदर जागतिक पुरवठा साखळीत भारताची ताकद वाढवणारे मुख्य केंद्र बनेल. याद्वारे जगातील सर्वात मोठी जहाजे भारतात येतील, ज्यामुळे सागरी व्यापार वाढून रोजगाराच्या लाखो नवीन संधी निर्माण होतील."

वाढवण बंदर

महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यात जगातील सर्वोत्तम १० बंदरांपैकी एक भव्य बंदर उभे राहत आहे. वाढवण बंदराचे काम पूर्ण करून ते पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणे हे सरकारचे मुख्य लक्ष्य असून, यामुळे लाखो लोकांसाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल. हे बंदर जागतिक व्यापाराचा नवा केंद्रबिंदू ठरेल. या प्रकल्पामुळे भारताची सागरी शक्ती वाढून मालवाहतुकीचा खर्च कमी होईल आणि राज्याच्या आर्थिक प्रगतीला मोठी गती मिळेल.

- **जागतिक दर्जाचे बंदर :**
  नैसर्गिकरित्या खोल पात्राचे बंदर असल्याने जगातील सर्वात मोठी मालवाहू जहाजे येथे सहज येऊ शकतील; ज्यामुळे जागतिक सागरी व्यापारात भारताचा दबदबा वाढेल.

- **विशाल रोजगार निर्मिती :**
  बंदराच्या उभारणीमुळे आणि लॉजिस्टिक्स उद्योगांमुळे पालघर व आसपासच्या परिसरातील हजारो तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी व आर्थिक स्थैर्य लाभेल.

- **आर्थिक विकास केंद्र :**
  बंदराभोवती विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण झाल्यामुळे निर्यात वाढेल, परकीय चलन मिळेल आणि देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.

- **प्रगत पायाभूत सुविधा :**
  रेल्वे आणि महामार्गांशी थेट कनेक्टिव्हिटी मिळाल्यामुळे मालवाहतूक जलद व स्वस्त होईल; ज्याचा फायदा भारतीय उद्योजकांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्यासाठी होईल.





"वाढवण बंदर भारताचा आर्थिक कायापालट करणारे क्रांतिकारी पाऊल आहे. जगातील सर्वोच्च १० बंदरांमध्ये स्थान मिळवणारे हे बंदर लाखो नवीन रोजगार निर्माण करेल आणि 'मेक इन इंडिया' उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत पोहोचवेल."

अमृत भारत रेल्वे स्थानक पुनर्विकास

रेल्वे स्थानकांना केवळ प्रवासाचे केंद्र न ठेवता त्यांना 'सिटी सेंटर्स' म्हणून विकसित केले जात आहे. १३०० हून अधिक स्थानकांचे विमानतळासारखे आधुनिकीकरण पूर्ण करण्याचे काम सुरू असून, यामुळे प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुखसोयी रेल्वे स्थानकांवर मिळतील. हा प्रकल्प शहराच्या दोन्ही बाजूंना जोडणारा दुवा ठरेल. यामुळे स्थानिक व्यापाराला मोठी चालना मिळेल आणि रेल्वे प्रवासाचा अनुभव अधिक सुखकर, सुरक्षित आणि आधुनिक बनून रेल्वेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलेल.



- **विमानतळ दर्जाच्या सुविधा :**
  स्थानकांवर प्रशस्त रूफ प्लाझा, फूड कोर्ट आणि वेटिंग लाउंज विकसित केले जात आहेत. यामुळे प्रवाशांना रेल्वे स्थानकावरच विमानतळासारखा जागतिक दर्जाचा अनुभव मिळेल.

- **शहरांचे एकत्रीकरण :**
  रेल्वे स्थानके आता शहराच्या दोन्ही भागांना (पूर्व आणि पश्चिम) जोडणारी केंद्रे बनतील. यामुळे प्रवाशांची ये-जा सुलभ होईल, गर्दीचे व्यवस्थापन सुधारेल आणि शहराचे सौंदर्य वाढेल.

- **स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ :**
  'एक स्टेशन एक उत्पादन' उपक्रमामुळे स्थानिक कारागीर व उद्योजकांना हक्काची बाजारपेठ मिळत आहे.

- **शाश्वत आणि दिव्यांगस्नेही विकास :**
  सर्व स्थानके आता पर्यावरणपूरक आणि दिव्यांगांसाठी सुलभ केली जात आहेत. येथे सौर ऊर्जा, कचरा व्यवस्थापन आणि अत्याधुनिक लिफ्ट-एस्केलेटर यांसारख्या सुविधांना प्राधान्य दिले असून, हा बदल सामाजिक जबाबदारीचे एक उत्तम उदाहरण आहे.



"आम्ही रेल्वे स्थानकांना केवळ प्रवासाचे केंद्र न ठेवता शहराचे मुख्य 'सिटी सेंटर' म्हणून विकसित करत आहोत. 'अमृत भारत योजना' १३०० हून अधिक स्थानकांचा कायापालट करून स्थानिक संस्कृती आणि व्यापाराला नवी जागतिक ओळख देईल."

ग्रीन हायड्रोजन मिशन

भविष्यातील इंधनासाठी भारत आता जगावर अवलंबून न राहता स्वतः उत्पादक बनणार आहे. भारताला हायड्रोजन इंधनाचा जागतिक निर्यातदार बनवण्याचे मुख्य लक्ष्य असून, यामुळे प्रदूषण कमी होऊन 'क्लीन एनर्जी' ला मोठी चालना मिळेल. हा उपक्रम देशाला ऊर्जा क्षेत्रात पूर्णपणे आत्मनिर्भर बनवेल. या क्रांतीमुळे हरित भविष्याकडे भारताची वाटचाल वेगवान होईल आणि जागतिक हवामान बदलाच्या संकटावर मात करण्यासाठी भारत एक महत्त्वाचे आणि प्रभावी पाऊल उचलेल.

- **हरित हायड्रोजन मिशन :**
  दरवर्षी ५ दशलक्ष मेट्रिक टन हायड्रोजन उत्पादनाचे उद्दिष्ट; ज्यामुळे जीवाश्म इंधनावरील (Fossil Fuels) अवलंबित्व कमी होऊन भारताची ऊर्जा सुरक्षा मजबूत होईल.

- **जागतिक निर्यात केंद्र :**
  भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेऊन स्वस्त दरात हायड्रोजन निर्मिती करणार; परिणामी जपान आणि युरोपसारख्या देशांना इंधन पुरवणारा भारत प्रमुख निर्यातदार बनेल.

- **प्रचंड गुंतवणूक आणि रोजगार :**
  या क्षेत्रात सुमारे ₹८ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून, हरित ऊर्जा क्षेत्रात ६ लाखांहून अधिक नवीन तांत्रिक नोकऱ्या निर्माण होतील.

- **कार्बन उत्सर्जन कपात :**
  जड उद्योग आणि वाहतूक क्षेत्रात हायड्रोजनच्या वापरामुळे कार्बन उत्सर्जनात मोठी घट होणार; जे भारताचे शाश्वत विकासाचे ध्येय गाठण्यासाठी महत्त्वाचे ठरेल.





"आम्हाला भारताला हरित हायड्रोजनचे 'ग्लोबल हब' बनवायचे आहे. हे राष्ट्रीय मिशन पर्यावरणाचे रक्षण करण्यासोबतच जड उद्योगांचे कार्बनीकरण करून देशाला खऱ्या अर्थाने ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर बनवणारे भविष्यातील मुख्य इंधन आहे."

सेमीकंडक्टर हब (धोलेरा)

तंत्रज्ञानाच्या जगात आत्मनिर्भर होण्यासाठी भारत आता स्वतःच्या 'चिप्स' तयार करणार आहे. स्वतःच्या चिप्स तयार करण्याचा भारतातील पहिला मोठा चिप कारखाना धोलेरा येथे विकसित होत आहे. यामुळे इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किमती कमी होतील आणि आयात कमी होईल. हा प्रकल्प भारताला जागतिक सेमीकंडक्टर हब बनवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे मोबाइल आणि ऑटोमोबाईल क्षेत्रातील उत्पादनांना मोठी गती मिळून देश तंत्रज्ञान क्षेत्रात स्वावलंबी बनेल.

- **सेमीकंडक्टरमध्ये आत्मनिर्भरता :**
  चिप्ससाठीचे परकीय अवलंबित्व संपवून स्थानिक उत्पादन सुरू होणार; ज्यामुळे जागतिक पुरवठा साखळीत भारताचा प्रभाव वाढेल.

- **इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किमतीत घट :**
  देशातच चिप निर्मितीमुळे वाहतूक व आयात शुल्क वाचणार; परिणामी मोबाईल, लॅपटॉप आणि ई-वाहने स्वस्त होणार.

- **उच्च तंत्रज्ञान रोजगार :**
  सेमीकंडक्टर क्षेत्रात हजारो उच्च-कुशल अभियंत्यांना देशातच रोजगाराच्या व संशोधनाच्या नव्या संधी उपलब्ध होणार.

- **आर्थिक सुरक्षा आणि प्रगती :**
  स्वतःचे चिप केंद्र असल्याने जागतिक टंचाईचा भारतीय उद्योगांवर परिणाम होणार नाही, जो शाश्वत आर्थिक विकासाचा भक्कम पाया ठरेल.





"धोलेरा येथील पहिला कमर्शियल सेमीकंडक्टर प्लांट भारताला जागतिक पुरवठा साखळीत मजबूत भागीदार बनवेल. जेव्हा भारत स्वतःच्या 'मेड इन इंडिया' चिप्स तयार करेल, तेव्हा देश तंत्रज्ञान क्षेत्रात पूर्णपणे आत्मनिर्भर बनेल."

ऋषिकेश-कर्णप्रयाग रेल्वे

दुर्गम डोंगराळ भागात रेल्वे पोहोचवून चारधाम यात्रा अधिक सुलभ करण्याचा हा प्रयत्न आहे. चारधाम यात्रेसाठी पर्वतीय रेल्वे मार्ग पूर्ण करणे हे ध्येय असून, यामुळे पर्यटनाला आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठे बळ मिळेल. हा प्रकल्प उत्तराखंडच्या दळणवळणात क्रांती घडवेल. यामुळे भाविकांचा प्रवासाचा वेळ कमी होईल आणि वर्षभर सुरक्षित प्रवास करणे शक्य होईल. ही रेल्वे लाईन डोंगराळ भागातील विकासाचे नवीन दालन उघडण्यास मदत करेल.

- **प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी :**
  ऋषिकेश ते कर्णप्रयाग प्रवासाचा वेळ रेल्वेमुळे थेट निम्म्यावर येणार; परिणामी भाविक आणि स्थानिकांचा प्रवास अधिक जलद, स्वस्त आणि आरामदायी होईल.
- **सर्व हवामानात कनेक्टिव्हिटी :**
  प्रगत बोगद्यांमुळे पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका टळणार; मुसळधार पावसातही चारधाम यात्रा सुरक्षितपणे आणि अविरत सुरू राहील.
- **स्थानिक रोजगाराला चालना :**
  रेल्वे स्थानकांमुळे डोंगराळ भागात नवीन बाजारपेठा विकसित होणार; ज्यामुळे पर्यटन व वाहतूक क्षेत्रात रोजगाराच्या संधी मिळून स्थानिकांचे स्थलांतर थांबेल.
- **अभियांत्रिकी चमत्कार :**
  हिमालयातील आव्हानात्मक पर्वतरांगांमध्ये १२५ किमीचा रेल्वे मार्ग; बहुतांश भाग बोगद्यातून जात असल्याने पर्यावरणाचे रक्षण आणि भारताच्या तांत्रिक क्षमतेचे दर्शन घडेल.






"उत्तराखंडमध्ये एक म्हण प्रसिद्ध आहे की 'पहाडाचे पाणी आणि पहाडाची जवानी कधीच पहाडाच्या कामी येत नाही' पण आम्ही हे चित्र बदलत आहोत. ऋषिकेश-कर्णप्रयाग रेल्वे मार्ग जेव्हा तयार होईल, तेव्हा येथे पर्यटनाला नवी गती मिळेल, नवीन रोजगार निर्माण होतील आणि आपल्या डोंगरदऱ्यांतील तरुणांचे स्थलांतर कायमचे थांबेल."

ब्रह्मपुत्र नदीखालचा बोगदा

ईशान्य भारताच्या कनेक्टिव्हिटीसाठी हा नदीखालून जाणारा पहिला क्रांतिकारी प्रकल्प आहे. आसाममधील ब्रह्मपुत्र नदीखालून जाणारा पहिला बोगदा तयार करण्याचे नियोजन असून, यामुळे प्रवासाचा वेळ वाचेल आणि संरक्षणाच्या दृष्टीने हालचाली जलद होतील. हा प्रकल्प ब्रह्मपुत्रेच्या दोन्ही तीरांना जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरेल. यामुळे ईशान्येचा आर्थिक विकास होऊन दुर्गम भागातील दळणवळण सुधारेल. हा बोगदा भारताच्या अभियांत्रिकी कौशल्याचा एक अजोड नमुना म्हणून जागतिक स्तरावर ओळखला जाईल.



- **महत्त्व :**
  अरुणाचल सीमेपर्यंत लष्करी रसद आणि सैन्याची ने-आण करण्यासाठी शत्रूच्या नजरेपासून दडलेला, अत्यंत सुरक्षित पाण्याखालचा मार्ग.
- **प्रवासाच्या वेळेत मोठी बचत :**
  ब्रह्मपुत्र नदी ओलांडण्याचा लांबचा प्रवास वाचवून 'गोहपूर आणि नुमालीगड' या महत्त्वाच्या शहरांमधील अंतर कमी होणार.
- **आधुनिक अभियांत्रिकीचे यश :**
  नदीपात्राखाली रेल्वे आणि रस्ते अशा दोन्ही सुविधा असलेला हा बोगदा भविष्यातील नदीखालील प्रकल्पांसाठी मार्गदर्शक ठरेल.
- **ईशान्येचा आर्थिक कायापालट :**
  ईशान्य भारतातील राज्यांची कनेक्टिव्हिटी सुधारून स्थानिक व्यापार, पर्यटन आणि रोजगाराला मोठी चालना मिळणार.

"ईशान्य भारताच्या दळणवळणाला मिळालेली ही एक ऐतिहासिक गती आहे! ब्रह्मपुत्र नदीखाली देशातील पहिल्या पाण्याखालील 'रोड-कम-रेल्वे' बोगद्यासह, गोहपूर आणि नुमालीगड दरम्यानच्या ४-लेन ॲक्सेस-कंट्रोल ग्रीनफिल्ड कॉरिडॉरला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. हा महत्त्वपूर्ण प्रकल्प कनेक्टिव्हिटी वाढवेल."



५व्या जनरेशनचे स्वदेशी फायटर जेट

हवाई संरक्षणात स्वदेशी ताकद वाढवण्यासाठी ५ व्या पिढीचे लढाऊ विमान तयार केले जात आहे. ५ व्या पिढीचे स्वदेशी लढाऊ विमान विकसित करणे हे मुख्य लक्ष्य असून, यामुळे भारतीय हवाई दल जगात अधिक शक्तिशाली बनेल. हा प्रकल्प भारताला संरक्षण क्षेत्रात पूर्णपणे आत्मनिर्भर करेल. प्रगत तंत्रज्ञानामुळे भारताची शत्रूवर नजर ठेवण्याची आणि हल्ल्याची क्षमता वाढून देशाच्या सीमा भविष्यात अधिक सुरक्षित व अभेद्य होतील.

- **स्टेल्थ तंत्रज्ञान :**
  शत्रूच्या रडारला चकवा देणारी अचूक रचना; ज्यामुळे शत्रूच्या हद्दीत खोलवर जाऊन सुरक्षित आणि अचूक हल्ला करणे शक्य होईल.
- **आधुनिक स्वदेशी इंजिन :**
  'सुपरकूझ' क्षमतेचे शक्तिशाली स्वदेशी इंजिन; ज्यामुळे भारत अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे मालक असणाऱ्या मोजक्या देशांच्या पंक्तीत सामील होईल.
- **आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर :**
  ५ व्या पिढीचे प्रगत सेन्सर्स आणि एआय यंत्रणा; जी युद्धभूमीवरील माहितीचे जलद विश्लेषण करून वैमानिकाला अचूक निर्णयासाठी मदत करेल.
- **संरक्षण निर्यातीला संधी :**
  विमानाची निर्मिती स्वावलंबनासोबतच मित्र देशांना निर्यातीचे नवे मार्ग उघडेल, ज्यामुळे भारत जागतिक संरक्षण बाजारपेठेत प्रमुख उत्पादक बनेल.





"५व्या पिढीचे स्वदेशी लढाऊ विमान 'मेक इन इंडिया' आणि आमच्या वैज्ञानिकांच्या कौशल्याचे प्रतीक आहे. यामुळे हवाई दल अधिक शक्तिशाली बनून देशाच्या सीमा सुरक्षित होतील आणि भारत जागतिक संरक्षण उत्पादक बनेल."

अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स)

देशातील आरोग्य सेवा सर्वसामान्य आणि शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी एम्सचे जाळे विस्तारले जात आहे. संपूर्ण देशात सर्व २५ एम्स रुग्णालये पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचे नियोजन असून, यामुळे गोरगरीब जनतेला उच्च दर्जाचे उपचार मोफत किंवा स्वस्त दरात मिळतील. हा प्रकल्प देशाच्या आरोग्य व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणेल. यामुळे उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे होणारे स्थलांतर थांबेल आणि प्रत्येक नागरिकाला आपल्याच भागात जागतिक दर्जाच्या वैद्यकीय सुविधा सहज उपलब्ध होतील.



- **आरोग्य सुविधांचे विकेंद्रीकरण :**
  विविध राज्यांत एम्स सुरू झाल्यामुळे रुग्णांना उपचारांसाठी दिल्ली किंवा इतर लांबच्या शहरात जावे लागणार नाही. यामुळे प्रवासाचा खर्च आणि मानसिक ताण कमी होईल.
- **जागतिक दर्जाचे स्वस्त उपचार :**
  कर्करोग, हृदयरोग यांसारख्या गंभीर आजारांवरील महागड्या शस्त्रक्रिया एम्समध्ये अत्यंत सवलतीच्या दरात किंवा सरकारी योजनांद्वारे मोफत केल्या जातात. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा आधार मिळाला आहे.
- **वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन :**
  एम्सच्या विस्तारामुळे देशात वैद्यकीय जागा वाढून तज्ज्ञ डॉक्टरांची नवी पिढी तयार होईल. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाला मोठी चालना मिळून भारताची आरोग्य व्यवस्था अधिक बळकट होईल.
- **स्थानिक रोजगार आणि अर्थव्यवस्था :**
  प्रत्येक एम्स रुग्णालयामुळे हजारो लोकांना थेट रोजगार मिळत आहे. सोबतच रुग्णालय परिसरात फार्मसी, हॉटेल्स आणि वाहतूक सेवा वाढल्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी उभारी मिळत आहे.

"एम्सच्या माध्यमातून आम्ही गंभीर आजारांवर अत्यंत सवलतीच्या दरात आणि मोफत उपचारांची सुविधा दिली आहे. एम्स ही केवळ रुग्णालये नाहीत, तर ती भारतातील कोट्यवधी कुटुंबांना आजारपणाच्या चिंतेतून मुक्त करणारी विश्वासाची केंद्रे आहेत."



एक देश एक निवडणूक

देशात वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे विकासाच्या कामात खंड पडतो आणि सरकारी तिजोरीवर मोठा ताण येतो.' एक देश, एक निवडणूक'ही संकल्पना प्रशासकीय पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी मांडण्यात आली आहे. यामुळे सरकारी यंत्रणा निवडणुकीच्या कामापेक्षा जनकल्याणाच्या कामात जास्त वेळ देऊ शकेल. ही संकल्पना राबवल्यामुळे स्थिर सरकार आणि निरंतर विकासाला मोठी गती मिळून आपली लोकशाही खऱ्या अर्थाने अधिक मजबूत होण्यास मदत होईल.

- **खर्च कपात :**
  लोकसभा-विधानसभा निवडणुका एकत्र घेतल्याने हजारो कोटींची बचत होईल, जो पैसा लोककल्याणासाठी वापरता येईल.
- **आचारसंहितेचा अडथळा दूर :**
  वारंवार लागणाऱ्या आचारसंहितेमुळे रखडणारे प्रकल्प आता कोणत्याही व्यत्ययाशिवाय वेगाने पूर्ण करता येतील.
- **प्रशासकीय सुसूत्रता :**
  पोलीस आणि शिक्षकांचा वेळ वाचून तो त्यांच्या मूळ कामात आणि जनसेवेत अधिक प्रभावीपणे वापरता येईल.
- **स्थिर शासन :**
  वारंवार होणाऱ्या निवडणुकांऐवजी पाच वर्षे ठोस धोरणे राबवता येतील, ज्यामुळे देशाच्या विकासात सातत्य राहील.





"एक देश, एक निवडणूक हा केवळ चर्चेचा विषय नाही, तर ती भारताची गरज आहे. दर काही महिन्यांनी भारतात कुठे ना कुठे मोठ्या निवडणुका होत असतात; यामुळे विकासकामांवर जो परिणाम होतो, त्याबाबत तुम्ही सर्वजण चांगल्या प्रकारे परिचित आहात."

विकसित भारत २०४७

या सर्व प्रकल्पांचे अंतिम आणि सर्वोच्च उद्दिष्ट म्हणजे भारताला एक प्रगत राष्ट्र बनवणे हे होय. स्वातंत्र्याच्या १०० व्या वर्षी, म्हणजे २०४७ पर्यंत, भारताला पूर्णपणे विकसित देश बनवण्याचे मुख्य ध्येय आहे. प्रत्येक भारतीयाचे जीवनमान उंचावून जगाचे नेतृत्व करणे हेच 'परिपूर्ण भारत'चे स्वप्न आहे. या संकल्पनेमुळे देश आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊन जागतिक स्तरावर एक महासत्ता म्हणून नक्कीच उदयास येईल.



- **आर्थिक महासत्ता :**
  २०४७ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वोच्च स्थानी नेऊन प्रत्येक नागरिकाचे उत्पन्न आणि राहणीमान उंचावण्याचे मोठे उद्दिष्ट आहे.
- **पायाभूत सुविधा :**
  जागतिक दर्जाचे रस्ते, रेल्वे आणि डिजिटल जाळे निर्माण करून औद्योगिक व ग्रामीण क्षेत्राचा कायापालट करण्यावर विशेष भर दिला जाईल.
- **स्वदेशी तंत्रज्ञान :**
  संरक्षण, अंतराळ आणि उत्पादन क्षेत्रात पूर्णपणे आत्मनिर्भर होऊन तंत्रज्ञानाचा जागतिक निर्यातदार बनण्याचे स्वप्न यातून साकार होईल.
- **सर्वसमावेशक विकास :**
  शिक्षण, आरोग्य आणि समान संधींच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रगतीचे लाभ पोहोचवून सामाजिक विषमता पूर्णपणे दूर केली जाईल.

"विकसित भारत २०४७ हा केवळ एक नारा नाही, तर हा १४० कोटी भारतीयांच्या संकल्प आणि कष्टाचा महासंकल्प आहे. यासाठी आपल्याला 'रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्म' या मंत्रासह प्रत्येक क्षेत्रात जागतिक मानके स्थापित करावी लागतील."



विकासाचा महाप्रकल्प

प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या खंबीर नेतृत्वात भारत लवकरच पायाभूत सुविधांच्या एका नव्या आणि भव्य युगात पाऊल ठेवत आहे. हाय-स्पीड रेल्वे, मेट्रोचे विस्तीर्ण जाळे, नवीन विमानतळ आणि प्रत्येक गावापर्यंत पोहोचणारे स्वच्छ पाणी, यांसारख्या आगामी प्रकल्पांमुळे देशातील व्यापार-व्यवहाराचा खर्च खूप कमी होईल. गती आणि विकासाचा हा मेळ देशांतर्गत उद्योगांना नवी ताकद देईल आणि कोट्यवधी भारतीयांचे रोजचे जीवन अधिक सोपे आणि समृद्ध करण्यासाठी पूर्णपणे सज्ज होत आहे.

- **स्वदेशी हाय-स्पीड रेल्वे :**
  अहमदाबाद-ढोलेरा कॉरिडॉरसाठी ₹२०,६६७ कोटी मंजूर; देशातील पहिली पूर्णपणे स्वदेशी सेमी हाय-स्पीड रेल्वे.
- **मल्टी-ट्रॅक रेल्वे विस्तार :**
  रेल्वे मार्गांवरील ताण कमी करण्यासाठी ६ राज्यांत ₹२३,४३७ कोटींच्या खर्चाने तिसरी व चौथी लाईन उभारणार.
- **मेट्रो नेटवर्क विस्तार :**
  देशातील १० मोठ्या मेट्रो प्रकल्पांसाठी ₹१.४४ लाख कोटी; नोएडा सेक्टर १४२ ते बोटॅनिकल गार्डन विस्ताराला प्राधान्य.
- **आर्थिक व वाहतूक कॉरिडॉर :**
  पीएम गती शक्ती अंतर्गत लॉजिस्टिक खर्च कमी करण्यासाठी ऊर्जा, खनिज आणि सिमेंट कॉरिडॉरच्या विकासाला गती.
- **राष्ट्रीय महामार्ग विस्तार :**
  वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि औद्योगिक विकासासाठी ३१ राष्ट्रीय मार्गांवरील २७ कॉरिडॉरचा विस्तार.







आपल्या आजूबाजूला अशा अनेक देशांची उदाहरणे आहेत, ज्यांनी ठराविक वेळेत अशीच क्वांटम झेप घेऊन स्वत:चा विकास केला आहे. म्हणूनच मी म्हणतो; भारतासाठीही हीच योग्य वेळ आहे.

समृद्धीचा नवा संकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली भाजपा सरकार देशाच्या कानाकोपऱ्यात विकासाचे मोठे प्रकल्प उभारत आहे. लोकांचे जगणे सोपे व्हावे यासाठी पुणे रिंग रोड, जेवर कनेक्टिव्हिटी आणि नवीन विमानतळांसारखी दळणवळणाची आधुनिक माध्यमे तयार केली जात आहेत. जल जीवन मिशनचा विस्तार, सागरी-रोपवे आणि स्मार्ट शहरांच्या माध्यमातून गावे व शहरांचा थेट विकास साधत, देशाच्या आर्थिक प्रगतीला खऱ्या अर्थाने गती देणारा हा सरकारचा एक दूरगामी आणि महत्त्वाकांक्षी आराखडा आहे.

- **पुणे व जेवर कनेक्टिव्हिटी :**
  पुणे शहरासाठी ₹१५,००० कोटींचा रिंग रोड आणि फरीदाबादला नोएडा विमानतळाशी जोडणारा उड्डाणपूलयुक्त महामार्ग.
- **जल जीवन मिशन विस्तार :**
  ग्रामीण भारतातील ८.७ लाख गावांपर्यंत स्वच्छ नळपाणी पोहोचवणारे या पॅकेजमधील सर्वात मोठे आर्थिक अभियान.
- **उडान योजना व नवीन विमानतळ :**
  १०० प्रादेशिक विमानतळांचा विकास आणि ५ नव्या प्रादेशिक विमानतळांच्या उभारणीकरिता ₹९,००६ कोटींची तरतूद.
- **सागरी व रोपवे प्रकल्प :**
  खोल समुद्री बंदरे, अंडरवॉटर टनेल आणि पर्वतीय पर्यटन रोपवेसाठी ₹१.४५ लाख कोटींपेक्षा अधिक निधी.
- **स्मार्ट सिटी व अर्बन फंड :**
  कोप्पर्थी-गया येथे औद्योगिक परिसंस्थांचा विकास आणि नागरी सुधारणांसाठी ₹१ लाख कोटींचा अर्बन चॅलेंज फंड.

2047 पर्यंत देशातील प्रत्येक समस्या सोडवायला हव्या, सरकारी योजनांची शंभर टक्के अंमलबजावणी झाली पाहिजे, आणि तेच विकसित भारताचं खऱ्या अर्थानं रूप असेल.



विकासाचे प्रगतीपुस्तक

भारत परमवैभवाकडे

महाकाल स्टँडर्ड टाईम

संबंधित क्षेत्र

खगोलशास्त्र व संस्कृती

सध्याची अद्ययावत स्थिती

उज्जैनला जागतिक कालगणनेचे केंद्र बनवण्याचा प्रस्ताव प्रगत स्तरावर.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन

संबंधित क्षेत्र

हाय-स्पीड रेल्वे

सध्याची अद्ययावत स्थिती

गुजरात विभागातील काम पूर्णत्वाकडे; पहिल्या टप्प्यातील चाचण्यांचे नियोजन सुरू.

भारतीय अंतरिक्ष स्टेशन

संबंधित क्षेत्र

अंतराळ संशोधन

सध्याची अद्ययावत स्थिती

२०३५ च्या ध्येयासाठी प्राथमिक आराखडा आणि तंत्रज्ञान विकसित करण्याचे काम सुरू.

भारतीय मानवी अंतराळ मोहीम

संबंधित क्षेत्र

अंतराळ विज्ञान

सध्याची अद्ययावत स्थिती

२०२६ मध्ये पहिल्या भारतीय अंतराळवीराचे अवकाशात उड्डाण करण्याचे अंतिम नियोजन.

जेवार आंतरराष्ट्रीय विमानतळ

संबंधित क्षेत्र

नागरी उड्डाण

सध्याची अद्ययावत स्थिती

आशियातील सर्वात मोठ्या विमानतळाचे व्यावसायिक कामकाज सुरू होण्याच्या अंतिम टप्प्यात.

सागरमाला परियोजना

संबंधित क्षेत्र

सागरी व बंदर विकास

सध्याची अद्ययावत स्थिती

बंदरांच्या आधुनिकीकरणातून मालवाहतुकीचा खर्च कमी होऊन निर्यात आणि सागरी रोजगाराला मोठी चालना मिळेल.

१२ नवीन औद्योगिक शहरे

संबंधित क्षेत्र

उत्पादन व उद्योग

सध्याची अद्ययावत स्थिती

स्मार्ट सिटी मॉडेलवर आधारित पायाभूत सुविधांच्या विकासाचे काम वेगाने सुरू.

६ जी नेटवर्क

संबंधित क्षेत्र

दूरसंचार

सध्याची अद्ययावत स्थिती

२०३० पर्यंत लाँच करण्याचे लक्ष्य असून सध्या संशोधन व विकास स्तरावर काम.

झोजिला टनल

संबंधित क्षेत्र

रस्ते व बोगदे

सध्याची अद्ययावत स्थिती

आशियातील सर्वात लांब बोगद्याचे काम अंतिम टप्प्यात; सामरिकदृष्ट्या सज्ज होत आहे.

२० ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था

संबंधित क्षेत्र

आर्थिक विकास

सध्याची अद्ययावत स्थिती

२०३५ पर्यंतचे ध्येय गाठण्यासाठी वार्षिक ८-९% विकासदराचे उद्दिष्ट ठेवले आहे.

खावडा रिन्युएबल पार्क

संबंधित क्षेत्र

अक्षय ऊर्जा

सध्याची अद्ययावत स्थिती

गुजरातमध्ये जगातील सर्वात मोठ्या सौर-पवन पार्कचे काम पूर्ण क्षमतेने सुरू.

पुढील ७ बुलेट ट्रेन मार्ग

संबंधित क्षेत्र

रेल्वे कनेक्टिव्हिटी

सध्याची अद्ययावत स्थिती

दिल्ली-वाराणसी आणि मुंबई-नागपूर मार्गांचे सर्वेक्षण आणि प्रकल्प अहवाल काम सुरू.

नेट झिरो २०७०

संबंधित क्षेत्र

पर्यावरण व ऊर्जा

सध्याची अद्ययावत स्थिती

कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी अक्षय ऊर्जा प्रकल्पांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार.

केन-बेतवा नदी जोडणी

संबंधित क्षेत्र

जलसंधारण

सध्याची अद्ययावत स्थिती

भारतातील पहिल्या मोठ्या नदी जोड प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर.

वंदे भारत स्लीपर/मेट्रो

संबंधित क्षेत्र

सार्वजनिक वाहतूक

सध्याची अद्ययावत स्थिती

वंदे भारत स्लीपर गाड्यांची निर्मिती आणि मेट्रो जाळ्याचा देशभर विस्तार सुरू.

ग्रेट निकोबार पोर्ट

संबंधित क्षेत्र

सागरी व्यापार

सध्याची अद्ययावत स्थिती

आंतरराष्ट्रीय ट्रान्सशिपमेंट हब बनवण्यासाठी धोरणात्मक मंजुरी आणि काम सुरू.

ग्रीन हायड्रोजन मिशन

संबंधित क्षेत्र

इंधन व ऊर्जा

सध्याची अद्ययावत स्थिती

भारताला हायड्रोजनचा जागतिक निर्यातदार बनवण्यासाठी उत्पादनाचे काम सुरू.

ब्रह्मपुत्र नदीखालचा बोगदा

संबंधित क्षेत्र

पायाभूत सुविधा

सध्याची अद्ययावत स्थिती

ईशान्य भारतासाठी नदीखालून जाणारा पहिला बोगदा तांत्रिक मंजुरीच्या टप्प्यात.

वाढवण बंदर

संबंधित क्षेत्र

बंदरे व शिपिंग

सध्याची अद्ययावत स्थिती

₹७६,२२० कोटींच्या गुंतवणुकीसह पालघरमध्ये कामाला सुरुवात.

सेमीकंडक्टर हब

संबंधित क्षेत्र

इलेक्ट्रॉनिक्स

सध्याची अद्ययावत स्थिती

भारतातील पहिल्या मोठ्या चिप कारखान्याचे बांधकाम वेगाने सुरू.

एमसीए लढाऊ विमान

संबंधित क्षेत्र

संरक्षण (हवाई दल)

सध्याची अद्ययावत स्थिती

५ व्या पिढीच्या स्वदेशी लढाऊ विमानाच्या प्रोटोटाइप विकासाचे काम सुरू.

अमृत भारत स्थानक

संबंधित क्षेत्र

रेल्वे आधुनिकीकरण

सध्याची अद्ययावत स्थिती

१३०० हून अधिक स्थानकांचा विमानतळासारखा पुनर्विकास प्रगतीपथावर.

ऋषिकेश-कर्णप्रयाग रेल्वे

संबंधित क्षेत्र

डोंगराळ रेल्वे

सध्याची अद्ययावत स्थिती

उत्तराखंडमधील आव्हानात्मक रेल्वे मार्गाचे बोगदे व पुलांचे काम अंतिम टप्प्यात.

२५ नवीन एम्स

संबंधित क्षेत्र

आरोग्य सेवा

सध्याची अद्ययावत स्थिती

देशातील सर्व २५ एम्स रुग्णालये पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे काम सुरू.

एक देश, एक निवडणूक

संबंधित क्षेत्र

राजकीय सुधारणा

सध्याची अद्ययावत स्थिती

प्रशासकीय सुसूत्रता आणि खर्च कपातीसाठी या संकल्पनेच्या अंमलबजावणीचा आराखडा तयार.

विकसित भारत २०४७

संबंधित क्षेत्र

सर्वांगीण विकास

सध्याची अद्ययावत स्थिती

स्वातंत्र्य शताब्दीपर्यंत भारताला प्रगत राष्ट्र बनवण्याच्या संकल्पावर मोदी सरकार कटिबद्ध.

एकमेव एआय शहर

संबंधित क्षेत्र


आधुनिक तंत्रज्ञान आणि आयटी

सध्याची अद्ययावत स्थिती

केंद्र सरकारच्या 'इंडिया एआय मिशन' अंतर्गत टाटा समूहाच्या सहकार्याने या पहिल्या शहराची उभारणी होत असून, तिथे जागतिक दर्जाचे रिसर्च सेंटर्स आणि स्टार्टअप हब्स सुरू होत आहेत.



मेरा परिचय



हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!
मैं शंकर का वह क्रोधानल कर सकता जगती क्षार-क्षार
डमरू की वह प्रलय-ध्वनि हूं जिसमें नचता भीषण संहार
रणचण्डी की अतृप्त प्यास, मैं दुर्गा का उन्मत्त हास
मैं यम की प्रलयंकर पुकार, जलते मरघट का धुआंधार
फिर अन्तरतम की ज्वाला से, जगती में आग लगा दूं मैं
यदि धधक उठे जल, थल, अम्बर, जड़, चेतन तो कैसा विस्मय?
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

मैं आदि पुरुष, निर्भयता का वरदान लिए आया भू पर
पय पी कर सब मरते आए, मैं अमर हुआ लो विष पी कर
अधरों की प्यास बुझाई है, पी कर मैंने वह आग प्रखर
हो जाती दुनिया भस्मसात्, जिसको पल भर में ही छूकर
भय से व्याकुल फिर दुनिया ने प्रारंभ किया मेरा पूजन
मैं नर, नारायण, नीलकंठ बन गया न इस में कुछ संशय
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

मैं अखिल विश्व का गुरु महान्, देता विद्या का अमरदान
मैंने दिखलाया मुक्ति-मार्ग, मैंने सिखलाया ब्रह्मज्ञान
मेरे वेदों का ज्ञान अमर, मेरे वेदों की ज्योति प्रखर
मानव के मन का अंधकार, क्या कभी सामने सका ठहर?
मेरा स्वर नभ में घहर-घहर, सागर के जल में छहर-छहर
इस कोने से उस कोने तक, कर सकता जगती सौरभमय
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

मैं तेज पुंज, तमलीन जगत में फैलाया मैंने प्रकाश
जगती का रच करके विनाश, कब चाहा है निज का विकास?
शरणागत की रक्षा की है, मैंने अपना जीवन दे कर
विश्वास नहीं यदि आता तो साक्षी है यह इतिहास अमर
यदि आज देहली के खण्डहर, सदियों की निद्रा से जगकर
गुंजार उठे उंचे स्वर से 'हिन्दू की जय' तो क्या विस्मय?
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

दुनिया के वीराने पथ पर जब-जब नर ने खाई ठोकर
दो आंसू शेष बचा पाया जब-जब मानव सब कुछ खोकर
मैं आया तभी द्रवित हो कर, मैं आया ज्ञानदीप ले कर
भूला-भटका मानव पथ पर चल निकला सोते से जग कर
पथ के आवर्तों से थक कर, जो बैठ गया आधे पथ पर
उस नर को राह दिखाना ही मेरा सदैव का दृढ़ निश्चय
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

मैंने छाती का लहू पिला पाले विदेश के क्षुधित लाल
मुझ को मानव में भेद नहीं, मेरा अंतस्थल वर विशाल
जग के ठुकराए लोगों को, लो मेरे घर का खुला द्वार
अपना सब कुछ लुटा चुका, फिर भी अक्षय है धनागार
मेरा हीरा पाकर ज्योतित परकीयों का वह राजमुकुट
यदि इन चरणों पर झुक जाए कल वह किरीट तो क्या विस्मय?
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

मैं वीर पुत्र, मेरी जननी के जगती में जौहर अपार
अकबर के पुत्रों से पूछो, क्या याद उन्हें मीना बाजार?
क्या याद उन्हें चित्तौड़ दुर्ग में जलने वाली आग प्रखर?
जब हाय सहस्रों माताएं, तिल-तिल जलकर हो गईं अमर
वह बुझने वाली आग नहीं, रग-रग में उसे समाए हूं
यदि कभी अचानक फूट पड़े विप्लव लेकर तो क्या विस्मय?
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

होकर स्वतंत्र मैंने कब चाहा है कर लूं जग को गुलाम?
मैंने तो सदा सिखाया करना अपने मन को गुलाम
गोपाल-राम के नामों पर कब मैंने अत्याचार किए?
कब दुनिया को हिन्दू करने घर-घर में नरसंहार किए?
कब बतलाए काबुल में जा कर कितनी मस्जिद तोड़ीं?
भूभाग नहीं, शत-शत मानव के हृदय जीतने का निश्चय
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

मैं एक बिंदु, परिपूर्ण सिन्धु है यह मेरा हिन्दू समाज
मेरा-इसका संबंध अमर, मैं व्यक्ति और यह है समाज
इससे मैंने पाया तन-मन, इससे मैंने पाया जीवन
मेरा तो बस कर्तव्य यही, कर दूं सब कुछ इसके अर्पण
मैं तो समाज की थाती हूं, मैं तो समाज का हूं सेवक
मैं तो समष्टि के लिए व्यष्टि का कर सकता बलिदान अभय
हिन्दू तन-मन, हिन्दू जीवन, रग-रग हिन्दू मेरा परिचय!

- अटल बिहारी वाजपेयी